म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ७५५.

REFBK-0019397
REFBK-0019397



SUBHASH — THE REBEL PRESIDENT

*Books of our agency—*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Calcutta to Kabul** with comentary in Hindi, Marathi & Gujrati in pictures—by 'Shani' | | 1 | 0 | 0 |
| **Students fight Slavery** —issued by A. I. S. C. | | 0 | 6 | 0 |
| **Apni Vidyarthi Hilchal** (Gujrati) —Ramniklal Shah | | 2 | 0 | 0 |
| **Chalo Delhi** (Gujrati) —Yashpal Parikh | | 2 | 0 | 0 |
| **Jai Hind** (Gujrati) Satya Deo Vidyalankar | | 2 | 8 | 0 |
| **Jai Hind** (Marathi) Satya Deo Vidyalankar | | 2 | 8 | 0 |
| **Jai Hind** (Hindi) | | 2 | 0 | 0 |
| | (Calico) | 2 | 8 | 0 |
| **Azad Sena** (Hindi) Krishna Tiwari | | 2 | 8 | 0 |

Will soon be available

| | | | |
|---|---|---|---|
| **9th August** (Gujrati) —Vanvasi | 3 | 8 | 0 |
| **Chalo Delhi** (Gujrati) —Sopan. | 5 | 4 | 0 |
| **Flames of '42** 100 Photographs with messages From leaders by V. S. Jhaveri | 15 | 0 | 0 |

**JAI HIND BOOK DEPOT.**

**BOMBAY, 4.**

# जय हिंद

म. हिं. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३८७
ग्रंथ शाखा (स्थल मत)

REFBK-0019397

: लेखक :
देव विद्यालंकार

: अनुवादक :
दिनकर साक्रीकर

मुद्रक :
वि. पु. भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई ४

: प्रकाशक
हमारा हिंदुस्तान पब्लिकेशन,
मुम्बई ४

एकमेव विक्रेते—
ऑगस्ट प्रकाशन मंदिर
'जयहिंद' बुक डेपो
६९, विठ्ठलभाई पटेलरोड मुंबई, ४

[redacted] डेपो.
रु. २/-
सुधारेली किंमत

~~मूल्य ... रुपये~~

पक्की बांधणी
रु. २/-

## १.

# पार्श्वभूमी

## आझाद फौजेच्या बचावाचा लढा

जन्मभूमीची हांक ऐकून वादळाच्या झंझावाताच्या तुफानी आवेशानें, स्वातंत्र्य-प्राप्तीच्या धुंदीत हिंदुस्थानी सैनिक हिमालयाच्या दिशेनें क्षितिजापलीकडे दिसणाऱ्या मातृभूमीवर नजर कूच करीत होते. इम्फाल आणि मणिपूरच्या वेढयावर त्यांनीं प्राण पणाला लावले होते. पत्त्याचे बंगले वाऱ्याच्या झुळकीनें सहज इतस्ततः उडावे त्याप्रमाणें हाँगकाँग, सिंगापूर आणि ब्रम्हदेशांतून ब्रिटिश सत्ता कोसळून पडलेली व ब्रिटिश लष्कराची वाताहत झालेली त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिली होती. या अनुभवावर त्यांनीं आपल्या आशेचे डोलारे उभारले होते. ' हिंदुस्तान ' चा सिंगापूर आपण करून दाखवू असा विश्वास बाळगून ते लढत होते. त्यांना कल्पना नव्हती कीं जागतिक घटनांचे स्वरूप त्यांच्या कल्पनेपेक्षां वेगळेंच होणार आहे आणि त्यांत त्यांच्या आशा–इच्छांचा, आकांक्षाचा व स्वप्नांचा चक्काचूर होणार आहे. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य त्यांच्या डोळयाला दिसणार नव्हतें. उलट त्यांनीं जे ' स्वातंत्र्य–युद्ध ' केलें त्यालाच ' बंड ' म्हणून स्वातंत्र्यासाठीं तळ हातावर प्राण घेऊन लढणाऱ्या वीरांना ' बंडवाल्यां ' प्रमाणें शिक्षा होणार होती. १८५७ च्या इतिहासाचीच पुनरावृत्ती होणार नाहीं अशी आशा होती पण पुनरावृत्ती व्हायची असें भवितव्यानें ठरविलें होतें.

लोकांच्या दृष्टिआड, अज्ञाताच्या पडद्याआड एक भव्य नाटक रचलें जात होतें. या नाटकाचे सूत्रधार ज्या जीवन–साधनेच्या पूर्तीसाठीं जीवन समर्पण करीत होते त्याची संपूर्ण कल्पना या देशाच्या लोकांना येणें असंभवनीय आहे. रेडिओ, तारायंत्रे, टेलिफोन आणि वृत्तपत्रांच्या द्वारा 'काळ' आणि 'अवकाशा'-

वर मानवतेनें विजय मिळविला आहे असें म्हणतात पण आमच्या देशाला मात्र त्या विजयाचा लाभ अद्याप मिळालेला नाहीं. बाहेरच्या जगापासून आमचा देश अद्याप शेंकडों कोस दूरच असतो. विशेषतः युद्धकाळांत तर आजकालच्या युद्ध-नीतीनुसार इतर अनेक प्रकारच्या नाकेबंदी बरोबर 'सेन्सॉर शिपच्या' नांवाखाली वृत्तपत्राचीही नाकेबंदी केली जाते त्याप्रमाणें केवळ युद्धक्षेत्रांतीलच नव्हे तर एका देशांतून दुसऱ्या देशांतही बातम्या पाठविण्यावर इतके कडक नियंत्रण आहे कीं सेन्सारच्या चाळणींतून बाहेर पडल्याशिवाय कोणतीही बातमी इकडची तिकडे जाऊं शकत नाहीं. आणि त्यांतल्या त्यांत शत्रू-राष्ट्राकडून येणाऱ्या बातम्यांच्या गळ्याला तर अधिकच कडक फांस आवळला जातो. अशा परिस्थितीत ब्रम्हदेश, मलाया आणि जपानमध्यें हिंदुस्थानचे जे देशभक्त स्वातंत्र्यासाठीं महान् प्रयत्न करीत होते त्याची बातमी आमच्यापर्यंत कशी येऊन पोचणार? परंतु तरीही नियंत्रणाच्या या अमेद्य भिंतीचाही भेद करून हवेच्या उसळत्या लहरीवर आझाद फौजेच्या पराक्रमाच्या बातम्या तुरळक तुरळक येऊन पोचल्याच आणि वृत्तपत्रांत नव्हे तरी शतसहस्त्र मुखांतून त्यांच्या कर्तृत्वाची चर्चा झाली. देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत त्यांच्या शौर्याच्या, वीरतेच्या स्फूर्ति लहरी पसरल्या. त्यांच्या लढाईच्या गोष्टीही कर्णोपकर्णी पसरत होत्या. सिंगापूर व टोकिओशिवाय बर्लिन रेडिओवरूनही त्यांच्या हालचालीचें वृत्त मधून मधून कळत होतें. आणि केव्हां केव्हां स्वतंत्र सरकारच्या स्वतंत्र रेडिओवरील तेजस्वी संदेशाचे जळते शब्द ही सर्व नाकेबंदी तोडून हिंदुस्थानी हृदयापर्यंत पोचत. हिमालयाच्या गगनभेदी शिखरांवरून उमटणाऱ्या 'जय हिंद'च्या गर्जनेचे पडसाद देशभर उमटत. आझाद फौजेच्या चढाई बरोबर 'चलो दिल्ली' 'चलो दिल्ली' ची पुकार युद्धगीताचे रक्त सळसळणारे निनाद कानावर आदळत होते. हें सर्व आम्ही ऐकत होतों, एकमेकांना सांगत होतों, आपसांत हलक्या आवाजानें त्याची चर्चा करीत होतों...दडपशाहीनें चिरडलेली जनता साशंक, सभय अंतःकरणानें हे नवे जय शब्द ऐकत होती.

ऑगस्ट १९४२ ची महान क्रांति चिरडून टाकण्यासाठीं साम्राज्यवादी सरकारनें ज्या महाभयंकर राक्षसी दडपशाहीचा नंगा नाच घातला

त्यामुळें जनता हवालदील झाली होती. सर्वत्र कांहींसे निराशेचें, पराभूततेचें व भीतीचे वातावरण पसरलें होतें. लोकांचे नीति-धैर्य अढळ राखण्याची शक्ति ज्यांच्या दिव्य वाणींत होती ते सर्व लोक-नेते तुरुंगाच्या भिंतीआड होते. आणि बाहेर जें वातावरण, जे अराजक माजलें त्यामुळें जनता अधिकच भयग्रस्त झाली. महात्माजींचा व्हाईसरॉयशीं झालेला पत्रव्यवहार, त्यांचे प्राणांतिक उपोषण व त्यानंतर झालेली सुटका यामुळें परिस्थीतींत किंचित बदल झाला पण भीषणतेचे व राजकीय नैराश्याचे वातावरण तसेंच कायम राहिले. पण वरवर शांतता असली तरी आंत जनतेच्या हृदयांत ज्वालामुखी धगधगत होता. त्या विस्तवाशीं खेळण्यास ब्रिटिश सरकारही तयार नव्हतें. युद्धाचाही शेवट झाला. जर्मनीनंतर जपानने श्वास सोडला व त्याबरोबर तुरुंगाची बंद दारें उघडलीं गेलीं. सिमल्याच्या खेळासाठीं तीन वर्षे सक्त बंदिस्त ठेवलेले पुढारी सुटून बाहेर आले.

पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल यांच्या वीर-गर्जना देशभर निनादूं लागल्या. देशाचे वातवरण विद्युत्वेगानें बदललें. दबलेली जनता पुन्हां धैर्यानें उठूं लागली. एक नवीन आत्मविश्वास, एक नवें चैतन्य, आत्मसामर्थ्याची एक नवी प्रतीती जागृत जनतेला होऊं लागली. ऑगस्ट-क्रांतीची महानता व आझाद फौजेचा इतिहास जवाहरलालजींनीं सामान्य जनतेपुढें मांडला. काश्मीरला विश्रांती घेऊन दिल्लीला परत येत असतांना पंडितजींनीं लाहोरला आझाद फौजेबद्दल जी घोषणा केली त्या घोषणेनें देशभर एक चैतन्याची लहर उसळली. वीस हजार हिंदुस्थानी वीरांनीं हिंदुस्थान बाहेर राहून हिंदी स्वातंत्र्यासाठीं केलेल्या अभूतपूर्व लढ्याकडे सर्व जनतेचे लक्ष वेधलें. पं. नेहरूंच्या या घोषणेनें प्रथम जनतेच्या अंतःकरणांत दडलेल्या जळजळींत भावनांनाच शब्दांत दिली होती. पंडितजी या घोषणेंत म्हणाले, "या प्रश्नानें कित्येक दिवस मी बेचैन झालों होतों पण कदाचित माझ्या बोलण्याचा विपर्यास होईल म्हणून मी आतांपर्यंत स्तब्ध राहिलों." पण आतां युद्धपरिस्थिति बदलली असल्यामुळें आपल्याला या प्रश्नाला तोंड फोडणें आवश्यक झालें आहे असें सांगून पंडितजी पुढें म्हणतात, "आझाद फौजेच्या अनेक सैनिकांना व अधिकाऱ्यांना तुरुंगांत डांबण्यांत आलें आहे व अनेकांना तर फांशी देण्यांत आलें आहे. जे तुरुंगांत

आहेत त्यांना अत्यंत वाईट रीतीनें वागविण्यांत येतें. त्यांच्यापैकीं पुष्कळ आज मृत्यूच्या छायेखालीं आहेत. त्यांना अशा परिस्थितींत शिक्षा करणें अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. त्यांचा मुख्य उद्देश देश स्वतंत्र करणें हाच होता. हिंदुस्थानांत आज अनेक महत्वाच्या राजकीय घडामोडी होण्याचा संभव असतांना सैनिकांना कठोरपणें वागविणें ही मोठी चूक आहे. त्यांना सर्वसामान्य बंडवाल्यांप्रमाणें वागविले तर त्याचा परिणाम भयंकर होईल. त्यानां शिक्षा झाली तर लक्षावधी लोकांची अंतःकरणें दुखावतील. सुदैवानें या बाबतीत जातीय भेदाचा प्रश्न उपस्थित होत नाहीं कारण आझाद सैनिकांत हिंदु, मुसलमान, शीख सर्व जातीचे लोक आहेत." पं. नेहरूंचें हें पत्रक झाल्याबरोबर सरकारनें आपल्या धोरणाचा खुलासा करणारे पत्रक तावडतोब काढलें. या पत्रकांत आपल्या न्यायबुद्धीचा डांगोरा पिटून आझाद फौजेचे खटले हे लष्करी कोर्टापुढें जाहीर रीतीनें चालतील असें आश्वासन देण्यांत आलें होतें. पण या आश्वासनानें जनतेचें समाधान होणार नव्हतें. व या पत्रकांत आझाद फौजेच्या परिस्थितीचीही कांहीं वास्तविक कल्पना लोकांना मिळाली नाहीं.

पं. नेहरूंनीं हें पत्रक प्रसिद्ध झाल्यावर दिल्लीच्या एका वृत्तपत्राला एक मुलाखत दिली. त्या मुलाखतींत पंडितजींनीं जाहीर केलें, "सरकारनें हें प्रकरण पडद्याआड ठेवण्याचा प्रयत्न चालविला होता पण आतां तो पडदा दूर झाला हें तरी निदान चांगलें झालें आहे. पण अद्यापही सर्व गोष्टी प्रकाशांत आलेल्या नाहींत. आझाद फौजेचे किती सैनिक व अधिकारी कोणत्या किल्ल्यांत, कॅंपमध्यें वा जेलमध्यें डांबून टाकण्यांत आले आहेत त्याची संपूर्ण माहिती आम्हांला मिळाली पाहिजे. तसेंच या फौजेंतील कोणाकोणाला व कोणकोणती शिक्षा झाली आहे तेंही आम्हांला कळलें पाहिजे." आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार या विशिष्ट परिस्थितींत अस्तित्वांत आलेल्या व अनेक सरकारांनीं मान्यता दिलेल्या या फौजेंतील सैनिकांनां युद्ध–कैदी म्हणूनच वागविलें गेलें पाहिजे अशी पंडित नेहरूंनीं मागणी केली. युद्ध थांबल्यानंतर या गोष्टींचा विचार युद्धाच्या नव्हे तर शांततेच्या दृष्टीनें केला पाहिजे. पंडित नेहरूंनीं आझाद फौजेची तुलना जनरल डी गॉलच्या स्वतंत्र फ्रेंच फौजेशी केली. जर्मन सैन्यानें या फ्रेंच सैन्यावर जेव्हां अत्याचार करण्यास सुरवात केली तेव्हां हसेन हॉवर यांनीं जर्मन सैन्याला

कडक इषारा दिला कीं स्वतंत्र फ्रेंच फौजेच्या कैद झालेल्या सैनिकांना व अधिकाऱ्यांना युद्ध–कैदी म्हणूनच वागविण्यांत आलें पाहिजे. हिंदुस्थानांतील इंग्रजी फौजेच्या सैनिकांनीं सुद्धां आपल्या सहकाऱ्यांशीं असेंच योग्य धोरण ठेवलें पाहिजे."

पंडित नेहरूंनीं आझाद फौजेचा प्रश्न ज्या तडफेनें हातीं घेतला व लढविला त्याबद्दल राष्ट्र चिरकाल कृतज्ञ राहील. पंडित नेहरूंच्या या कार्याला इतिहासांत महत्वाचें स्थान मिळेल यांत शंका नाहीं. आझाद फौजेच्या संरक्षणाची एक प्रचंड चळवळच पंडित नेहरूंच्या स्फूर्तीनें देशभर झाली. सभा, मिरवणुका, निदर्शनांची लाट उसळली. वृत्तपत्रांनीं खास अंक प्रसिद्ध करून आझाद फौजेचा रक्तलिखित इतिहास प्रसिद्ध केला. त्यानंतर २३ डिसेंबरला मुंबईला अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक झाली. त्या बैठकीपुढें पंडित नेहरूंनींच पुन्हां आझाद फौजेच्या बचावासंबंधींचा महत्वाचा ठराव कमिटीपुढें मांडला. या ठरावांत आझाद फौजेच्या सैनिकांना युद्धकैदी मानण्यांत यावें व त्यांची ताबडतोब सुटका व्हावी अशी मागणी करण्यांत आली. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या या सैनिकांना शिक्षा करण्यांत आली तर ती घटना अत्यंत अन्यायाची तर होईलच पण त्यामुळें इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यांतील विरोधाला भयंकर उग्र स्वरूप येईल असा गंभीर इषाराही देण्यांत आला. ज्यांना अगोदरच शिक्षा देण्यांत आली होती त्यांची शिक्षा रद्द करण्याची मागणी या ठरावानें केली. खटल्यांत आझाद फौजेच्या बचावाची व्यवस्था करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली. कॉंग्रेसच्या महासमितीचा हा ठराव म्हणजे हिंदुस्थानची राष्ट्रीय गर्जना होती. या आवाजाकडे सरकारनें दुर्लक्ष करणें धोक्याचें होतें. पण नेहमीच्या साम्राज्यवादी अहंतेनें सरकारनें ही मागणी फेटाळली व खटल्याचें कामकाज सुरू केलें.

त्याचा परिणाम असा झाला कीं देशभर एक क्रांतिकारक वातावरण निर्माण झालें. 'जय हिंद' अखिल हिंदुस्थानची घोषणा झाली. जे महत्व प्राप्त होण्यासाठीं 'वंदेमातरम्' ला ५० वर्षे लागलीं ते महत्व 'जय हिंद' ला एक दिवसांत मिळालें. आझाद फौजेचे कूच–गीत तर लहान लहान मुलेंसुद्धां गाऊं लागलीं.

‘ विश्वास ’ ‘ एकता ’ व ‘ बलिदान ’ या तीन तत्वांच्या अधिष्ठानावर आझाद हिंद सरकार उभारण्यांत आलें होतें. त्याचा अखिल राष्ट्रानें स्वीकार केला व जातीयतेचे मायाजाल झुगारून दिलें. ‘ लाल किल्ला तोड दो. आझाद फौज छोड दो ’ या गगनभेदी गर्जनांनीं सप्त पाताळ दुमदुमलें. ‘ नेताजी बोस करे पुकार—चलो दिल्ली एक साथ ’ या घोषणेच्या रणनादावर कोटी कोटी तरुणांची पावलें नव्या तेजानें, नव्या चैतन्यानें, नव्या आत्मविश्वासानें पुन्हा स्वातंत्र्य संग्रामाच्या दिशेनें पडूं लागलीं.

# २.

# “ नेताजी ”

जानेवारीची २६ तारीख हिंदुस्थानच्या इतिहासांत एक पवित्र आणि मंगल दिन आहे. १९२९ मध्यें लाहोर येथील कॉंग्रेस अधिवेशनांत याच दिवशीं संपूर्ण स्वातंत्र्य हें हिंदी राष्ट्रीय चळवळीचें अंतिम ध्येय म्हणून स्वीकृत करण्यांत आले व त्यानंतर प्रतिवर्षी हिंदुस्थानी जनता हा दिन अत्यंत गांभीर्यपूर्वक पाळीत आली आहे. दरवर्षी या दिवशीं हिंदुस्थानभर राष्ट्रीय निशाणाखालीं सावधान उभें राहून लक्ष लक्ष स्त्रीपुरुषांनीं राष्ट्राच्या स्वातंत्र्याशाठीं सर्वस्वाचा त्याग करून सत्यानें व निष्ठेनें अखंड लढण्याची प्रतिज्ञा घेतली जाते. या दिवसाचें महत्वच अभूतपूर्व आहे. पण १९४१ सालीं जो स्वातंत्र्य-दिन उगवला तो अधिकच अभूतपूर्व ठरला. स्वातंत्र्य-दिन उत्साहानें साजरा करण्यास सिद्ध झालेली हिंदी जनता एका अपूर्व घटनेनें स्तिमित झाली. त्या दिवशीं सुभाष बाबू हिंदुस्थानांतून नाहींसे झाले. घराभोंवतीं पोलिसांचा कडक पहारा असतांना तो ओलांडून सुभाषबाबू केवळ कलकत्ता शहरांतून नव्हे, बंगालमधून, इतकेंच नव्हे तर अफाट हिंदुस्थान देश ओलांडून निघून गेले होते. जनता आश्चर्यमूढ झाली. पक्षी पिंजऱ्यांतून उडून गेला होता व कोठेंतरी अज्ञात वृक्षाच्या अदृश्य शाखेवर बसून स्वातंत्र्याच्या गीतलहरी सोडूं लागला. खऱ्या अर्थानें त्यांनीं स्वातंत्र्याची उपासना सुरूं केली. त्या वर्षाचा स्वातंत्र्य-दिन राष्ट्राच्या इतिहासांत अमर झाला.

सुभाष अशा रीतीनें अदृश्य होण्याचा हा पहिलाच प्रसंग नव्हता. सुभाष बाबूंचा जन्म एका संपन्न घराण्यांत झाला परंतु त्यांच्या धर्मपरायण मातेच्या देवभक्तीचा इतका परिणाम त्यांच्या बाल मनावर झाला कीं लहानपणींच सर्वसंग परित्याग करून ‘ संन्यास ’ घेण्याच्या इच्छेनें ते घर सोडून हिमालयांत निघून गेले. भगवी वस्त्रें परिधान करून गुरूच्या शोधार्थ तीर्थयात्रा करीत सुभाषबाबू हिंडले सुभाषबाबू ‘ संन्यासी ’ बनायचे होते पण ते जंगलांत भगवी वस्त्रें धारण

करून रहाणारे मुमुक्षू संन्यासी नव्हे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्व समर्पण करणारे ' वीर ' संन्यासी ही त्यांची भूमिका होती. सुभाष बाबू संन्यास घेण्याचा बेत सोडून घरी परत आले.

त्यानंतर रामकृष्ण परमहंसांच्या तत्वज्ञानानें त्यांचे लक्ष्य वेधलें. असं म्हणतात कीं सुभाष बाबूंची देवीवर श्रद्धा होती व ते दुर्गा–पूजाही करीत असत. १९४० सालीं तुरुंगांत असतांना त्यांनीं एकान्त स्वीकारला होता व दाढी वाढवून केवळ चिंतनांत दिवस घालवीत. तुरुंगांतून त्यांना अन्नत्याग केल्यामुळें सोडून दिलें तरी घरींसुद्धां आपल्या खोलींत एकटे कोंडून घेऊन ते राहूं लागले. अन्नपाण्यासाठीं सुद्धां ते कोणाशीं संभाषण करीत नसत. पडद्याच्या आडून त्यांच्यासाठीं जेवणाचे ताट व तांब्याभांडे ठेवून दिले जाई व दुसऱ्या दिवशीं रिकामीं भांडीं बाहेर काढून ठेवीत. २६ जानेवारी १९४१ ला जेवणाची थाळी जशी होती तशीच राहिली. तेव्हां घरांतल्या मंडळींनीं चौकशी केली. खोलींत सुभाषच नव्हते. सुभाष नाहीसे झाले होते. सर्व शोध व्यर्थ गेला. पठाणाच्या वेषांत सुभाष बाबूंनीं हिंदुस्थान कधींच सोडला होता व अफगाणिस्तानांतून ते जर्मनीला जाऊन पोंचले होते.

' बंडा'चे 'क्रांती'चे मूळ पाठ त्यांनीं लहानपणापासूनच गिरवले होते. सुभाष· बाबू ज्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें विद्यार्थी होते त्या कॉलेजचे एक इंग्लिश प्राध्यापक मि. ओटन हिंदी विद्यार्थ्यांशीं नेहमीं उद्धटपणानें वागत व त्यांचा पाणउतारा करीत असत. सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखालीं विद्यार्थ्यांनीं प्राध्यापकांना ताळ्यावर आणण्यासाठीं संप केला. प्राध्यापकसाहेबांना सुभाषबाबूंच्या हातची एक सणसणीत चपराकही खावी लागली. प्राध्यापकाला मारल्याबद्दल विद्यार्थ्यांच्या या बंडखोर नेत्याला कॉलेजमधून हाकलून देण्यांत आलें होतें. त्यावेळीं कोणाला कल्पना होती कीं बंडखोर विद्यार्थ्यांचा हा नेता अखिल राष्ट्राचा ' नेताजी ' बनेल, आझाद हिंद फौजेचा सर-सेनापती आणि पहिल्या आझाद हिंद सरकारचा ' राष्ट्रपती ' होईल ?

सुभाषबाबूंचे जीवन-सार एका शब्दांत सांगता येण्यासारखें आहे. ' आत्म-समर्पण. ' ' मुमुक्ष ' सुभाष जेव्हां देशभक्त झाले, आध्यात्मिकाची उपासना

सोडून त्यांनीं राष्ट्राच्या सेवेला प्रारंभ केल्यावर त्यांनीं त्या क्षेत्रांतून कधीही पाय मागे घेतला नाहीं. ते सारखे पुढेंच जात राहिले. त्यांना योग्य 'आध्यात्मिक' गुरु लाभला नाहीं हे जसे देशाचे भाग्य तसेंच सुरवातीला ' देशबंधू दासासारखे राष्ट्रीय गुरु त्यांना लाभले हेही त्यांचें भाग्य. सुभाषबाबूंनीं राष्ट्रीय लढ्यांत प्रथम उडी घेतली ती २० सालच्या असहकाराच्या वेळीं. देशभर युवराजाच्या आगमनावर बहिष्कार घालण्याची लाट उसळली होती. या लढ्यासाठीं कलकत्त्यांत जे कॉंग्रेस स्वयंसेवक दल उभारण्यांत आलें होतें त्याचें नेतृत्व सुभाषबाबूंना देण्यांत आलें. देशबंधू दास यांच्याबरोबर सुभाषबाबूंना या लढ्यांत सहा महिने तुरुंगवास भोगावा लागला. १९२८ च्या कलकत्ता कॉंग्रेसच्या वेळीं सुभाषबाबू जी. ओ. सी. होते. १९३८ व ३९ या सालीं जनतेनें एकामागून एक दोन वेळां सूभाषबाबूंची राष्ट्रपती म्हणून निवड करून हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय बहुमान त्यांना दिला. सुभाषबाबूंच्या जीवनांतील या सर्व घटनांची किती चमत्कृतिजनक पुनरावृत्ती त्यांच्या हिंदुस्थानबाहेरील जीवनांत झालेली आहे ?

कलकत्ता कॉर्पोरेशन म्हणजे एक प्रतिसरकारच आहे. स्वतंत्र भारतांत कलकत्ता शहराला कांहीं अनन्य साधारण स्थान मिळालें तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. १९२४ मध्यें कलकत्त्यांतील राष्ट्रीय कार्यकर्त्यांना या गोष्टीची जाणीव झाली व त्यांनीं कार्पोरेशन काबीज करण्याचें ठरविलें. त्यांत त्यांना यश येऊन देशबंधू मेयर झाले व सुभाषबाबूंना एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर म्हणून नेमण्यांत आले व कार्पोरेशनचा सर्व कारभार त्यांच्याकडे सोपविण्यांत आला. या पंचवीस सव्वीस वर्षात सुभाषबाबूंच्या कर्तृत्वाचें जें दर्शन झालें तें १९४२–४३ मध्यें त्यांचें जें विराट स्वरूप प्रगट झालें त्याचें एक छोटेंसें चित्र होतें. १९२४ च्या आक्टोबरमध्यें क्रांतिकारक श्री. गोपीनाथ राहा यांच्या गोळीला मि. डे बळी पडले. या कटाशीं संबंध असल्याच्या संशयावरून सुभाषबाबूंना पुन्हा अटक करण्यांत आली. कलकत्ता कार्पोरेशने आपल्या एक्झिक्यूटिव्ह ऑफिसरच्या धरपकडीचा निषेध केला. कार्पोरेशनच्या बैठकीत निषेधाच्या ठरावावर बोलतांनां देशबंधू म्हाणाले " देशप्रेम हा अपराध असेल तर मीसुद्धां अपराधी आहे. कलकत्ता कार्पोरेशनचा एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर गुन्हेगार असेल तर मेयरही तितकाच गुन्हेगार आहे " येथून सुभाषबाबूंची तुरुंग यात्रा जी सुरु झाली ती

अखंड चालू राहिली. सुभाषबाबूंनीं तुरुंगांत किंवा सरकारच्या रोषामुळें हद्दपार होऊन देशाच्या बाहेर जितके दिवस काढले तितके दिवस तुरुंगाबाहेर देशांत घालवायला त्यांना मिळाले नाहीं. मंडालेच्या तुरुंगांत त्यांना दीड वर्ष नजर कैदेंत रहावें लागलें. या तुरुंगवासांतून त्यांनीं आपले वडील बंधु श्री. शरच्चंद्र बोस यांना एक पत्र लिहिलें. त्यांत ते म्हणतात, " ईश्वराला माझी कसोटी पहाण्याची इच्छा असेल तर मी कोणत्याही अग्निदिव्यांतून आनंदानें जाण्यास तयार आहे. मी तर असें मानतों कीं हिंदुस्ताननें पूर्वीं जीं पापें केलीं आहेत त्याच्यासाठीं मी हे अल्प प्रायश्चित घेत आहे " मंडालेचा तुरुंगवास हा या या प्रायश्चित्ताचा श्रीगणेशा होता. १९४२–४३ मध्यें त्याची परिसीमा झाली. पण त्यांतूनच एक नवा इतिहास निर्माण झाला…मंडालेच्या तुरुंगांतून सुभाषबाबूंची सुटका १५ मे १९२७ रोजीं आसन्न मरण स्थितींत झाली. आणि तीही अशा अटीवर कीं त्यानीं हिंदुस्थानच्या कोणत्याही बंदरांत न थांबणाऱ्या बोटींत बसून विलायतेस जावें. सुभाषबाबूनीं ही अट स्वीकारण्याचें साफ नाकारलें. " देशांतून अशा रीतीनें आजन्म निर्वासित होण्यापेक्षां जन्मभर तुरुंगांतच रहाणें श्रेयस्कर. " सुभाषबाबूंची बिनशर्त सुटका झाली.

प्रकृती सुधारतांच सुभाषबाबूनीं पुन्हां आपलें कार्य सुरू केलें. बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवडणूक झाली. नागपूर, पुणें, कराची, पाटणा, लाहोर इत्यादि अनेक शहरांत अनेक प्रचंड परिषदा त्यांच्या अध्यक्षतेखालीं झाल्या. १९२८ मध्यें कलकत्ता काँग्रेसचे स्वयंसेवक दलाचें नेतृत्व त्यांच्याकडे होतें. ११ ऑगस्ट १९२८ ला त्यांनां पुन्हां अटक करण्यांत आली व २३ जान्युआरी १९२९ ला राजद्रोहाच्या आरोपाखालीं १ वर्षांची शिक्षा ठोठावण्यांत आली. २३ सप्टेंबर १९२९ ला त्यांना सोडण्यांत आलें. पण पुन्हां १८ जाने. १९३० ला पकडण्यांत आलें. या दरम्यान त्यांची कलकत्ता कॉर्पोरेशनच्या मेयर पदावर निवडणूक झाली. १९३३ च्या स्वातंत्र्य दिनाची मिरवणूक कलकत्त्याला मेयर सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालीं निघाली होती. या मिरवणुकीवर पोलिसानीं केलेल्या लाठीहल्ल्यांत ते जखमी झाले व इतर अनेक सहकाऱ्यांबरोबर त्यांना ६ महिन्यांची शिक्षा झाली.

गांधी–आयर्विन करारामुळें राजबंदी सुटले त्यांच्यावरोबरच सुभाषबाबूंची सुटका झाली. पण गोलमेज परिषदेहून गांधीजी परत आल्यानंतर सरकारनीं जें वटहुकुमांचें राज्य सुरू केलें त्यानें पहिला बळी सुभाषबाबूंचा घेतला. ३ जाने. १९३२ ला मुंबई येथें कॉंग्रेस वर्किंग कमिटी व इतर कॉंग्रेस कार्यकर्त्यांबरोबर सुभाष बाबूंना अटक करण्यांत आली. या वेळीं त्यांच्यावर खटला न भरतां १८१८ च्या ३ ऱ्या रेग्युलेशनखालीं त्यांना बेमुदत डांबून ठेवण्यांत आलें. पुनः एकदां मंडालेच्या तुरुंगवासाची पुनरावृत्ति झाली या तुरुंगवासांत त्यांची प्रकृति इतकी ढासळली कीं त्यांचें वजन ६० पौंडानीं कमी झालें. २३ फेब्रु. १९३३ ला ते विलायतला जाण्यास निघाले तेव्हां त्यांची स्थानबद्धतेंतून सुटका झाली. सुभाषबाबू व्हिएन्नाला जाऊन राहिले.तेथेंच विठ्ठलभाई पटेलही सॅनिटोरिअममध्यें उपचारासाठीं येऊन राहिले होते. सुभाषबाबूनीं त्यांच्या सल्ल्यानुसार यूरोपमध्यें हिंदी स्वातंत्र्याचा प्रचार तुफान आवेशानें सुरू केला. इंग्लंडमध्यें जाण्याची तर त्यांना बंदीच करण्यांत आली होती. तरीसुद्धां त्यांनीं पोलंड, ग्रीस मिलान, कार्ल्सबॉड, जिनेवा वगैरे ठिकाणीं भेटी दिल्या व एकदोन पुस्तकेंही लिहिलीं. हिंदुस्थानसंबंधीं त्यांनीं जे पुस्तक या वेळी लिहिलें तें हिंदुस्थानांत पाठविण्यास बंदी करण्यांत आली. सुभाषबाबूनांही हिंदुस्थानांत परत येण्याची परवानगी नव्हती. सुभाषबाबूंचे वडील यावेळीं हिंदुस्थानांत मृत्युशय्येवर होते. वडिलांच्या आसन्नमरण अवस्थेची बातमी कळतांच परवानगीची परवा न करतां सुभाषबाबू विमानानें ४ सप्टेंबर १९३५ ला कलकत्त्याला येऊन दाखल झाले. पण दुर्दैवानें त्यांचे वडील दोन दिवस अगोदर स्वर्गवासी झाले होते. पोलिसांच्या कडक बंदोबस्तांत त्यांना घरीं पोहोचविण्यांत आलें पण या कडक बंदोबस्तांतसुद्धां हिंदुस्थानांत त्यांच्या घरीं राहूं देणें सरकारला धोक्याचें वाटलें. १० सप्टेंबरला त्यांना पुन्हः यूरोपमध्यें सक्तीनें नेण्यांत आलें. तेथून गेल्यावर सुभाषबाबूनीं आपल्या उपचारांबरोबरच प्रचाराचें कामही जोरांत सुरूं केलें. पंडित जवाहरलाल नेहरूही त्यावेळीं जिनिव्हा येथें रुग्णशय्येवरील पत्नीच्या उपचारांसाठीं तेथें आले होते. त्यांची व सुभाषबाबूंची तेथें गांठ पडली. आयर्लंडमध्यें जाऊन त्यांनीं डी व्हॅलेराची मुलाखत घेतली. वृत्तपत्रांच्या वार्ताहरांनीं त्यांचें हिंदुस्थानचे ‘निर्वासित

राजदूत ' असें वर्णन केलें. पण सुभाषबाबू तर आजन्म निर्वासित रहाण्यापेक्षां तुरुंगवास श्रेयस्कर मानीत होते. म्हणून प्रकृति सुधारतांच ता. ८ एप्रिल १९३६ ला स्वदेशीं परत जाण्याची परवानगी नसतांही इटॅलियन जहाजांनीं ते हिंदुस्थानांत येण्यास निघाले. हिंदुस्थानांत येतांच त्यांना पुन्हां अटक करण्यांत आली. ४–५ महिन्यांतच पुन्हां त्यांची प्रकृति बिघडली. देशामध्यें कानाकोपऱ्यांतून त्यांच्या सुटकेसाठीं आंदोलन सुरूं झालें. त्यांचें वजनही भरपूर घटलें होतें. फोर्ट आर्थर येरवडा आणि कुर्सियांग इत्यादि नंतर त्यानां १७ डिसेंबर रोजीं कलकत्ता मेडिकल कॉलेजमध्यें आणलें. १९३३ च्या निवडणुकीनंतर १९३७ सालीं दिल्लीला राष्ट्रीय कन्व्हेनशनचें अधिवेशन सुरूं झालें. त्याचवेळीं १७ मार्च रोजीं संध्याकाळीं ७–३० वाजतां सुभाष बाबूंना मुक्त करण्यांत आलें. ५॥ वर्षानंतर त्यांची मोकळीक झाली. सर्व देशभर आनंदी आनंद झाला. परंतु त्यांची प्रकृति फारच खालावली होती. ८–९ महिने डलहौसीमध्यें औषधोपचार करूनसुद्धां कांही उपयोग झाल्याचें दिसेना. तेव्हां १८ नोव्हेंबर १९३७ रोजीं औषधोपचारासाठीं त्यांना परदेशीं जाणें भाग पडलें १॥ महिना औषधोपचार झाल्यानंतर ते १० जानेवारी १९३८ ला लंडनला गेले. आणि या नंतर १६ जानेवारीला हरिपुरा कॉंग्रेससाठीं त्यांची राष्ट्रपति म्हणून निवड झाली. तेथील भव्य, दरबारी थाटांत झालेल्या त्यांच्या स्वागताचें येथें वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. १९३९ मध्यें पुन्हां एकदां दुसऱ्यांदा त्रिपुरा कॉंग्रेसच्यासाठीं राष्ट्रपति म्हणून सुभाष बाबूंचीच निवड झाली. महात्मा गांधी आणि इतर कांहीं कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांशी मतभेद झाल्यामुळें त्यांनी आपल्या राष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला व आणि ' फॉरवर्ड ब्लॉक'ची संघटना केली या काळांतील अप्रिय घटनांची बेचव चर्चा करण्याचें हें स्थान नाहीं. ' फॉरवर्ड ब्लॉक'वर सुरवातीपासूनच सरकारची वक्र दृष्टि झाली. काहीं असलें तरी या दलांची संघटना करतांना ज्या ' फॉरवर्ड ' शब्दाचा उपयोग केला जात होता तो किती अर्थपूर्ण होता ? आझाद हिंद फौजेनें आत्मसात केलेल्या ' चलो दिल्ली ' या देशव्यापी घोषणेचें बीजारोपण जणुं काय 'फॉरवर्ड' शब्दा बरोबरच झालें होतें !

जुलई १९४० मध्यें त्यांना पुन्हः पकडण्यांत आलें. तुरुंगांत अन्नत्याग केल्यामुळें त्यांना मोकळें करून पोलीसच्या खडया पहाऱ्यांत स्वतःच्या घरींच

नजर कैदेंत ठेवण्यांत आलें. याच पहाऱ्यांतून ते २६ जान्युआरी १९४१ रोजीं बेपत्ता झाले होते. त्या नन्तरच्या त्यांच्या गौरवपूर्ण जीवनाची सुन्दर कहाणी या छोट्याशा पुस्तकांत ग्रंथित करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारत मातेची लज्जा रक्षण करण्याच्या प्रयत्नांत सर्वस्वाचा त्याग करून स्वार्थत्यागाचें सर्वोत्कृष्ट उदाहरण जगापुढें ठेवणाऱ्या तिच्या वीर सुपुत्राच्या दीर्घ संघर्षयुक्त जीवनांतील अखंड संघर्षाची अंधुकशी कल्पना वरील ओळींमधून दिली आहे. देशसेवेच्या मार्गावर पहिलें पाऊल ठेवतांच तुरुंगवास, नजरकैद, निर्वासन ( हद्दपारी ) इत्यादींची जी धामधूम सुरू झाली ती जीवनाच्या शेवटच्या घटकेपर्यंत तशीच चालू राहिली. १९ आगस्टला विमानी अपघातांत सांपडून त्याच रात्रीं इहलोक सोडून गेल्याचा उल्लेख टोकीओमधून २३ आगस्टला केलेल्या घोषणेमध्यें करण्यांत आला आहे. १९ ऑगस्टची रात्र हीच त्यांची शेवटची घटिका. परंतु ती अजूनही संशयास्पदच आहे. ही घटना अविश्वसनीय वाटल्यामुळेंच मुंबईमध्यें झालेल्या कॉंग्रेसच्या महासभेच्या बैठकींत शोकप्रदर्शनाचे वेळीं सुभाषबाबूंच्या नांवाचा उल्लेख करण्यांत आला नाहीं. 'झांशीची राणी' रजिमेंटच्या प्रमुख सेनानी डॉ. लक्ष्मी यानींही या बाबतींत अविश्वास प्रकट केला आहे. आझाद हिंद फौजेचे मुक्त झालेले कित्येक सैनिकही या घोषणेचा सत्य म्हणून स्वीकार करायला तयार नाहींत. त्यांच्यांतील एकादें लहान मूलही या गोष्टीवर विश्वास ठेवणार नाहीं असे त्यांचें म्हणणें आहे. ते सुभाषबाबूंना ईश्वरी अवतार मानतात. आणि केव्हांतरी ते प्रकट होतील अशी त्यांची खात्री आहे. बंगालचे सुप्रसिद्ध ज्योतिषी श्रीयुत शम्भुसेन गुप्ता यांचे म्हणणें आहे कीं त्यांचें आयुष्य ७२ वर्षेपर्यंत आहे. त्या पूर्वीं मृत्यू येऊच शकत नाहीं. ते म्हणतात कीं सुभाषबाबू १९४५ च्या पहिल्या रात्रीं जेथें होते त्या ठिकाणापासून ६७० मैल दूर असलेल्या पर्वतांतील गुप्तस्थानीं ते गेलेले आहेत. त्यांच्याबरोबर त्यांचे ५ अनुयायीही आहेत. हेरांनीं कितीही प्रयत्न केले तरी ते १९ डिसेंबरपूर्वीं त्यांच्या हातीं मिळू शकत नाहींत. आणि त्यावेळीं सुद्धां जर ते त्यांना मिळाले नाहींत तर १९४६ च्या जान्युआरी महिन्याच्या मध्यांत ते हिंदुस्थानांत येणें संभवनीय आहे. आणि या वेळींही जर ते आले नाहींत तर १९४७

साली २३ मार्च ते २३ एप्रिलच्या दरम्यान ते हिंदुस्थानांत निश्चित परत येणार. १९४७ मध्यें हिंदुस्थान पूर्णपणें स्वतंत्र होईल आणि सुभाषबावूच हिंदुस्थानचे पहिले राष्ट्रपति होणार.

याच्या उलट विमान अपघाताला दुर्दैवानें बळी पडून त्यांना मृत्यु आल्याची बातमी ही निश्चित पुराव्यानिशीं ऐकू येत आहे. दिल्लीच्या लाल किल्ल्यामध्यें चालू असलेल्या कोर्ट मार्शल खटल्यामध्यें साक्षी देण्यासाठीं आणलेल्या जपानी अधिकाऱ्यानींही याच गोष्टीला पाठिंबा दिलेला आहे. सुभाष बाबूंचा डावा हात कर्नल हबिबुर-रहमान यांनीं या गोष्टीची सत्यता पटवितांना म्हटलें आहे कीं फोर्मोसा जवळ झालेल्या अपघातांत सुभाषबाबू इहलोक सोडून गेले. कर्नल हबिबुर रहमानही त्याच विमानांत होते. आणि आग लागल्यावर त्यांच्या शरीरावरील कपडे काढण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. या प्रयत्नांत त्यांचे दोनहि हात पोळून निघाले. त्यांनाही दिल्लीच्या लाल किल्ल्यांत खटल्यासाठीं आणून नजर कैदेंत ठेवलें आहे. सुभाषबाबूंचें तें मुलाम्याचें घड्याळही आणिलें आहे. त्याचा अर्धा पट्टा जळलेला आहे. हें घड्याळ आझाद हिंद फौजेवर चाललेल्या खटल्यांत त्यांचा बचाव करणाऱ्या कमिटीच्या स्वाधीन करण्यांत आलें आहे. कमिटीतर्फें पंडित नेहरूनीं तें घड्याळ सुभाषबाबूंचे वडील बंधु श्री. शरत्चंद्र बोस यांजकडे पोहोंचतें केलें आहे.

वरील भविष्य जर खरें झालें तर तें कोणास आवडणार नाहीं? चौदा वर्षांच्या वनवासानंतर अयोध्यावसियानीं ज्याप्रमाणें श्रीरामाचें स्वागत केलें त्याचप्रमाणें देशांतील लोक नेताजीचें स्वागत करतील व त्यांची स्वतंत्र भारताच्या लोकमतानुवर्ती राज्याच्या गादीवर तिलक म्हणून स्थापना करण्यांत स्वतःला धन्य मानतील. आणि तेव्हांच 'जय हिंद' या राष्ट्रीय घोषणेचे सार्थक होऊन "आझाद हिंद"च्या कल्पनेला पूर्णता येईल.

म. ग्रं. सं. ठाणे.

# ३.

# १८५७ ते १९४२

## पूर्वार्ध

१८५७ च्या क्रांतीच्या ज्वाळा विझविल्या गेल्या परंतु तिचे धगधगते निखारे अनेक ठिकाणीं सुप्तावस्थेंत राहिले. क्रांतीची आग एकदां भडकल्यानंतर दडपशाहीनें ती राखेच्याखाली दडपतां येते पण विझवितां येत नाहीं. या राखेच्या खालीं दडलेल्या सुप्त पण जिवंत अग्नीला वाऱ्याची थोडीशी झुळुक लागतांच तो पुन्हां वडवानळाचें विराट स्वरूप दाखवितो. १८५७ पासून १९४२ पर्यंतचा हिंदी स्वातंत्र्याचा लढा याच सत्याचा साक्षात्कार करून देतो. १८८५ मध्यें कॉंग्रेसची स्थापना होऊन स्वातंत्र्याच्या लढ्याला एक सनदशीर स्वरूप मिळालें. तरीही या सशस्त्र क्रांतीच्या कल्पना मूळ धरून राहिल्या. पण या तत्त्वज्ञानावर अधिष्ठित असलेले भारतीय स्वरूपाचें संघटन होऊं शकलें नाहीं. निरनिराळ्या प्रांतांतून अलग अलग उठाव होत असत. असा पहिला उठाव ज्या प्रांताच्या कपाळावर ५७ [illegible] देशद्रोहाचा शिक्का बसला होता अशा पंजाब प्रांतामध्यें झाला. या बंडाला 'कुका'चें बंड असें नांव दिलें आहे. भैणी साहेब या बंडाचे प्रमुख होते व त्यांचें नांव पंजाबमध्यें आजही लोकांच्या तोंडीं आहे. १८२४ मध्यें त्यांचा जन्म झाला. त्यांच्या अडतीस अनुयायांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें व खुद्द त्यांना स्वतःला १८१८ च्या ६ व्या रेग्युलेशनखालीं गिरफदार करून ब्रम्हदेशांत नजर कैदेंत ठेवण्यांत आलें. ते १८८५ मध्यें मरण पावले. गुरु रामसिंहजीनीं आपल्या कार्याला सुरुवात राजकीय भूमिकेवर आधारलेल्या संघटनेच्या द्वारें केली होती. त्यांच्या संघटनेचें जाळें पंजाबभर पसरलें होतें. शाळा, कोर्ट, रेल्वे पोष्ट आणि तार खातें यांच्यावर बहिष्कार घाल-

ण्याचाही कार्यक्रम त्यानीं हातीं घेतला होता. त्यांच्या संघटनेला पंजाबमध्यें एका प्रतिस्पर्धी सरकारचेंच स्वरूप प्राप्त झालें होतें. गुरुजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या संप्रदायातील राजकीय आत्मा उडून गेला आणि फक्त धार्मिक सांगाडा आजही शिल्लक आहे. धार्मिक स्वरूपाच्या कार्यांतून उद्भवलेलें हें बंड अखेर धर्मांतच विलीन झालें.

गुरु भैणीसाहेबांच्या बंडानंतर दुसरें प्रभावी बंड महाराष्ट्रांत झालें. हें बंड वासुदेव बळवंत फडके यांचें बंड म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. या बंडाचा उगम धार्मिक नव्हता तरीही त्याचा फैलाव महाराष्ट्रभर झाला. वासुदेव बळवंतांना फांसावर चढविण्यांत आलें. महाराष्ट्रांत उठलेल्या क्रांतिकारक चळवळीचें नेतृत्त्व हलकें हलकें लोकमान्य टिळक यांच्याकडे आलें. गणपती उत्सव आणि शिवाजी उत्सव सुरू करून लोकमान्यांनीं महाराष्ट्रांत नवचैतन्य निर्माण केलें. १८९७ मध्यें पुण्याला प्लेगनें हाहाकार उडविला. त्यावेळेला झालेल्या लष्करी अत्याचाराचा मोबदला म्हणून चाफेकर बंधूंनी प्लेग कमिशनर रँड आणि लेप्टनंट आयर्स्ट यांचे खून केले. या खुनाच्या कटांतही अनेक तरुण फांसावर चढले.

वंगभंगाच्या चळवळीनें बंगाल प्रांतांत नवजीवन संचरलें होतें. या चळवळीला लवकरच उग्र क्रांतिकारक चळळीचें स्वरूप प्राप्त झाले. योगी अरविंदांचे बंधू वारिंद्र घोष, स्वामि विवेकानंदांचे बंधू डॉ. भूपेंद्रनाथ दत्त व अबिंद्रनाश भट्टाचार्य यांनीं युगांतर पक्ष स्थापन करून बंगालच्या राजकारणांत खरोखरीच युगांतर घडवून आणलें. कलकत्त्यांत माणिकतोळा आणि बंगालमध्यें अनुशीलन समिती ही क्रांतिकारक चळवळींचीं केंद्रस्थानें झालीं होतीं. १९०७ च्या ऑक्टोबर व डिसेंबर महिन्यांत बंगालच्या गव्हर्नरांची खास गाडी उलथून पाडण्याचे तीन अशस्वी प्रयत्न झाले. सर्व बंगाल प्रांतभर असे प्रकार होऊ लागले. चंद्रनगर क्रांतिकारक चळवळींचा बालेकिल्ला झाला होता. मुझफ्फरपूर येथें खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी यांनीं क्रांतीची ज्वाला पेटविली. या कटांत चाकीनें आत्महत्त्या केली आणि खुदीराम ११ ऑगस्ट १९०८ रोजीं गीता हातांत घेऊन हंसत हंसत फांसावर चढला. खुदीरामचें वय १७ वर्षांचें

होतें. त्याला पकडणारा सबइन्स्पेक्टर नंदलाल बानर्जी याला ६ नोव्हेंबर १९०८ रोजीं कलकत्ता येथें गोळी घालून ठार मारण्यांत आलें.

दहशतवादी क्रांतीकारकांवरील पहिला मोठा खटला १९०८ सालीं झाला. ह्या अलिपुर कटाच्या खटल्यांत एकंदर ३२ आरोपी होते. सरकारतर्फे २२२ साक्षीदार उभे करण्यांत आले. मुख्य ३२ आरोपी बरोबरच आणखी सहा आरोपीवर खटला करण्यांत आला होता. ह्या खटल्यांत ५५ साक्षी झाल्या. ह्या खटल्याचे जाळें बंगालभर पसरून अनेक तरुणांना ह्यांत अडकवण्यांत आलें होतें. कलकत्याचे पुढारी श्री. अरविंद घोष, बारिन्द्र घोष, कनैय्यालाल दत्त, भूपेंद्रनाथ बानर्जी, उल्लासकर दत्त, शिशिरकुमार घोष व परषचंद्र मलिक हे होते. नरेन्द्रनाथ गोस्वामी माफीचा साक्षीदार झाला. सत्येंद्रकुमार बसु आणि कन्हैयालाल दत्त ह्यांनीं नरेंद्र गोस्वामीचा तुरुंगात खून केला. सरकारी साक्षीदाराचा अशा रीतीनें खून होण्याची ही पहिलीच घटना होती. खून करणाऱ्या दोघांनांही फांशीची शिक्षा देण्यांत आली.

१० नोहेंबर १९०८ ला कन्हैयालाल दत्त ह्यांना फांसावर चढवण्यांत आलें. ते इतके आनंदात होते कीं फांशीची शिक्षा सुनावण्यांत आल्यानंतर फांशी देण्याच्या दिवसापर्यंत त्यांचे वजन सोळा पौंडांनीं वाढलें. सत्येंद्रही असेच हंसत हंसत फांसावर लटकले. ह्या कटाचा खटला चालवणारे सरकारी वकील अशुतोष विश्वास ह्यांना १० फेब्रुवारी १९०९ रोजीं कोर्टांतून बाहेर येत असतां गोळी घालून ठार मारण्यांत आलें.

सेशनमध्यें खटला बरेच दिवस लांबला. २०६ साक्षी झाल्या. सरकारी वकील नॉर्टन ह्यांनीं सरकारतर्फे केलेलें भाषण १६ दिवस चाललें. आणि तितकेच दिवस आरोपींच्या वकीलांनींही आपल्या भाषणासाठीं घेतले. ह्या खटल्यांतील २९ तरुणांना आजन्म काळया पाण्याची शिक्षा मिळाली. १७ निर्दोष सुटले. एकाला एक वर्षाची शिक्षा झाली. आणि एक खटला चालू असताच तुरुंगांत मरण पावला. हायकोर्टाकडे अपील करण्यांत आले. खुद्द देशबंधु दास ह्यांनीं अपील लढवलें. आपले सर्व वक्तृत्व व बुद्धिमत्ता पणाला लावून देशबंधूनीं अठरा दिवस हायकोर्टापुढें भाषण केलें. कांहीं तरुणांची शिक्षा कमी झाली

२

आणि कांहीं सुटले. ह्या खटल्यासाठीं सरकारचे लक्षावधि रुपये खर्च झाले. खटला चालू असतांना एक सरकारी वकील व एक पोलीस डे. सुपरिटेंडंट क्रांतिकारकांच्या गोळ्यांना बळी पडले. अरविंद घोष ह्या खटल्यांत निर्दोष सुटले. १९१९ मध्यें युद्ध समाप्तिनंतर बादशहांनीं जी सार्वत्रिक माफी दिली त्यांत बाकीचे तरुण सुटले.

महाराष्ट्रांत सावरकरबंधूंच्या नेतृत्वाखालीं दहशतवादी संघटना अस्तित्वांत आल्या. विद्यार्थी अवस्थेंत असतांनाच सावरकरबंधु राजकारणांकडे वळले. विदेशी बहिष्काराच्या चळवळीच्या वेळीं ते विद्यार्थीदशा संपवून बाहेर पडले होते. विनायकराव सावरकर इंग्लंडला गेले तेव्हां त्यांचा श्री. श्यामजी कृष्ण वर्मा ह्यांच्याशीं संबंध आला आणि त्यांच्या सहवासांत सावरकर दहशतवादी बनले. वंगभंगाचे वेळीं हिंदुस्थानांत जो उठाव झाला होता त्याचा परिणाम इंग्लंडमधील हिंदी लोकांवरही झाला. आणि त्यांच्यातही क्रांतिकारक भावनांनीं पेट घेतला. पंजाबमधून हद्दपार झालेले सरदार अजितसिंग ह्याचवेळीं इंग्लंडमध्यें येऊन पोचले होते. इंडिया हाऊस आणि इंडियन सोशॅलिस्ट हे पत्र ह्याच वेळीं अस्तित्वांत आले. ह्या पत्रांवर दोन वेळा खटला झाल्यावर त्याचे प्रकाशन इंग्लंडमध्यें बंद करण्यांत येऊन पॅरिस मधून सुरूं करण्यांत आले.

१९०८मध्यें इंडिया हाऊसमध्यें १८५७च्या क्रांतीचा स्मृतिदिन पाळण्यांत आला. इंग्लंडमधील हिंदी लोकांच्या क्रांतिकारक चळवळीचें केंद्र इंडिया हाऊस बनलें. बॉंब कसे तयार करायचे ह्याविषयीं उघड चर्चा होऊं लागली. पिस्तुले चालवण्याचे शिक्षण घेण्यांत येऊं लागले. अमृतसरचे एक तरुण श्री. मदनलाल धिंगडा ह्यांनीं सर कर्झन वायलीवर उघड सभेंत गोळी झाडून त्यांचा खून केला. सर कर्झन इंग्लंडमधील हिंदी लोकांना अतिशय छळीत असत. ह्या खुनाबद्दल मदनलालला फांशीची शिक्षा झाली. १९ ऑगष्ट १९०९ रोजी वंदेमातरम्‌चा जयघोष करीत हंसत हंसत मदनलाल फांशी गेला. ह्याचवेळीं हिंदुस्थानांत विनायकराव सावरकरांचे ज्येष्ठ बंधु गणेश दामोदर सावरकर ह्यांना राष्ट्रीय गीतांचे पुस्तक छापल्याबद्दल काळ्या पाण्याची शिक्षा देण्यांत आली. त्यांच्या घराची झडती झाली त्यावेळीं झडतीत बॉंब तयार करण्याचें सामान सांपडलें

होते. ह्या खटला चालवणारे नाशिकचे जिल्हा मॅजिस्ट्रेट जॅक्सन ह्यांचा थिएटर-मधून नाटक पाहून बाहेर पडत असता अनंत कान्हेरे ह्या तरुणानें गोळी झाडून खून केला. अनंत कान्हेरे अत्यंत शूर तरुण होता. क्रांतिकारक कार्यासाठीं त्यानें स्वतःची निश्चयपूर्वक तयारी केली होती. त्याच्या विषयींची एक अद्‌भुत व हृदयथरारक गोष्ट नाशिकचे लोक सांगतात. पोलिसांकडून आपला छळ होईल तो सहन व्हावा व कितीही छळ झाला तरी कटाची माहिती आपल्याकडून फुटली जाऊं नये ह्यासाठीं अनेक प्रकारचे प्रयोग क्रांतिकारक तरुण स्वतःवर करीत असत. शारीरिक छळ सहन करण्याची आपली तयारी किती झाली आहे हे दाखविण्यासाठीं कान्हेरे ह्यांनीं जळत्या दिव्याची तापलेली कांच दोन्ही हातांनी उचलून धरून ठेवली. तापलेल्या कांचेनें तळहाताचे कोवळे मांस जळूं लागले व त्याची घाण सुटली पण त्यानें निश्वास सुद्धां काढला नाहीं. अनंत कान्हेरे हातांत गीता घेऊन फांसावर चढला. ह्या खटल्यांत आणखीही दोन तरुणांना फांशीची शिक्षा झाली. विनायकरावांचे धाकटे बंधु डॉ. नारायण दामोदर सावरकर ह्यांना लॉर्ड मिंटोवर बॉंब फेकण्याचा जो प्रयत्न झाला त्याच्याशीं संबंध असल्याच्या संशयावरून पकडण्यांत आलें.

इंग्लंडमध्यें धिंगडानें केलेल्या खुनाच्या निषेधार्थ एक जाहीर सभा इंग्लिश लोकांनीं भरवली होती. मदनलालचा निषेध करणाऱ्या ठरावाला विनायकराव सावरकरांनीं त्या सभेंत जाहीर विरोध केला. सभेमध्यें दंगल झाली. विनायक-रावांनीं ह्यावेळीं 'तलवार' नांवाचें पत्रही चालवलें होतें. कांहीं मित्रांच्या सल्यावरून ते फ्रान्समध्यें राहूं लागले होते, परंतु १९१० साली ते लंडनला आले असतां गाडींतच त्यांना अटक करण्यांत आली. अटकेनंतर त्यांना हिंदु-स्थानांत आणलें जात असतां मार्सेलिस जवळ त्यांनीं बोटीच्या शौचकुपांतल्या छोट्याशा खिडकींतून समुद्रांत उडी मारली व सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. ते समुद्र पोहून फ्रान्सच्या किनाऱ्यावर जाऊन पोंचले. पण फ्रेंच पोलिसांनीं त्यांना पुन्हां जहाजांवरील इंग्लिश पोलिसांच्या स्वाधीन केलें. हिंदुस्थानांत आणल्यावर त्यांना नाशिकच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें व २६ मार्च १९११ सालीं त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा देण्यांत आली. ह्या नाशिक कटाच्या खटल्यांत अडतीस आरोपी होते. त्यापैकीं सत्तावीस तरुणांना निरनिराळी शिक्षा

झाली. ह्या शिवाय ग्वाल्हेर येथें ४१ तरुणांवर खटला चालवण्यांत आला होता. औंध आणि कोल्हापुर मधूनही कांहीं तरुणांना पकडण्यांत आलें होतें.

अलिपुर कटाच्या खटल्यानें फांशी आणि काळ्या पाण्याच्या शिक्षांनीं बंगालमधील दहशतवादी चळवळीची आग विझली नाहीं. उलट एकेक फांशी व जन्मठेप ह्या आगींत तेलच ओतीत होती. कलकत्ता आणि डाक्का येथें स्थापन झालेल्या अनुशीलन समितीच्या शाखा बंगालभर पसरल्या होत्या. मदारीपुर येथें अनुसंधान समिति स्थापन झाली होती. दडपशाहीनें ह्या चळवळीचें दमन करणें अशक्य झालें. बंगालशिवाय इतर प्रांतांतही दहशतवादी संघटना अस्तित्वांत आल्या होत्या. रासबिहारी बोस ह्यांचा ह्या गुप्त संघटनांशी संबंध होता. क्रांतिपूर्व रशियातील गुप्त संघटनेप्रमाणें ह्या संघटनांचें काम चालत असे. चळवळीला आवश्यक गोष्टी दोनः कार्यकर्ते आणि पैसा. कार्यकर्ते मिळाले तरी पैसा मिळत नाहीं. चळवळीसाठीं, विशेषतः गुप्त दहशतवादी चळवळींसाठीं पैसा मिळविणें जवळ जवळ अशक्यप्रायच असल्यामुळें या क्रांतिकारकांना अपरिहार्य म्हणून ‘ राजकीय दरोडे ’ घालावे लागले. दरोडे घालणें हा कांहीं त्यांच्या चळवळीचा अंगभूत विशेष नव्हता. केवळ आपधर्म म्हणून या ‘ वाम ’ मार्गाचा त्यांना अवलंब करावा लागला. या काळांत दहशतवाद्यांचे सामर्थ्यही मोठें होतें व बंगालमध्यें अनेक ठिकाणीं त्यांनीं राजकीय दरोडे घालून चळवळीसाठीं अर्थसंचय केला. पन्नास पन्नास तरुणांच्या सशस्त्र टोळ्या डाके घालून पंचवीस-तीस हजारापर्यंत लूट घेऊन जात. धावत्या गाड्यांवरही असे डाके घालण्यांत आले. कित्येक ठिकाणी बाँबचे स्फोट झाले, गोळ्या चालविल्या गेल्या, खून पडले, अत्याचारालाही भर आला. शेंकडों तरुणांवर खटले भरण्यांत येऊन त्यांना मोठमोठ्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. कांहींना फासावर चढविण्यांत आलें. क्रिमिनल लॉ. अमेंडमेंट ॲक्ट नांवाचा एक नवीनच कायदा करण्यांत येऊन बंगालमधील अनेक संघटना बेकायदेशीर ठरविण्यांत आल्या. १८१८ च्या तिसऱ्या रेग्युलेशनखालीं अनेक बंगाली तरुणांना स्थानबद्ध करण्यांत आलें. डाका कटाच्या खटल्यांत ४४ तरुण अडकले होते. दोन वर्षानंतर परत स्वदेशी येण्याची त्यांना परवानगी मिळाली. पुलिन बिहारी दास हेही त्यांत होते. १९११ मध्यें एकंदर १८ राजकीय दरोडे घालण्यांत येऊन ५० हजारांची रक्कम लुटण्यांत

आली. याच सालांत कटाच्या खटल्यांत माफीचे व सरकारी साक्षीदार झालेल्यांना गोळी घालून मारण्याचे अनेक प्रकार घडले. अनेक सरकारी अधिकारी व इंग्रज दहशतवाद्यांच्या गोळ्यांना बळी पडले. हे सर्व प्रकार बंगालच्या फाळणीमुळें होत आहेत असें वाटून सरकारनें १९११ च्या दिल्ली दरबारचे निमित्तानें बंगालचा स्वतंत्र एक प्रांत जाहीर केला. बिहार ओरिसाचेही दोन अलग प्रांत बनविण्यांत आले.

१९१२ मध्यें राजकीय दरोडे पडतच होते. राजकीय दरोड्याचा पहिला खटला बारीसाल येथें झाला. या खटल्यांत ४४ तरुणांच्या नांवानें वारंटें काढण्यांत आलीं होतीं. ३७ पकडले गेले त्यापैकीं २ सरकारी साक्षीदार झाले व १२ ना शिक्षा झाल्या. या कटाचे पुढारी श्री. शैलेन्द्र मुकर्जी व रमेश आचार्य हे होते. एकंदर १४ दरोड्याबद्दल हा खटला भरण्यांत आला होता. १२ साल उलटून १३ साल सुरू झाले तरीही दरोड्यांचे प्रमाण कमी झालें नाहीं. एकंदर ६१ हजार रुपयांची रक्कम व शस्त्रेंही लुटलीं गेलीं. याच सालांत राजाबाजार बॉंब खटला झाला. या खटल्यांत सहा तरुणांना शिक्षा झाली. १९१४ च्या २६ ऑगस्ट रोजीं एक अद्भुत दरोडा पडला. रोडा आणि कंपनीचीं ५० पिस्तुलें आणि ४६००० काडतुसें चोरीला गेलीं. चुंगीच्या गुदामांतून काडतुसांनीं भरलेल्या २०२ पेट्या यावयाच्या होत्या. त्याप्रमाणें १९२ पेट्या येऊन पोचल्या पण उरलेल्या पेट्या ज्याच्या ताब्यांत होत्या तो इसम जो बेपत्ता झाला तो सांपडलाच नाहीं. १९१४ नंतर जे दरोडे पडले त्यांत या पिस्तुल–दारुगोळ्याचा उपयोग करण्यांत आला. कशीबशी ३१ पिस्तुलें परत हातीं लागली. उरलेली बेपत्ताच राहिलीं. १९१४, १५ व १६ सालांत दहशतवादी क्रांतीची लाट परमोच्च बिंदूला पोचली व सरकारच्या दडपशाहीनेंही तितकेंच उग्र स्वरूप धारण केलें. भारत संरक्षण कायद्याचा सरसहा उपयोग करण्यांत येऊं लागला. हजारों तरुणांना केवळ संशयावरून स्थानबद्ध करण्यांत आलें. या भीषण दडपशाहीला तोंड देऊनही क्रांतिकारक आपले हल्ले चढवीत होतेच. १९१८ च्या ७ मेला रात्रीं त्यांनीं आर्मेनियन स्ट्रीटवर एक अत्यंत साहसी दरोडा घातला. त्यांत अनेक शिक्षक व प्रोफेसरही पकडले जाऊन स्थानबद्ध केले गेले. अनेक तरुण नजर कैदेंत असतांना आजारी पडून मरण पावले. रौलॅट कमिटीनें

बंगालमधील या क्रांतिकारक चळवळीसंबंधीं लिहितांना असें नमूद केलें आहे कीं, " जर बंगालमधील क्रांतिकारकांच्या सर्व गटांना आधुनिक शस्त्रें मिळालीं असतीं तर त्यांनीं १९१५ च्या फेब्रुवारींत बंगालमध्यें संघटित क्रांति घडवून आणली असती. "

मद्रास, संयुक्त–प्रांत आणि पंजाबमध्येंही क्रांतीच्या ज्वाला भडकल्या होत्या. बादशहा पंचम जॉर्ज यांच्या दिल्ली दरबारविरुद्धही कट करण्यांत आला होता पण तो यशस्वी झाला नाहीं. मद्रासमध्यें क्रांतिकारकांनीं पॉंडेचेरी येथें आपलें केंद्र स्थापन केलें व तिनेवल्लीचे मॅजिस्ट्रेट ऐश यांच्यावर गोळी झाडण्याचा प्रयत्न केला. या संबंधांत तिनेवल्ली कटाचा खटला झाला. दिल्ली येथें मास्टर अमीरचन्द, लाला हनुमन्तसहाय व लाला हरदयाळ यांनीं क्रांतिकारकांची संघटना निर्माण केली. श्री. रासबिहारी बोस यांनीं बंगालमधून डेहराडूनला येऊन तेथें काम सुरू केले व दिल्ली आणि पंजाबमध्यें संघटना उभारली. दिल्ली राजधानी झाल्यानंतर ता. २३ डिसेंबर १९१२ ला लॉर्ड हार्डिंज यांनीं समारंभपूर्वक राजधानींत प्रवेश केला. व्हाइसरॉयची मिरवणूक चांदणी चौकांत येतांच मिरवणुकीवर बॉंब फेकण्यांत आला. १९१३ च्या मे महिन्यांत लाहोर येथेंही एक बॉम्बस्फोट झाला. या सर्व बॉंबस्फोटाबाबत १४ तरुणांना अटक करण्यांत येऊन त्यांच्यावर राजकीय कटाच्या आरोपाखालीं खटला भरण्यांत आला. या चौदा तरुणांत लाला हनुमन्तसहाय, अमीरचन्द अवधबिहारी, बालमुकुंद, दीनानाथ, वसंतकुमार विश्वास व बलराज हे प्रमुख होते. दीनानाथ सुलतानचंद माफीचे साक्षीदार झाले. या खटल्यांत तिघांना फाशी, एकाला काळेपाणी, बलराज व हनुमन्तसहाय यांना ७ व ९ वर्षे अशा शिक्षा झाल्या. मास्तर अमीरचन्द व अवधबिहारी, भाई बालमुकुन्द विश्वास हंसत हंसत फांसावर चढले. राश बिहारी बोस १९१५ पर्यंत गुप्त राहून आपलें काम करीत होते.

हिंदुस्थानांतील क्रांतिकारक चळवळीपासून परदेशांत गेलेल्या हिंदी लोकांनांही स्फूर्ति मिळत होती व तेही लढ्यासाठीं संघटित होत होते. इंग्लंडमध्यें क्रांतिकारकांनीं केलेल्या प्रयत्नांची माहिती पूर्वीं दिलीच आहे. इंग्लंडप्रमाणें अमेरिकेंतील हिंदी लोकांतही चळवळीचा वन्ही यावेळीं पेट घेत होता. अमेरि-

केतील शीखांनीं इतक्या धडाडीनें स्वातंत्र्यलढ्याच्या कार्याला सुरुवात केली कीं जणुं राजकारणासाठींच ते तेथें गेले होते. लाला हरदयाळ व भाई परमानंद हे त्यावेळीं अमेरिकेत होते. लाला हरदयाळ यांनीं अराजकवादाचा प्रसार व प्रचार प्रचंड उत्साहानें सुरूं केला. परमानन्दांनीं त्यांना या प्रचार कार्यांत साथ दिली. १० मे १९१३ रोजीं ' गदर ' पक्षाची स्थापना झाली. गदरपक्षातर्फे ' गदर ' नांवाचें पत्रही सुरूं करण्यांत आलें. हें पत्र हिंदी, ऊर्दू, गुरुमुखी व गुजराथी इत्यादी अनेक भाषांतून निघत होतें. जेथें जेथें हिंदी लोकांच्या वसाहती होत्या तेथें या पत्राचा प्रसार होता. हा प्रचार, ही संघटना व ही सर्व तयारी आगामी महायुद्धावर नजर ठेऊनच करण्यांत येत होती. या महायुद्धाचा फायदा घेऊन देश स्वतंत्र करण्याचा निकराचा प्रयत्न करावयाचा हा प्रधान हेतु या कार्यांत होता. २५ किंवा २६ मार्च १९१४ ला लाला हरदयाळ यांना अमेरिकेंत अटक करण्यांत आली. लालाजी सुटका झाल्याबरोबर प्रथम स्वित्झर्लंडला व तेथून जर्मनीला गेले आणि जर्मनीतून हॉलंडला जाऊन राहिले.

अमेरिकेतील हिंदी लोकांत निर्माण झालेल्या या नव्या वातावरणाचा परिणाम कॅनडांतील हिंदी लोकांवरही झाला. त्याला कॅनेडियन सरकारचें हिंदी विरोधी धोरणही कारणीभूत झालें. कॅनडांत हिंदी लोकांवर अनेक अत्याचार केले जात होते व हिंदी लोकांना कॅनडांत प्रवेश करतां येऊं नये म्हणून त्यांच्यावर अपमानास्पद अटी लादण्यांत येत होत्या. कॅनडांत जाणाऱ्या हिंदी लोकांना प्रतिबंध करण्याच्या या धोरणाविरुद्ध हिंदी लोकांनीं निकराचा लढा दिला. हें धोरण हाणून पाडण्यासाठीं हिंदी वसाहतवाल्यांनीं एक अभिनव सत्याग्रहाचा प्रयोग केला होता. कॅनडाशीं दळणवळण करणारी 'गुरुनानक स्टीम नेविगेशन कंपनी' नांवाची एक स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यांत आली व या कंपनीतर्फे " कामागातामारू " नांवाचें जपानी जहाज भाड्यानें घेण्यांत आलें. हें जहाज २३ मे १९१४ ला वँकोबारला पोचलें. या जहाजावर ३७१ शिख व २१ मुसलमान होते. कनाडियन अधिकाऱ्यांनीं जहाज किनाऱ्याला लावण्यास मनाई केली. जहाजवाल्यांनींही परत जाण्याचें नाकारलें. दोन महिनेपर्यंत जहाजाचा हा ' सत्याग्रह ' चालूला होता. २३ जुलैला जहाज परत पाठवून देण्यांत आलें. या दोन महिन्याच्या काळांत जहाजावरील हिंदी

लोक व कनाडियन पोलिस यांच्यांत अनेक चकमकी झाल्या. कनाडियन सरकारनें केलेल्या या विटंबनेनें हिंदी लोकांचा क्रोध व असंतोष अधिकच भडकला. २६ सप्टेंबरला जहाज बजबजला लागले. वाटेतही हिंदी जहाजाचा अनेक प्रकारें अपमान करण्यांत आला. हॉंगकॉंग व सिंगापूर येथेंही जहाज थांबू देण्यांत आलें नाहीं. बजबजला उतरल्यावर सर्व लोकांनीं थेट पंजाबला जावें असा हुकुम त्यांच्यावर बजावला. त्यांना लाहोरला नेण्यासाठीं एक खास गाडीही तयार ठेवण्यांत आली होती. पंजाबला परत गेल्यावर आपल्याला स्थानबद्ध करुन ठेवलें जाईल अशी बोटीवरील प्रवाशांना भीती वाटली व त्यांनीं परत जाण्यास साफ नकार दिला. बोटीवरील या शीख व मुसलमान उतारूंनीं पंजाबच्या गाडींत बसण्याचें नाकारतांच त्यांच्यावर एकदम गोळीबार करण्यांत आला. १८ जागच्या जागींच ठार झाले. ७७ लोकांना जबरदस्तीनें गाडींत बसविण्यांत आलें. २६ निसटून फरारी झाले. ३१ स्थानबद्ध करण्यांत आलें. या सर्व लढ्याचीं सूत्रें हलविणारे हिंदी पुढारी बाबा गुरुदत्तसिंह हे होते. त्यांना पकडून देण्यासाठीं दहा हजाराचें बक्षिस सरकारनें जाहीर केलें होतें पण अरुणा–अच्युत यांच्यासाठीं लावलेल्या बक्षिसाप्रमाणें तेंही फुकट गेलें. सात वर्षांनंतर बाबा गुरुदत्तसिंह गांधीजींच्या आदेशानुसार सरकारच्या स्वाधीन झाले. हा सात वर्षांचा काळ त्यांनीं केवळ भूमिगत अवस्थेंत स्वतःला पुरून घेऊन घालविला नाहीं. त्यांनीं अनेक व्यवसाय केले. कांहीं वेळां ठेकेदार म्हणून केव्हां मॅनेजर म्हणून तर कधीं हकीम बनून त्यांनीं जीवन व्यतीत केलें. या सर्व भूमिका पार पाडीत असतांना ते कॉंग्रेसचें कार्यही करीत होते व कॉंग्रेसच्या भारतीय कमिटीच्या बैठकांनाही हजर रहात.

'कोमागाटामारू' जहाजाचा कॅनेडियन सरकारनें अपमान केल्यामुळें जी जखम हिंदी लोकांना झाली होती त्यांत हिंदुस्थान सरकारनें आणखी मीठ चोळण्याचा उद्योग केला. 'गदर पक्ष' आतां स्वातंत्र्यासाठीं लढणारा पक्ष बनला. १९१४ मध्यें महायुद्ध सुरू झालें होतें. निर्वासित शीख देशभक्त युद्धकाळाचे क्रांतिकारक महत्व ओळखून भराभर स्वदेशीं परत येऊं लागले. स्वदेशीं परत येत असतां त्यांनीं वाटेंत शांघाय, बॅंकॉक, सिंगापूर व ब्रम्हदेशांतील हिंदी लोकांनाही जागृत करून स्वातंत्र्याच्या लढ्यासाठीं तयार केलें. या क्रांतिकारकांचे मुख्य

लक्ष सैन्यांत बंड घडवून आणण्याकडे होतें. आपला उद्देश साध्य करण्यासाठीं अवश्य असलेला निधि जमविण्यासाठीं त्यांनींही दरोड्याचा अवलंब केला. पंजाबमध्येंही बंगालप्रमाणें सर्वत्र दरोडे पडूं लागले. अमेरिकेंतून आलेल्या शीखांच्या या हालचालींमुळें परदेशांतून येणाऱ्या सर्वच हिंदी लोकांवर अतिशय कडक नजर ठेवण्यांत येऊं लागली. कलकत्याला बंदरांत उतरल्यापासूनच त्यांच्या मागें गुप्त पोलिसांचा ससेमिरा सुरू होई. तोसामारु जहाजानें जे हिंदी लोक येत त्यांना कोमागातामास जहाजावरील हिंदी लोकांपेक्षांही अधिक 'भयंकर' समजून अधिक कठोरपणानें वागविण्यांत आलें. हिंदी लोक आतां लपून छपून परत येऊं लागले. पंजाबमध्यें या क्रांतिकारकांचें एक मोठें जाळेंच तयार झालें होतें. त्यांच्या पोलिसांशीं चकमकीही झाल्या. दोन्ही बाजूंनीं पिस्तुले उडत होतीं, व हत्या घडत होती. या भीषण 'लढाईतील' एका चकमकीत पंडित काशीराम, रहमत अलीशहा व त्यांचे इतर पांच सहकारी पकडले गेले. सात क्रांतिकारकांना फांसावर चढविण्यांत आलें. या सातांना फाशी दिल्यानंतर सरदार गन्धासिंह यांना फांशी झाली. पंजाबच्या क्रांतिकारकांचे एक दुर्भाग्य प्राणघातक ठरलें. इतर कोणत्याही प्रांतापेक्षां पंजाबमध्यें दहशतवाद्यांतून माफीचे–साक्षीदार अधिक निघाले. अगदीं जिव्हाळ्याचे मित्र, सगेसोयरेही क्रांतिकारकांना आपल्या घरीं विश्वासानें बोलावून पोलिसांच्या स्वाधीन करण्याचा बेशरमपणा करीत. अशा 'सूर्याजी पिसाळांमुळेंच' अनेक कट अयशस्वी झाले. श्री. रास बिहारी घोष व शचींद्रनाथ संन्याय यनीं पंजाबमधील गदरपक्षाच्या क्रांतिकारकांशीं संलग्न होऊन प्रचंड संघटना उभारली. या काळांत पंजाबी क्रांतिकारकांची शक्ति इतकी अफाट वाढली होती कीं त्यांनीं २१ फेब्रुवारी १९१५ हा दिवस सर्व प्रांतभर सामुदायिक उठावणी करण्यासाठीं म्हणून निश्चित केला होता. लष्करी छावणींतील फौजेंत बंड घडवून आणण्याचीही पूर्ण तयारी झाली होती. त्यांच्या बेत असा होता कीं लष्करी छावणींतील हिंदी शिपायांनीं बंड करून सर्व गोऱ्या अधिकाऱ्यांची कत्तल करून छावणी ताब्यांत घ्यावयाची व मग मुलकी सत्ताही काबीज करावयाची. हा कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून रेल्वे, तारायंत्रें वगैरेंचे दळणवळण साफ तोडण्याचाही बंदोबस्त केला गेला होता. राष्ट्रीय झेंडा बनवून एक घोषणाही तयार करून ठेवण्यांत

आली होती. अधिकाऱ्यांना या कटाचा सुगावा लागेल या भीतीनें २१ ता. बदलून अचानक १६ तारीख करण्यांत आली पण तरीही अधिकाऱ्यांना बातमी कळलीच. त्यामुळें सर्वनाश झाला. सर्व हिंदी क्रांतीकारकांचे आशाळभूत डोळे पंजाबकडे पहात होते. पंजाबच्या बरोबर संयुक्त प्रांत व बंगालमध्येंही कार्यक्रमाची जय्यत तयारी होती. छावणींत अतिशय जपून सर्व तयारीनिशीं बंदोबस्त करून नंतर पोलिसांनीं शहरांत ठिकठिकाणीं छापे घालून धरपकड करण्यास सुरवात केली. या धुमश्चक्रींतूनही रासबिहारी बोस मोठ्या शौर्यानें निसटले व बनारसला परत आले. अशा रितीनें देशभर क्रांतिकारक उठाव करण्याच्या या भव्य धाडसी योजनेचा करुण शेवट झाला. १८५७ नंतर इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रथमच सशस्त्र क्रांतीची तयारी झाली होती. पण त्या योजनेचा गर्भावस्थेतच खून झाला. पावलो पावलीं विश्वासघातानें क्रांतिकारकांचा असा गळा दाबला.

सरकारनें या संधीचा पूर्ण फायदा घेण्याचें ठरविलें. अमानुष अशा भीषण दडपशाहीचा नंगा नाच पंजाबमध्यें सुरू झाला. परदेशांतून परत आलेल्या सहा हजारांपैकीं निम्म्या लोकांवर पोलिसांची कडक नजर होती. तीन चार हजार लोकांना गांवांत स्थानबद्ध करण्यांत आलें, शेकडो लोकांना तुरुंगांत डांबण्यांत आलें व पन्नास एक लोकांना फांसावर लटकविण्यांत आलें. क्रांतिकारकांच्या रक्तांत क्रांति बुडवून टाकण्यांत आली.

भारत संरक्षण कायद्याखालीं सहा खटले भरण्यांत आले होते. या खटल्याचे निकाल तडकाफडकी व एकतर्फी होत. आरोपींना अपील करण्याचा हक्क नव्हता. पहिल्या राजद्रोहाच्या खटल्यांत ६१ आरोपी होते. त्यांतच सरदार कर्तारसिंग, भाई परमानंद, झांशीचे पं. परमानंद, विनायक गणेश पिंगळे हे प्रमुख होते. सरकारच्या बाजूनें ४०४ व बचावाच्या बाजूनें २०८ साक्षी झाल्या. १६ डिसेंबर १९१६ ला २४ तरुणांना फांशीची व अनेकांना काळ्यापाण्याची शिक्षा सुनावण्यांत आली. दुसऱ्या खटल्यांत ७४ आरोपी होते. त्यापैकीं पांच आरोपींना फाशी देण्यांत आले. आणि ४२ काळ्यापाण्यावर पाठविण्यांत आले. तिसऱ्या खटल्यांत १२ आरोपी होते त्यापैकीं चार फांशी देण्यांत आले. बनारस कटाचा खटलाही याच दिवसांत झाला. लष्करी छावणींत लष्करी कोर्ट

बसविण्यांत येऊन अनेक शिपायांना गोळ्या घालण्यांत आल्या. साध्या कायद्यानुसारसुद्धां अनेक शिपायांना शिक्षा देण्यांत आली. लाला लजपुतराय यांनीं आपल्या आत्मकथेंत या भीषण हत्याकांडाचे हृदयस्पर्शी वर्णन केलें आहे. सूफी अंबाप्रसाद यांना इराणमध्यें कोर्ट मार्शल करून गोळ्या घालून मारण्यांत आलें. इतके बळी दडपशाहीनें घेतले, रक्ताच्या अक्षरशः नद्या वाहिल्या पण रक्ताच्या नद्यांनीं क्रांतीची आग कधीं विझत नाहीं, अधिक भडकते....

युद्ध–कालांतील परिस्थितीचा फायदा घेऊन ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याचे अनेक व अनेकविध प्रयत्न झाले. त्यांत जर्मनीच्या मदतीनें शस्त्रास्त्रें मिळवून बंड करण्याचाही एक प्रयत्न झाला. श्री. एम्. एन्. रॉय यांनीं या प्रयत्नांत प्रामुख्यानें भाग घेतला होता. जहाजांतून युद्ध-साहित्य वा शस्त्रें हिंदुस्थानांत पोंचविण्याचें प्रयत्न अनेक वेळां करण्यांत आले पण ते अयशस्वी झाले. खोट्या नांवानें, बनावट कंपन्यांच्या द्वारें बातम्या इकडून तिकडे पाठविण्यास सुरवात झाली. अकाली दलाप्रमाणेंच बंगाल्यांच्याही सशस्त्र पोलिस व लष्कर यांच्याशीं चकमकी झाल्या. गोहाटी व बालासोरच्या जंगलांत तर पद्धतशीर युद्धच झालें. सात सात दिवस पोलीसांना क्रांतिकारकांचा पाठलाग करावा लागला. सिंगापूर येथील हिंदी फौजेंतही बंड घडवून आणण्याचा व ब्रम्हदेशांतून हिंदुस्थानवर हल्ला करण्याचा डाव रचला होता. २१ फेब्रुवारीला पंजाबमध्यें कांहीं झालें नाहीं पण सिंगापूरला मात्र हिंदी फौजांनीं यशस्वी बंड केलें. सात दिवसपर्यंत तेथें हिंदी फौजेचें राज्य होतें. नंतर ब्रिटिशांनीं रशियन व जपानी फौजांच्या मदतीनें हें बंड चिरडून टाकलें व बंडवाल्यांवर ब्रह्मदेशांत खटले भरले.

अशा रीतीनें १९१४ ते १८ च्या महायुद्धांत हिंदुस्थानी क्रांतिकारकांनीं देशांत व देशाच्या बाहेर जेवढे प्रयत्न स्वातंत्र्यासाठीं केले ते सर्व दुर्दैवानें अयशस्वी ठरले. पंजाबला इतके चिरडण्यांत आले कीं कांहीं काळ तो अगदीं निर्वीर्य बनावा. बंगालमध्येंही असेंच भयंकर हत्याकांड करण्यांत आलें. अनेक तरुण फांसावर चढविले गेले. अनेकांना काळ्या पाण्याच्या शिक्षा झाल्या. कित्येक गोळ्यांना बळी पडले. अथवा आत्महत्या करून स्वर्गाचा मार्ग स्वीकारला.

पण क्रांतीच्या भडकत्या ज्वाळा या रक्ताच्या वर्षावानें विझल्या नाहींत. अमेरिकेंत कांहीं घडामोडी झाल्या. संयुक्तप्रांतांत ‘ मातृवेदी ’ नांवाची संस्था

स्थापन करण्यांत आली. या संस्थेनें आपलें ब्रीदवाक्य असें ठरविलें होतें —

भाइओ आगे बढो फोर्ट विलियम छीन लो ।
कितने है अंग्रेज सारे उनको बीन लो ॥

या संस्थेची वाढ होऊं शकली नाहीं. ग्वाल्हेर येथें झालेल्या चकमकींत या संस्थेच्या ९० सभासदांपैकीं ३५ मारले गेले व त्यांचे पुढारी पंडित गेंदालाल आणि ब्रम्हचारीजी यांना त्यांच्या इतर सहकाऱ्यांबरोबर गिरफदार करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आले. त्यांना मैनपुरी येथें नेण्यांत येऊन खटला भरण्यांत आला. १ डिसेंबर १९१६ ला जवळ जवळ सगळ्यांना शिक्षा झाली. या संस्थेची वाताहतही विश्वासघातामुळेंच झाली. शिक्षा झाल्यानंतर पंडित गेंदालाल आणि रामनारायण तुरुंगांतून फरारी झाले.

पंजाबमधील लष्करी कायद्याचा नृशंस अंमल, जालियनवाला बागेंतील हत्याकांड यांचा येथें केवळ उल्लेखच केला पाहिजे. १९१९ मध्यें युद्धसमाप्ती-नंतर सार्वत्रिक–माफी देण्यांत आली त्यांत राजद्रोहाच्या आरोपाखालीं दीर्घ मुदतीच्या शिक्षा झालेले अनेक राजबंदी सुटले. ह्याच वेळेला गांधीजींच्या नेतृत्वाखालीं असहकार व सत्याग्रह ह्यांचा अभिनव प्रयोग देशांत सुरूं झाला. अहिंसात्मक क्रांतीच्या मार्गावर देशानें पुढें पाऊल टाकलें.

१८५७ नंतर झालेल्या क्रांतिकारक चळवळीच्या इतिहासाचा पूर्वार्ध येथें समाप्त होतो.

# १८५७ ते १९४२

## उत्तरार्ध

महात्मा गांधींची असहकाराची चळवळ तीन वर्षेपर्यंत चालली. एक वर्षात स्वराज्य मिळालें नाहीं आणि चौरीचौऱ्यानंतर व्यापक सत्याग्रहाचा कार्यक्रम स्थगित करण्यांत आला. सत्याग्रहाचे आंदोलन अशा रीतीनें एकाएकीं बंद करण्यांत आल्यामुळें निराश झालेल्या क्रांतिकारकांनीं पुन्हां आपला कार्यक्रम सुरू केला. बंगालमध्यें आणि कलकत्ता शहरांतच त्यांनीं आपल्या कार्याचा श्रीगणेशा केला. राजकीय दरोडे इतके झपाट्यानें पडूं लागले कीं बंगालचे गव्हर्नर लॉर्ड लिटन ह्यांचे आसन हादरूं लागलें. १२ जानेवारी १९२४ ला गोपीनाथ राहा ह्या तरुणानें कलकत्त्याला पोलिस कमिनशर टॅगर्ट ह्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला पण गैरसमजुतीमुळें :त्याच्या गोळीला मि. डे हेच बळी पडले. साऱ्या देशभर ह्याघटनेची विलक्षण चर्चा सुरू झाली. महात्मा गांधी आणि देशबंधु दास ह्यांची ह्या प्रकारासंबंधीं परस्परविरोधी पत्रकें प्रसिद्ध झालीं. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटींतही दोन तट पडले. सरकारी अधिकाऱ्यांचे खून वाढत्या प्रमाणांवर होऊं लागले. सरकारनें नेहमींचा कायदा बाजूला ठेवून १८१८ चे तिसरे रेग्युलेशन आणि बंगालचा वटहुकुम ह्यांचा सर्रास उपयोग केला. सर्व बंगालभर झडत्या आणि धरपकडीचें सत्र सुरूं झाले. त्यांत सुभाषबाबू पकडले गेले. एकंदर १२६ तरुणांस स्थानबद्ध करण्यांत आलें. कानपुर आणि मिरतचे सुप्रसिद्ध खटले झाले. गुप्तवेषांत हिंदुस्थानांत परतलेले एम्. एन. रॉय ह्यांना मुम्बई येथें पकडण्यांत येऊन कानपुर येथें त्यांच्यावर खटला चालवण्यांत आला. मिरत आणि कानपुरचे खटले हे साम्यवादी चळवळीच्या रूपानें पुन्हां फोफावणाऱ्या क्रांतीलाच दडपून टाकण्यासाठीं होते. पंजाबमध्यें अकाली दल ही एक नवी क्रांतिकारक संघटना खडी झाली होती. पंजाबमध्यें विशेषतः दुआबमध्यें भयंकर असंतोष पसरत होता. पण कुकांबंडाप्रमाणेंच ही चळवळही शिखांपुरतीच मर्यादित राहिली. ‘ बब्बर अकाली ’

नांवाचे वर्तमानपत्र पण निघालें होतें. १८५७ प्रमाणेच सैन्यांत बंड करून हिंदुस्थान स्वतंत्र करायचा असा ह्या दलाचा स्पष्ट उद्देश होता. पोलीसला माहिती देणाऱ्या पोलिसच्या गुप्त हेरांना त्यांनीं डझनांनीं ठार मारलें. पोलिसांबरोबर त्यांच्या जवळजवळ युद्धस्वरूपाच्या अनेक चकमकी झाल्या. दलाचा जोर वाढतच राहिला. त्यांच्यावर जो पहिला खटला भरण्यांत आला त्यांत ९१ आरोपी होते. पांच फाशी देण्यांत आले. १२ ना आजन्म काळ्यापाण्याची शिक्षा झाली व ३८ आरोपींना वेगवेगळ्या शिक्षा झाल्या. अपीलांत आणखी एकाला फांशीची शिक्षा देण्यांत आली. २६ फेब्रुआरी १९२६ ला सर्वांना एकदम फांशी देण्यांत आलें. नंतर इतकी भीषण दडपशाही करण्यांत आली कीं सरकारी अत्याचारांची चौकशी करण्यासाठीं कॉंग्रेसला एक कमिटी नेमावी लागली.

मद्रासमध्यें श्रीराम राजू यांनींही अशाच रीतीनें एक क्रांतिकारक दल उभारून पोलिसांशीं अनेक वेळां सामना दिला. त्यांचे रक्त सांडलें. अनेक अधिकाऱ्यांना ठार मारलें. श्रीरामला अखेरपर्यंत पोलिसांना पकडतां आलें नाहीं.

बंगालमध्यें पुन्हां या प्रवृत्तींना तेज आलें. १९२५ मध्यें दक्षिणेश्वर बॉंब कटाचा खटला झाला. ६ ऑगस्ट १९२५ ला काकोरी येथें प्रचंड स्फोट झाला. त्यांत अशफाक उल्लाखां, श्री. रामप्रसाद बिस्मिल, श्री. राजेंद्र लहरी व ठाकूर रोशनसिंह शहीद झाले. या स्फोटाची योजना ' हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशननें ' केली होती. या नव्या संघटनेचा प्रसार सर्व प्रांतभर झाला होता. धांवत्या गाडीवर दरोडा पडल्यानंतर सर्व प्रांतांतून तसेंच बंगालपासून पुण्यापर्यंत धरपकड करून ४० तरुणांना पकडण्यांत आलें. त्यापैकीं खटला २८ वर चालविण्यांत आला. कांहीं बेपत्ता राहिले ते अखेरपर्यंत सांपडलेच नाहींत ! या खटल्यांत पाच तरुणांना फांशी व तेरा तरुणांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा देण्यांत आल्या. सरकारनें या शिक्षांविरुद्ध अपील केल्यामुळें त्या आणखी वाढविण्यांत आल्या.

पंजाबमधील तरुणांचे रक्त पुन्हां सळसळूं लागलें. त्यांनीं ' नवजवान भारत सभेची ' स्थापना केली. संयुक्त प्रांतांतील ' हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन ' व बंगालमधील क्रांतिकारक गटांशीं त्यांनीं संबंध जोडला. बिहारमध्येंही त्यांनीं

कांहीं सहकारी मिळविले. या सर्व अलग अलग प्रांतिक संघटनांना एकत्र करून त्यांची एक सर्वसामान्य 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी' नांवाची केंद्रीय संस्था बनविण्यांत आली. या संघनेचे मध्यवर्ती केंद्र झांशी हें ठरविण्यांत आलें. प्रत्येक प्रांताकरतां निरनिराळे कार्यकर्ते निश्चित करण्यांत आले. सरदार भगतसिंग यांच्याकडे सर्व कार्यकर्त्यांशीं संबंध ठेवण्याचे काम देण्यांत आलें. सैनिक विभागाची जबाबदारी चंद्रशेखर आझाद यांच्यावर सोपविण्यांत आली. वेळोवेळीं कार्यक्रम ठरविला जात असे. काकोरी कटाच्या खटल्यांतील वंदीना तुरुंगांतून सोडविणें, सायमन कमिशनची गाडी उलथून पाडणें, काकोरी खटल्यांत सरकारी साक्षीदार झालेल्यांना देहान्त प्रायश्चित्त देणें, लाहोर, कलकत्ता, आग्रा आणि सहराणपूर येथें बाँब बनविण्याचे गुप्त कारखाने चालविणें, पंजाबचे सिंह लाला लजपतराय यांच्यावर झालेल्या प्राणांतिक लाठीहल्ल्याचा सूड उगविण्यासाठीं लाहोरचे पोलिस सुपरिंटेंडेंट मि. स्कॉट यांचा खून करणें व निधी जमविण्यासाठीं राजकीय दरोडे घाळणें इतका कार्यक्रम निश्चित करण्यांत आला होता. ता. २७ डिसेंबर १९२९ रोजीं मि. स्कॉट ऐवजी गफलतीनें मि. सॉंडर्स यांच्यावर भर दिवसा हल्ला करण्यांत आला. गोळी झाडणाऱ्यांचा पाठलाग करणारे मि. फर्म व एक पोलिस कान्स्टेबल चावनसिंह यांच्यावरही हल्ला करणाऱ्यांनीं गोळया झाडल्या. हे दोघेही घायाळ होऊन मरण पावले. पोलिसांनीं खुनी लोकांना पकडण्यासाठीं आटोकाट प्रयत्न केले पण कोणीही सांपडले नाहीं. ८ एप्रिल १९२९ ला दिल्लीला मध्यवर्ती असेंब्लींत अमर शहीद सरदार भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी बाँब फेकून आत्मसमर्पण केलें तेव्हांच या संघटनेंतील दोन व्यक्ति प्रथम पोलिसांना पकडतां आल्या. त्यांना काळयापाण्याची शिक्षा झाली. दसऱ्याला लाहोर येथें आणखी एक बाँब फेकण्याचा प्रकार झाला. गुप्त पोलिस खात्याची हालचाल जोरांत सुरू झाली. लाहोर येथें सुखदेव, किशोरिलाल आणि जयगोपाळ प्रभृतींना ता. १५ एप्रिल १९२९ ला पोलिसांनीं अटक केली. जयगोपाळ, हंसराज बोहरा व इतर पांच व्यक्ति माफीचे साक्षीदार झाले. धरपकडीचा धडाका देशभर उडाला. आंतर्प्रांतीय स्वरूपाचा हा पहिलाच कट होता. या कटाचे जाळें सर्व उत्तर भारत, पंजाब, दिल्ली, बंगाल, सं. प्रांत

व बिहारमध्यें पसरलें होतें व या सर्व प्रांतांत अनेक तरुण पकडले गेले. एकंदर ३२ तरुणांवर खटला भरण्यांत आला. ७ माफीचे साक्षीदार झाले व १६ अखेर-पर्यंत फरारी राहिले. या खटल्याचा सविस्तर इतिहास येथें देतां येत नाहीं. सरकारनें खटल्याचें 'यश' निश्चित करण्यासाठीं हीं आगावू तरतूद केली. एक खास वटहुकूम जारी करून खटल्यासाठीं खास ट्रिब्यूनल नेमण्यांत आलें. या ट्रिब्यूनलनें ७ आक्टोबर १९३० ला सरदार भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु या तिघांना फांशीची शिक्षा दिली. सात ८ तरुणांना जन्मठेपीची व तिघांना दीर्घ मुदतीच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. बाकीच्यांना सोडून देण्यांत आलें. याच सुमारास यतींद्रनाथ दास यांनीं तुरुंगांत राजबंद्यांच्या हक्का-साठीं आपला ऐतिहासिक अन्नत्याग सुरू केला. ६५ दिवसाच्या अन्नत्यागानंतर यद्रतींनाथ अमर शहीद झाले. गांधी–अर्विन करार झाला असतांही ता. २३ मार्च १९३१ ला संध्याकाळीं ७॥ वाजतां भगतसिंग प्रभृती तीन वीरांना फांशी देण्यांत आलें. त्यांचीं प्रेतेंही त्यांच्या आप्तस्वकीयांना न देतां चोरटेपणानें सतलज नदीवर नेऊन गुपचुप जाळण्यांत आलीं.

मध्यंतरीच्या काळांत ता. २६ डिसेंबर १९२९ ला दिल्लीला व्हाईसरॉयची गाडी उडवून देण्याचा प्रयत्न झाला होता. लाहोर येथें भगवतीचरण बॉंब भरीत असतां स्फोट होऊन मरण पावला. पंजाबच्या अनेक शहरांत बॉंबचे स्फोट झाले. दुसरेही अनेक प्रयत्न झाले परंतु ते बहुतेक निष्फळ ठरले. पोलि-सांनीं आणखी धरपकड करून ३६ तरुणांवर खटला भरला. या खटल्यांतील सर्व आरोपी पंजाबमधील होते. १४ 'आरोपी' फरारी झाले. त्यां चौदांतच चंद्रशेखर आझाद, यशपाल, श्रीमती दुर्गा व कुमारी सुशीला हे प्रसिद्ध क्रांति-कारक होते. श्रीमती दुर्गा व सुशिला 'भाभी' व 'दीदी' या नांवानें अधिक प्रसिद्ध होत्या. हा खटलाही खास ट्रिब्यूनलपुढें चालला. या खटल्यांत पांच माफीचे साक्षीदार निघाले.

दिल्लीला चौदा तरुणांना अटक करून कटाच्या खटल्याचें नाटक रचण्यांत आलें. पण अखेर तीन साधेच खटले चालविण्यांत आले व कांहीं कार्यकर्त्यांना स्थानबद्ध केलें. या दिवसांत दिल्लीच्या गजिदिया स्टोअरवर एक धाडसी दरोडा पडला व चौदा हजार रुपये चोरीला गेले.

या कालखंडांतील अत्यंत हृदयविदारक ऐतिहासिक महत्त्वपूर्ण घटना ता. २७ फेब्रुआरी १९३१ रोजी १० वा. अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्यें घडली. सुखदेवराज आणि चंद्रशेखर आझाद यांना पोलिसांनीं एकत्र हिंडतांना पाहिलें. तावडतोब पार्कला पोलिसांनीं घेरलें. दोन्ही बाजूंनीं गोळीबार सुरू केला. पोलिसांशीं लढतां लढतां चंद्रशेखर आझाद त्यांच्या गोळीला बळी पडले. सुखदेव मात्र अशाही परिस्थितींत पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरारी झाला. क्रांति-दलाचा एक महान् सेनापती त्या पवित्र स्थलीं अनन्त निद्रा घेत आहे. चंद्र-शेखर जखमी झाल्यानंतर त्यांनीं ज्या झाडाचा आधार घेतला होता तें झाड-सुद्धां पोलिसांनीं तोडून टाकलें. शहीद आझादांची स्मृतिसुद्धां या झाडानें कोणाला होऊं नये अशी उन्मत्त पोलिस अधिकाऱ्यांची इच्छा होती. या वीरतापूर्ण व साहसमय घटनेची आठवण देणारी एकही खूण त्यांना मागें ठेवायची नव्हती. ते अधिकारी काय हुतात्म्याचें शव लोकांना थोडेच देणार होते !

लाहोरच्या शालीमार बागेंत सुखदेवचा पुन्हा पोलिसांशीं सामना झाला. यावेळीं त्यांच्यावरोबर जगदीश होते. या चकमकींत जगदीश ठार झाले आणि सुखदेव गिरफदार केले गेले. १३ डिसेंबरला तिघांना फांशी, दोघांना काळेपाणी व इतरांना मोठमोठ्या शिक्षा देण्यांत येऊन उरलेल्या पांच आरोपींना सोडून देण्यांत आलें.

गांधीजींची दांडी-यात्रा व नंतर झालेला मिठाचा सत्याग्रह यांनीं जो अहिंसा-त्मक क्रांतीचा कालखंड सुरू केला होता तो गांधी-अर्विन करारानें समाप्त झाला. गांधीजी गोलमेज परिषदेला निघून गेले. पण इकडे हिंदुस्थानांत वट-हुकुमांचें राज्य कायम होतें. पुढाऱ्यांची धरपकड होत होती. त्यामुळें अहिंसा-त्मक व हिंसात्मक अशा दोन्ही प्रकारच्या चळवळींना पुन्हा तेज भरलें. बंगाल, बिहार, संयुक्तप्रांत आणि पंजाबमध्यें अनेक छुपे हल्ले झाले. १९३० सालांत बंगालमध्येंच एकंदर ३६ खून झाले होते. दरोडेही पडत होते. २३ डिसेंबर १९३० ला पंजाब युनिव्हर्सिटीच्या सभागृहांत मरदानचे हरेकृष्ण यांनीं गव्हर्नरांवर पिस्तूल झाडलें. गव्हर्नरांना साधारण जखमा झाल्या व इतरही कांहीं लोक घायाळ झाले. या प्रकरणांत ज्यांना अटक करण्यांत आली त्यांत

श्री. रणवीर, श्री. वीरेन्द्र व श्री. महसान इलाही हे प्रमुख होते. हरिकृष्णला ता. ९ जून १९३१ ला फांशी देण्यांत आले. रणवीर, दुर्गादास आणि चमनलाल यांनाही फांशीची शिक्षा झाली होती पण हायकोर्टांत ती कमी करण्यांत आली.

बिहारमध्यें श्री. योगेन्द्र शुक्ल हे क्रांतिकारक चळवळीचे अग्रेसर पुढारी होते. ता. ११ जून १९३० ला त्यांना मलखाचक गांवीं आश्रमांत रात्रीं झोंपले असतांना पकडून नेण्यांत आलें. त्यांच्या बिछान्यांत व उशींत लपविलेले दोन भरलेले रिवॉल्व्हर्स व तीन पिस्तुलें पोलिसांना झडतींत सांपडलीं. योगेंद्रांना २२ वर्षांची शिक्षा देण्यांत आली. मुंबई येथें ता. ९ आक्टोबर १९३० ला लॅमिंग्टनरोडवर एक दहशतवादी हल्ला झाला. त्यासंबंधांत १२ तरुणांवर खटला भरण्यांत आला. पण सेशनमध्यें सर्वांना सोडून देण्यांत आले. दिल्ली, सिंध व ब्रम्हदेशांतहीं असे कांहीं प्रकार घडले.

या सर्व प्रकारांतील अत्यंत धाडसी व भीषण घटना १८ एप्रिल १९३० रोजीं झाली. ५१ तरुणांनीं रात्रीं ९॥ ते १०॥ चे दरम्यान चित्तागांगच्या शस्त्रागारांवर हल्ला चढविला. त्यांनीं आपल्या चार तुकड्या केल्या होत्या व चार बाजूंनीं त्यांनीं शस्त्रागारावर हल्ला केला. टेलिफोनच्या तारा तोडण्यांत आल्या, रेल्वेचे रूळ उखडण्यांत आले, शस्त्रागाराची लूट करण्यांत आली. पोलिसांचे व लष्कराचे असे दोन्ही शस्त्रागार लुटले गेले. गुरखा फौज प्रतिकारासाठीं येतांना हल्ला करणारे डोंगरांत पळून गेले. फौजेनें त्यांचा पाठलाग केला. डोंगराला फौजेचा वेढा पडला, दोन्ही बाजूंनीं गोळ्यांचा मारा सुरू झाला. हल्ला करणाऱ्या तरुणांपैकीं १९ या चकमकींत जागच्या जागींच गोळीबारांत ठार झाले. ५० सैनिकही मारले गेले. फौजेला माघार घ्यावी लागली. पण पुन्हां तिप्पट फौज घेऊन क्रांतिकारकांवर चढाई करण्यांत आली. कर्फ्यू ऑर्डर लागू करण्यांत आली, झडत्या आणि धरपकडीला सुरवात झाली. हें 'युद्ध' तीन चार दिवसपर्यंत चाललें होतें. क्रांतिकारकांजवळ शिधासामुग्री नव्हती. ता. २२ एप्रिलला तहान–भुकेनें हैराण होऊन त्यांनीं प्राणान्तिक सामना करायचें ठरविलें. अनेक 'लढाया' झाल्या. ६ मेला कलारपोल येथें चकमक झाली. ६–७ तरुण या चकमकींत ठार झाले; नंतर चंद्रनगरमध्यें पुन्हां एक चकमक झाली. अखेर २४ युवकांना पकडून खास ट्रिब्यूनल पुढें त्यांच्यावर खटला चालविण्यांत आला. केवळ चितागांगलाच

नव्हे तर सर्व बंगाल प्रांतांत भीषण दडपशाही सुरू झाली. क्रिमिनल लॉ अमेंड-मेंट कायद्याचाच अंमल जारी झाला. ३० ऑगस्ट १९३१ ला चितागांगमध्यें लुटालूटही करण्यांत आली. १ मार्च १९३२ ला शस्त्रागारावरील हल्ल्याच्या खटल्यांत १२ नां काळयापाण्याची व दोघांना दोन-दोन तीन तीन वर्षांची शिक्षा देण्यांत आली. १६ निरपराध म्हणून सुटल्यावरही त्यांना बंगाल वटहुकुमा-खालीं स्थानबद्ध करण्यांत आले.

ता. २५ ऑगस्ट १९३० ला कलकत्त्याचे पोलिस कमिशनर मि. टैगर्ट यांच्या मोटारीवर बॉंब फेकण्यांत आला. या बाबतींत २६ घरांची झडती घेण्यांत आली. दीनेशचंद्र मुजुमदार यांना या खटल्यांत काळयापाण्याची शिक्षा मिळाली. वीस इतर तरुणही पकडले गेले होते. याशिवाय डाक्का, मैमनसिंग आणि चांदपूर येथेंही कांहीं दहशतवादी प्रकार घडले. ८ डिसेंबर १९३० ला कलकत्त्याला रॉयटर्स बिल्डिंगमध्यें तुरुंगखात्याचे इन्स्पेक्टर जनरल सिम्प्सन यांच्यावर तीन तरुणांनीं नऊ गोळया झाडल्या. ते जागच्या जागींच ठार झाले. रॉयटर्स बिल्डिंगमध्यें गोंधळ उडाला. सर्व लोक भयभीत झाले. चारी बाजूला भराभर गोळया सुटत होत्या. अखेर तीन्ही तरुणांनीं तेथेंच आत्म-हत्त्या करण्याचा प्रयत्न केला. त्यापैकीं सुधीरकुमार गुप्त तेथेंच मरण पावला, विनयकृष्ण हॉस्पिटलमध्यें मेला आणि दीनेशला औषधोपचार करून वांचविण्यांत आलें. या खुनासाठीं कलकत्ता, डाक्का व चितागांग येथें धरपकड करण्यांत आली. दीनेशला ता. २ फेब्रुवारी रोजीं फांशीची शिक्षा देण्यांत आली. वीस वर्षांचा हा कोंवळा तरुण ता. ८ जुलैला फांसावर लटकला. बंगाल सरकारच्या रिपोर्टांत असें नमूद केलें आहे कीं; १९३० मध्यें दहा पोलिस अधिकाऱ्यांचे खून झाले. चारशें लोक घायाळ झाले. वटहुकुमान्वयें ४५४ लोकांना अटक झाली व ५८ लोकांना फांशीची व इतर दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या.

१९३१ मध्यें संयुक्तप्रांतांत कानपूर, बनारस, खेरी इत्यादि ठिकाणी पोलि-सांनीं झडत्या घेतल्या. त्या झडत्यांत कांहीं आक्षिप्त साहित्य सांपडले व एक खटलाही भरण्यांत आला. पंजाबमध्यें ५ दहशतवादी हल्ले होण्याचा क्रम चालूंच होता. तिसऱ्या लाहोर कटाचा खटला झाला. ५ जानेवारी १९३२ ला

पाटणा येथें अकरा तरुणांवर राजद्रोहाच्या कटाचा खटला भरण्यांत आला. या खटल्यांतील योगेन्द्र शुक्ल वगैरे आरोपी फरारी होते. अनेक तरुणांना काळ्यापाण्याची व दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. मुंबई प्रांतांतही कांहीं बॉंब फुटले. भुसावळला एक बॅंबफेक झाली. २२ जुलैला पुणें येथें त्यावेळीं हंगामी गव्हर्नर झालेले सर अर्नेस्ट हॉटसन यांच्यावर वासुदेव बळवंत गोगटे यांनीं फर्ग्यूसन कॉलेजमध्यें गोळया झाडल्या. अजमीर, इन्दूर, दिल्ली, मीरत व कराची येथेंही अशा घटना घडल्या. बंगालमध्यें ७ एप्रिलला जिल्हा मॅजिस्ट्रेट मि. जेम्स पेड्डी यांच्यावर गोळया झाडण्यांत आल्या. दुसऱ्या दिवशीं ते इस्पितळांत मरण पावले. एकामागून एक तीन जिल्हा मॅजिस्ट्रेटचे अशा प्रकारे खून पडले. ३० एप्रिल १९४२ ला मि. डग्लस यांच्यावर २ सप्टेंबर १९३३ ला. मि. बर्ज यांच्यावर सहा गोळया सोडण्यांत आल्या. मि. डग्लस यांच्यावर म्युनिसिपल कचेरींत हल्ला झाला तर बर्ज यांच्यावर फूटबॉलच्या मैदानावर. अलीपूरचे सेशन जज्ज, डाक्याचे कमिशनर व कलेक्टर, युरोपिअन असोसिएशनचे अध्यक्ष मि. विलिअर्स व त्रिपुराचे जिल्हा मॅजिस्ट्रेट यांच्यावर असेच प्राणघातक हल्ले झाले. खून आणि दरोडे अगदीं नित्याचेच प्रकार होऊं लागले. त्रिपुराचे जिल्हा मॅजिस्ट्रेट मि. सी. जी. बी. स्टीव्हन्स यांच्यावर ता. २४ डिसेंबर १९३१ ला गोळया झाडणाऱ्या दोन तरुणी होत्या. कुमारी शान्ती घोष आणि सुनीती चौधरी यांना आजन्म काळ्यापाण्याची शिक्षा देण्यांत आली. याच खुनाच्यासंबंधात श्रीमती इन्दुमती सिंह यांनाही अटक झाली होती.

या खुनामुळें गोऱ्या अधिकाऱ्यांचीं माथीं भडकून गेलीं व त्यांनीं पिसाटाप्रमाणें उलट प्रहार करायला सुरवात केली होती. अधिकाऱ्यांकडून झालेल्या अशा प्रकारांपैकीं ता. १६ डिसेंबरला हिजली येथें स्थानबद्धांच्या कॅंपमध्यें घडलेला अत्याचार अत्यंत अमानुष आणि भीषण होता. रात्रीं १० वा. छावणींत सर्व कैदी जेवण करीत असतां या निःशस्त्र, निरपराध व निःसहाय कैद्यांवर एकाएकीं भयंकर गोळीबार करण्यांत आला. या गोळीबारांत अठरा राजबंदी जखमी झाले. सन्तोषकुमार मित्र आणि ताडकेश्वर सेन हे ठार झाले, शहीद झाले. सुभाषबाबूंच्याच प्रयत्नामुळें या दोन शहीदांचीं प्रेतें कलकत्त्याला आणलीं गेलीं.

जनतेनें हुतात्म्यांच्या शवांची प्रचंड मिरवणूक काढून सन्मानपूर्वक सर्व अंत्य-संस्कार केले. या गोळीबारासंबंधीं सरकारी चौकशीच्या रिपोर्टांतसुद्धां हें कबूल करावें लागलें कीं, गोळीबार कांहींही योग्य कारण नसतां करण्यांत आला. परतंत्र देशांत गुलामांच्या आयुष्याची किंमत हीच वस्तुस्थिति आहे. बंगालमध्यें क्रिमिनल लॉ ऑर्डिनन्स लागू करण्यांत आला. प्रांतभर दडपशाही, धरपकड, झडत्या, संशयावरून स्थानबद्धता हे प्रकार सुरू झाले. दडपशाहींतून बंगाल एक कानाकोपरासुद्धां वांचला नसेल.

१९३२ मध्यें पुन्हां सामुदायिक कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यामुळें दहशतवादी चळवळीचा भर ओसरला. ३२ च्या अहिंसात्मक उठावांत कमीत कमी ७० हजार स्त्रीपुरुष तुरुंगांत गेले. अलाहाबाद येथें याच सुमारास हिंदी नांव धारण केलेल्या सावित्रीदेवी या आयरीश स्त्रीच्या घरीं यशपाल यांना पोलिसांनीं पकडले. यशपालनां चौदा वर्षांची सजा मिळाली. श्रीमती सावित्रीदेवींना पांच वर्षें तुरुंगवास लाभला! कानपूर, बनारस आणि लखनौ येथेंही झडत्या व धरपकड झाली. पण दहशतवादाचा विशेष जोर याही वर्षीं एकंदर बंगाल-मध्येंच अधिक होता. ६ फेब्रुआरी १९३२ ला गव्हर्नर सर स्टॅनले जॅकसन यांच्या पदवीदान समारंभाचे प्रसंगीं कुमारी वीणा दास यांनीं पिस्तुल झाडलें. स्टेटस्‌मनचे संपादक सर आल्फेड वॉटसन यांच्यावर भर दुपारीं तीन वाजतां त्यांच्या कचेरींत गोळ्या झाडण्यांत आल्या. केवळ दैवयोगानेंच ते वांचले. चित्तागांग येथील युरोपिअन क्लबवर ता. २४ डिसेंबरला रात्रीं बॉंब फेकण्यांत आला. अशा रीतीनें दरोडे व खून यांचे प्रकार घडत होते. संशयित तरुणांची सरसहा धरपकड होत होती. त्यांना ठेवण्यासाठीं अजमेर–मेरवाडमधील देवळी येथें एक खास छावणी उघडण्यांत आली. देवळीला प्रारंभीं १०० व नंतर १०० स्थानबद्ध होते. पोलिसखात्याच्या अहवालांतील माहितीप्रमाणें या वर्षीं दहशतवादाचे एकंदर ७४ प्रकार घडले. ७३० लोकांना अटक झाली. १६–१७ शें लोकांना स्वतःच्या गांवीं, घरांत अथवा स्थानबद्धांच्या छावणींत अडकवून ठेवण्यांत आलें.

ब्रह्मदेशांतील थारावड्डी बंडाळी याच सालीं झाली. हें बंड चिरडून टाकण्या-साठीं इंग्रज व हिंदी फौजांनीं नृशंस अत्याचार केले. हें बंड ब्रिटिश सत्ता

उलथून पाडण्याच्या उघड उद्देशानें करण्यांत आलें होतें. ठिकठिकाणीं दोन्ही बाजूंकडून आक्रमण करण्यांत आलें. मशिनगन् व बंदुकांचा उपयोग दोन्ही पक्षांनीं केला. सरकारी अहवालानुसार या बंडांत दोन हजार बंडवाले मारले गेले व दहा—बारा हजारांनीं आत्मसमर्पण केलें. अनेकांना फांशीची व काळ्या-पाण्याची शिक्षा झाली. या बंडानंतरच ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून अलग करण्यांत आला.

मीरतमध्यें १९२९ मे मध्यें सुरू झालेल्या कटाच्या खटल्याचा निकाल ४॥ वर्षांनीं १६ जानेवारी १९३३ ला लागला. या खटल्यांत निरनिराळ्या प्रांतांतील ३२ आरोपी गोवण्यांत आले होते. सरकारनें या खटल्यासाठीं ३८ लक्ष रुपये खर्च केले. खटल्याच्या निकालांतील न्यायाधीशांचें वक्तव्य ६०६ पानांचें आहे. या खटल्यांतील आरोपींपैकीं फक्त चार सुटले. बाकी सर्वांना आजन्म काळ्यापाण्याच्या व इतर मोठ्या शिक्षा देण्यांत आल्या. पण हायकोर्टापुढें झालेल्या अपीलांत बरेचसे निर्दोषी सुटले व इतरांच्या शिक्षा पुष्कळच कमी करण्यांत आल्या.

बिहारमध्यें १९३३ सालांत गया, झरिया, छपरा, भागलपूर व रांची येथें अनेक बॉंबचे स्फोट झाले. बॉंब स्फोटाबद्दल अनेक खटले झाले. कांहीं तरुण बंदिवासांत गेले. कांहीं हत्या झाल्या. मद्रास इलाख्यांत उटकमंड येथें बँकेवर दरोडा पडला. चितागांग येथील ठाणेदाराचा खून झाला. श्रीमती कल्पना दत्त प्रभृति तीन फरारी दहशतवाद्यांना अटक करण्यांत आली. श्रीमती कल्पना दत्त यांना काळ्या पाण्याची व इतरांना फांशीची शिक्षा देण्यांत आली. कॉर्नवालिस स्ट्रीटवर पोलिस व दहशतवादी तरुण यांच्यांत समोरासमोर सामना झाला. व दोन्ही पक्षांनीं एकमेकांवर गोळ्या झाडल्या. अलिपूर येथें ३८ तरुणांवर राज-द्रोहाचा खटला भरण्यांत आला. या तरुणांना संयुक्त प्रांत, पंजाब, ब्रह्मदेश आणि बंगाल या निरनिराळ्या प्रांतांतून पकडून आणले होते. चितागांग आणि मिदानापूर जिल्ह्यांत सरकारच्या भीषण दडपशाहीनें थैमान घातलें. लोक अत्यंत भयभीत झाले होते. रायकीय दडपशाहीसाठीं फक्त हिंदूंना वेगळे काढायचे व मुसलमान सोडून दडपशाहींतून अलग ठेवायचे या धोरणाचा अवलंब या

सालापासून आणि येथून करण्यांत आला. १५ ते २५ वर्षांच्या तरुणांना रात्रीं घराबाहेर पडायची बंदी करण्यांत आली व दिवसासुद्धां त्यांना परवान्या-शिवाय घराबाहेर कोठेंही जातां येत नसे. शाळांवर विशेष कडक निर्बंध लादण्यांत आले. विद्यार्थ्यांच्या व तरुणांच्या पालकांना आपल्या मुलांवर अत्यंत कठोर नियंत्रण ठेवण्याचे हुकुम बजावण्यांत आले. चितागांगमध्यें तर खास लष्करच ठेवण्यांत आलें. हें लष्कर तेथें दोन वर्षे होतें व त्यासाठीं अडीच लाख रुपये खर्च केले गेले. मिदनापूरवरही असाच जुलुम करण्यांत आला. कांहीं नवे कायदेही करण्यांत आले. नागरिकांना दहशतवादाविरुद्ध प्रचार करण्याचें काम देण्यांत आलें. इतकी दडपशाही व जुलुम होत असतांनाही मधून मधून बॉंबचे स्फोट होत होते. ता. ८ मेला बंगालचे गव्हर्नर सर जॉन अँडरसन यांचा खून करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. दोन तरुणांनीं त्यांच्यावर अगदीं जवळून गोळ्या झाडल्या. पण त्या गव्हर्नरांना मारूं शकल्या नाहींत.

१९३४ मध्यें इंदूर येथें चौतीस तरुणांच्या एका टोळीवर राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. या गटाचें संघटन ' स्वतंत्र भारत समिती ' आणि ' स्वतंत्र भारत संघ ' यांनीं केलेलें होतें. पंडित राधेशाम त्यांचे पुढारी होते. धार येथेंही याच गटाच्या आणखी तेरा तरुणांवर खटला भरण्यांत आला. दोन्ही खटल्यां-तील तरुणांना मोठमोठ्या शिक्षा देण्यांत आल्या.

१९३५ मध्येंही बंगालच्या मैमनसिंह, फरीदपूर, राजशाही, चितागॉंग, डाक्का, बांकुडा, वीरभूमी, जेसोर, मिदनापूर, त्रिपुरा, नोआखाली, मुर्शिदाबाद इत्यादि भागांत दहशतवादी प्रवृत्तींचा प्रभाव आढळून येत होता. अनेक ठिकाणीं त्यांच्या कार्याची सामुग्री सांपडली. या वर्षी २४१८ तरुणांना स्थानबद्ध करण्यांत आलें. बलियामध्यें राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. या खटल्यांत आझम-गढचा १२० वर्षांचा एक म्हातारा लोहारही होता. त्याला चार वर्षांची शिक्षा देण्यांत आली.

१९३६ मध्यें देशाच्या राजकीय वातावरणांत अत्यंत महत्त्वाचें परिवर्तन घडून आलें. कॉंग्रेसनें सत्याग्रहाची चळवळ मागें घेऊन कायदेमंडळांतील कार्यक्रम हातीं घेतला होता. बिहार धरणीकंपानंतर पटणा येथें अ. भा. कॉं.

कमिटीची महत्वाची बैठक झाली. कॉंग्रेसनें १९३५ च्या कायद्यानुसार होणाऱ्या प्रांतिक निवडणुका लढविल्या व त्यांत प्रचंड यश संपादन केलें. अकरांपैकीं सात प्रांतांत कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. कॉंग्रेसनें आपल्या निवडणूक-जाहीरनाम्यांतच सर्व राजबंद्यांची, दहशतवादी क्रांतिकारकांचीही सुटका करण्याचें आश्वासन दिलें होतें. परंतु या धोरणाची अंमलबजावणी कॉंग्रेस-मंत्र्यांनीं सुरू करतांच त्यांना गव्हर्नरांचा विरोध होऊं लागला. संयुक्त प्रांताचे मुख्य प्रधान पं. गोविंद वल्लभपंत आणि बिहारचे मुख्य प्रधान श्रीकृष्ण सिंह यांनीं राजीनामा दिला. सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या कॉंग्रेसच्या हरिपुरा येथील अधिवेशनानें या राजिनाम्याचें समर्थन केलें. सरकारला माघार घ्यावी लागली व राजबंदी बिनशर्त सुटले. अन्दमान येथें ठेवलेल्या काळ्या पाण्यावरील बंदीमध्येंही यावेळीं तीव्र असंतोष पसरला होता. २४० राजबंद्यांनीं हिंदुस्थानसरकारकडे एक निवेदन पाठविलें व २४ जुलै १९३७पासून त्यांनीं अन्नत्याग सुरूं केला. या अन्न-त्यागांत एकंदर २२५ राजबंदी सामील झाले होते. अन्नत्यागांत श्री. महावीरसिंग मरण पावले. देशभर अन्दमानच्या राजबंद्यांची सुटका व्हावी म्हणून चळवळ सुरू झाली. त्यांना तावडतोब हिंदुस्थानांत परत आणण्यांत यावे अशी मागणी करण्यांत आली. या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठीं खास दिवस निश्चित करण्यांत आला. त्या दिवशीं हिंदुस्थानभर प्रचंड निदर्शनें झालीं. देवळी येथील राज-बंद्यांनींही अंदमानच्या देशभक्तांविषयीं सहानुभूती दर्शविण्यासाठीं अन्नत्याग केला. बंगाल असेंब्लींत व मध्यवर्ती असेंब्लींत अंदमानच्या राजबंद्यांची सुटका करण्याची मागणी ठरावरूपानें मांडण्यांत आली. अंदमानच्या राजबंद्यांच्या प्रश्नाला महात्मा गांधी व कॉंग्रेस वर्किंग कमिटीनेंही संपूर्ण साथ दिली. गांधी-जींनीं व्हाइसरॉयना तारा पाठविल्या. महात्माजींच्या आदेशानुसार अंदमानच्या राजबंद्यांनीं अन्नत्याग सोडला. त्यांनीं गांधीजींना कळविलें, "आम्ही आपल्याला व आपणाकडून सर्व देशाला असें कळवूं इच्छितों कीं, आमच्यांपैकीं कोणाचाच आतां दहशतवादावर विश्वास उरलेला नाहीं. राजकीय शस्त्र म्हणून अथवा एक उद्देश म्हणून दहशतवादाची विफलता त्यांना पूर्णतया पटली आहे. आम्ही आणखी असें स्पष्ट जाहीर करतों कीं, दहशतवादानें देशाच्या कार्याला मदत होणार नसून उलट तो अडथळे निर्माण करणारा आहे ! ! दहशतवाद्यांची ही

घोषणा म्हणजे सरकारनें दहशतवाद्यांवर मिळविलेला विजय नसून गांधीजींच्या अहिंसेचा हिंसेवर व कॉंग्रेसच्या सत्याग्रहवादाचा दहशतवादावरील महान् ऐतिहासिक विजय होता. त्यामुळें कॉंग्रेस मंत्रिमंडळाला राजबंद्यांची सुटका करणें सुकर झालें. अंदमानच्या सर्व राजबंद्यांना परत आणण्यांत आलें. देवळी कॅंप बरखास्त करण्यांत आला. बंगालचा प्रश्न बिकट होता. गांधीजी तीन महिनेपर्यंत कलकत्त्याला येऊन राहिले. त्यांनीं आजारी असतांही मुख्य प्रधान व गव्हर्नरांच्या मुलाखती घेतल्या. एप्रिल १९३७ मध्यें राजबंदी व स्थानबद्धांची संख्या तीन हजारांवर होती. चितगांगमध्यें २१३८२ लोकांवर परिचय–पत्रावर हिण्डण्याफिरण्याची मनाई करणारा हुकुम लादलेला होता. महात्माजींच्या प्रयत्नानें ११०० कैदी तावडतोब सोडण्यांत आले. ४५० बंद्यांच्या बाबतींत फेरविचार करण्याचें आश्वासन देण्यांत आलें. २१ जुलै १९३६ मध्यें बंगालमध्यें फक्त २६३ राजबंदी शिल्लक राहिले होते. ऑगस्टपर्यंत आणखी २५० सोडून देण्यांत आले. याशिवाय अलीपूर व डमडमच्या तुरुंगांत आणखी तीनशें बंदी होते. त्यांच्यांतूनही हलके हलके बंदी सुटले जाऊं लागले. बाकीच्यांचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली.

अशा रीतीनें एकप्रकारें दहशतवादाचा शेवट झाला. पण क्रांतिकारक भावनेचा अंत झाला नाहीं. स्वातंत्र्याच्या भावनेनें एकदां तेजस्वी रूप धारण केल्यानंतर तिला मरण नाहीं. १९३९ मध्यें पुन्हा एकदां यूरोपवर महायुद्धाचे ढग गर्जूं लागले. सप्टेंबरमध्यें या मेघगर्जनांतून वीज चमकली, व वादळ सुरू झालें. दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला. इंग्लंडनें जी घोषणा करून युद्धांत उडी घेतली त्याची प्रतिक्रिया देशावर झाली. हिंदुस्थानला संमतीशिवाय युद्धांत खेचण्यांत आल्याबद्दल तीव्र संताप निर्माण झाला. ज्या गांधीजींनीं १९१८ सालीं टिळकांचा विरोध सहन करूनही इंग्लंडला मदत केली होती त्यांनींच सत्याग्रहाचें रणशिंग फुंकून असहकाराच्या लढ्याचें नेतृत्व स्वीकारलें. आंतल्या आंत धुमसणाऱ्या ज्वालामुखीचा स्फोट १९४२ सालीं झाला. त्या स्फोटानें एक क्रांति झाली. त्या दिव्य क्रांतीचा इतिहास आतां लिहिला जात आहे. या क्रांतीचे दोन भाग झाले. एक देशाच्या चार सरहद्दीच्या आंत व दुसरा सरहद्दीच्या पलीकडे वृहत्‌भारताचाच घटक असलेल्या प्रदेशांत. दोन्ही

क्रांतीचे जनक एकाच भारतमातेचे पुत्र होते व दोघांचींही हृदयें एकाच भावनेनें पेटलीं होतीं.

या पानांतून ज्या लांबलचक कहाणींचा त्रोटक भाग देण्यांत आला आहे तिचा मुख्य गोष्टीशीं संबंध असो वा नसो; बाह्यतः संघटनेच्या दृष्टीनें दोन्ही घटना संपूर्ण भिन्न वाटत असल्या तरी आंतरिक भावनेच्या दृष्टीनें दोन्ही एकाच चित्राचे दोन नमुने होते, एकाच दिशेनें केलेल्या दोन महान् यात्रा होत्या एकाच महान् ध्येयाच्या पूर्तीसाठीं केलेला तो विराट् प्रयत्न होता. या प्रयत्नांच्या मुळाशीं एकच ज्वलन्त प्रेरणा होती. दोन्ही प्रयत्नांचा ‘ लक्ष्य-बिंदू ’ एकच होता-‘ स्वतंत्र भारत ’ ‘ आझाद हिंद ’ ‘ जय हिंद ’ !—

---

## लाल किल्ल्यांतील विश्वासघाताची कहाणी.

आझाद हिंद फ़ौजेचे अधिकारी व सैनिक यांचें कोर्ट मार्शल चालविण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें लाल किल्ल्याची निवड कोणत्या हेतूनें केली कोण जाणे पण त्यानें एक निश्चित फायदा झाला आहे. इतिहासाचीं जीं पानें अज्ञात राहिलीं होतीं तीं प्रकाशांत आलीं. ज्या पानांवर १८५७ च्या क्रांतींतील निर्घृण विश्वासघाताची उद्वेगजनक कहाणी लिहिलेली आहे तिची पुन्हां आठवण झाली. विश्वासघाताच्या आधारावर ब्रिटिश साम्राज्याचा डोलारा अढळ राहिला होता. हिंदुस्थानचे अखेरचे शहेनशहा बहादूरशहा यांचे आपण नोकर आहोंत असें सांगत असतांना सुसंस्कृत म्हणविणाऱ्या ब्रिटिशांनीं केलेल्या नीच कारवाईची ही कथा आहे. सम्राट् बहादूरशहा यांच्यावर विश्वासघातानें जो खटला लाल किल्ल्यांत चालविण्यांत आला होता त्याच्याशीं आझाद सेनानीवरील खटल्याची वृत्तपत्र-कारांनीं तुलना केली. बहादूरशहावर लाल किल्ल्यांतील दिवान-ई-खासमध्यें स्वातंत्र्ययुद्ध करण्याबद्दल खटला भरण्यांत आला होता. जे आरोप आझाद सेनानीवर ठेवण्यांत आले, जवळजवळ तेच सम्राटावर करण्यांत आले होते. सम्राट् बहादुरशहावर इंग्रज सम्राटाविरुद्ध युद्ध करण्याचा आणि ४६ इंग्रजांना लाल किल्ल्यांत कैद करून त्यांची कत्तल करण्याचा आरोप होता. स्वातंत्र्य संग्रा-

मांत, बंडांत अथवा क्रांतींत जे भाग घेतात त्यांच्या यशापयशावर ते 'देशभक्त' 'वीर' अथवा बंडखोर ठरणें अवलंबून असतें हें दोन्ही प्रसंगीं दिसून आलें. १८५७ चा उठाव अयशस्वी म्हणून तें झालें 'शिपायांचें बंड'. ४२ ची क्रांति असफल म्हणून 'दंगे' आणि 'उपद्रव' हें तिचें नांव'! आणि आझाद फौजेचा पराजय झाला म्हणून त्यांना 'बंडखोर' ठरविण्याचा प्रयत्न! पण जर कांहीं चमत्कारानें बहादुरशहा यशस्वी झाले असते, इम्फालच्या आघाडीवर नेताजींची फौज व हिंदुस्थानांत ४२ ची क्रांति यशस्वी झाली असती तर इतिहास निराळ्या शब्दांत लिहिला गेला असता. लाल किल्ल्यांत कांहीं वेगळ्या घटना घडल्या असत्या.

पं. सुंदरलाल यांनीं ५७ च्या घटनांचें वर्णन अत्यंत मर्मभेदी शब्दांत केलें आहे. पं. सुंदरलाल हे कालच्या इतिहासाचे तज्ज्ञ मानले जातात. पं. सुंदरलाल यांनीं अलाहाबाद येथून निघणाऱ्या 'विश्ववाणी' या सांस्कृतिक पत्रिकेंतही हिंदी इतिहासांतील या कालखंडावर मनोज्ञ विवेचन केलें आहे. आझाद हिंद फौजेवरील खटल्यासंबंधीं असोशिएटेड प्रेसच्या वार्ताहरानें पाठविलेल्या बातमीचा उल्लेख करून पं. सुंदरलाल लिहितात, "अ. प्रे. चा बातमीदार म्हणतो, 'आझाद हिंद फौजेवरील हा खटला आणि १८५७ मध्यें बहादूरशहानें केलेल्या बंडानंतर त्यांच्यावर जो खटला करण्यांत येऊन बादशहाला रंगूनमध्यें जन्मभर हद्दपार करण्यांत आलें त्या खटल्याशीं यांच्यांत साम्य आहे!' अ. प्रे. च्या बातमीदाराचें हें विधान ऐतिहासिक दृष्ट्या सर्वथैव चुकीचें आहे. दिल्लीच्या कोणत्याही बादशहानें ईस्ट इंडिया कंपनीबरोबर असा कोणताही तहनामा केला नाहीं कीं, ज्यामुळें इंग्रजांच्या अधिराज्याला मान्यता मिळेल व खुद्द बादशहाही कंपनीची प्रजा म्हणूनच समजला जाईल.

"मोगल सम्राटांच्या हुकुमानेंच इंग्रज कंपनीला कलकत्ता, मद्रास, सुरत वगैरे ठिकाणीं व्यापारासाठीं परवानगी मिळाली होती. तरीही त्यांना या ठिकाणची फक्त 'जहागिरी' मिळालेली होती व जहागिरीबद्दल इंग्रज दिल्ली दरबारला नजराणा भरत असत. गव्हर्नर जनरलपासून अगदीं छोट्या इंग्रजापर्यंत जो कोणी इंग्रज अधिकारी मोगल बादशहाच्या दरबारांत जाई तो इतर

मानकऱ्याप्रमाणेंच बादशहांना कुर्निसात करून आदबीनें आपल्या जागेवर उभा रहात असे. कंपनीच्या प्रत्येक गव्हर्नर जनरलच्या राजमुद्रेवर "दिल्ली के बादशहा का फिदवी-एखस" (दिल्लीच्या बादशहाचा खास नोकर) असे शब्द कोरलेले असत. सन १७६५ मध्यें शाहआलमनें प्रथम क्लाईवला बंगाल, बिहार आणि ओरिसाचे दिवाणी अधिकार दिले. त्यानंतर इंग्रजांनीं अनेक प्रकारचे कट-कारस्थानें-कारवाया करून दिल्ली सम्राटांच्या दरबारांत आपलें सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला. वस्तुतः हिंदुस्थानांतील सर्व इंग्रज आपणाला दिल्लीच्या बादशहाचे प्रजाजन मानीत आणि त्याच बादशहाला आपल्या मुठींत ठेवण्यासाठीं त्यांचीं कारस्थानें चालू होतीं. सम्राट् शाहआलमनें या परदेशी व्यापाऱ्यांच्या माजोरीला कंटाळून महादजी शिंद्याची मदत मागितली. महादजीनें दिल्लीला येऊन आपल्या सामर्थ्यानें इंग्रजांना कबजांत आणलें व बादशहांचा अंमल कायम केला. सम्राट् शाहआलम यांनीं राजधानी व जवळच्या भागाच्या संरक्षणाची जबाबदारी मराठा फौजेकडे दिली. सम्राट् शाह-आलम यावेळीं महादजीवर इतका खूष झाला होता कीं, त्याची प्रशस्ती करणारा एक शेरही त्यानें लिहिला—

' माधोजी सींधिया फरजन्द जिगर बन्दे मन,
हस्त मसरूफ तलाफी-ए-सितमगारि ए मा ?

महादजीचा दिल्ली दरबारांतील बडेजाव वाढलेला पाहून आतां प्रथम मराठ्यांचा समाचार घेतला पाहिजे असें कंपनीनें ठरविलें. हा दुसऱ्या मराठा युद्धाचा काळ होता. जनरल लेकनें कंपनीतर्फे बादशहाला एक खलिता पाठवून असें वचन दिलें कीं, जर बादशहानें मराठ्यांना दिल्लीहून हाकलून दिलें तर कंपनी देशभर बादशहांची सत्ता पुन्हा पूर्ववत् प्रस्थापित करून देण्यास तयार आहे. दुर्दैवी, दुबळ्या आणि अदूरदृष्टि शाहआलमनें इंग्रजांचें म्हणणें ऐकलें. शाहआलमच्या परवानगीनें व मदतीनें इंग्रजांनीं सन १८०४ मध्यें मराठे हे केवळ बादशहाचे आज्ञाधारक व एकनिष्ठ प्रजाजन असल्याचें जाहीर करून बादशहाला खाजगी खर्चासाठीं बारा लाख रुपये सालिना तनखा जाहीर केला. त्या काळांत देशभर दिल्लीच्या सम्राटाला मान होता. मराठे व अफगाण इंग्रजापेक्षां सामर्थ्य-

चान होते हें लक्ष्यांत ठेवूनच इंग्रज बाह्यतः बादशहाचा मान राखण्याचें व आपणास बादशहाचे प्रजाजन म्हणविण्याचें नाटक करीत होतें.

" बादशहा शाहआलम व त्याच्या हितकर्त्यांना इंग्रजांच्या सद्धेतूचा संशय वेलस्लीच्या धोरणानें प्रथम आला. वेलस्लीनें राजधानी दिल्लीच्या लाल किल्ल्यांतून हलवून मुंगेरच्या किल्ल्यांत नेण्याचा घाट घातला व म्हाताऱ्या शाहआलमला या कल्पनेचाच धक्का बसला व भयंकर संतापही आला. लॉर्ड वेलस्लीनें आपली सूचना हुषारीनें मागें घेतली. त्यानंतर १८०६ मध्येंच शाह-आलम मरण पावला.

" शाहआलमनंतर अकबरशहा दिल्लीच्या गादीवर बसला. याच्यापूर्वी दिल्ली दरबारीं कंपनीचा वकील म्हणून सीटन रहात असे. सीटन केव्हांही दरबारला हजर राहिला तर एका कनिष्ठ दर्जाच्या मानकऱ्याप्रमाणें बादशहाला समोरून कुर्निसात व मुजरा करीत असे व बादशहाच्या घराण्यांतील सर्व खानदानी मानकऱ्याचाही योग्य तो आदर ठेवी. सीटननंतर सर चार्लस मेटकाप याची रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. मेटकाप आल्याबरोबर त्यानें आपल्या बादशहाच्या हुकुमानुसार ताबडतोब जुने रीतीरिवाज सोडून दिले आणि असें धोरण स्वीकारलें कीं, ज्यामुळें बादशहा व इतर दरबारी यांच्या मनांत इंग्रजां-विषयीं द्वेष उत्पन्न झाला.

जनरल लेकनें शाहआलमला जो करारनामा लिहून दिला होता त्याच्या अटी अद्यापही पूर्ण केल्या गेल्या नव्हत्या. सम्राट् अकबरशहानें या अटी पूर्ण करून घेण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. तेव्हां बादशहानें राजा राममोहन राय यांना आपला वकील म्हणून इंग्लंडला पाठविलें. पण तेथेंही राजा राममोहन राय यांचें म्हणणें कोणीं ऐकून घेतलें नाहीं. ही बातमी दिल्लीला पोंचली तेव्हां तेथील लोकांना इंग्रजांच्या बादशहासंबंधींच्या धोरणाबद्दल गंभीर संशय निर्माण झाले.

" सम्राट् बहादूरशहानें आपले खास नोकर-फिदवी-ए खास-असलेल्या इंग्रजाकडे करारनाम्यांतील अटीप्रमाणें खर्चाच्या रकमेची मागणी केली. मध्यंतरींच्या काळांत दिल्लीच्या आसपासच्या मुलखांत कंपनीनें आपला जम

बसविला होता. हिंदुस्थानच्या सर्व उत्पन्नाचा मालक समजल्या जाणाऱ्या दिल्लीच्या बादशहाला आपल्या दरबारच्या खर्चाची आतां अडचण निर्माण झाली! बहादूरशहानें आपल्या नजराण्याची व खर्चाची मागणी केल्यावरही गव्हर्नर जनरलनें कांहीं तरी सबबी काढून टाळाटाळ सुरू केली.

“ १८५४ मध्यें बहादूरशहाचे पुत्र मिर्झा फखरू मरण पावले. रेसिडेंट टॉमस मेटकॉफ बहादूरशहाच्या दरबारला हजर राहिला. त्यावेळीं बादशहाचे नऊ पुत्र होते. त्यांमध्यें मिर्झा जवांबख्त हा सर्वांत अत्यंत हुशार व शूर समजला जात असे. बहादूरशहानें बाकीच्या आठ पुत्रांच्या संमतीनें जवांबख्तला युवराज म्हणून निश्चित केलें. ही बातमी ऐकून गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज यांनीं रेसिडेंटला पत्र पाठविलें कीं, ‘ “ बादशहाचें वैभव व दरारा आतां अजीबात कमी झाला असून आतां पूर्वीचें तेज त्यांत राहिलें नाहीं. ज्या अधिकारामुळें बादशहांना तैमुरी घमेंड असे तेंही एकामागून एक काढून घेण्यांत आलें आहे. आतां बहादूरशहाच्या मरणानंतर लेखणीच्या एका फटकाऱ्यानें बादशाही खतम करणें बिलकुल कठीण जाणार नाहीं असें वाटतें. बादशहाला गव्हर्नर जनरल व सरसेनापती जो मानमरातब देत होते तो आम्हीं हलके हलके बंद केला. गव्हर्नर जनरलच्या मोहरेवरती ‘ बादशहाका फिदवि-ए-खास ’ अशीं अक्षरे असत तींही आम्ही काढून टाकलीं. आतां फक्त मोगल बादशहाची शहेनशहाची पदवी शिल्लक राहिली आहे तीही उडवून देणें बादशहाच्या मृत्यूनंतर आम्हांला कठीण नाहीं. ”

“ यापूर्वी सन १८५६ च्या अखेरीस बादशहाचे दुसरे एक पुत्र मिरजा कियास याच्याशीं गव्हर्नर जनरलनें गुप्त बोलणीं करून त्याच्याकडून असें कबूल करून घेतलें कीं, बहादूरशहाच्या मृत्यूनंतर त्याला बादशहाऐवजीं फक्त ‘शहाजादा’ पदवी राहील व लाल किल्ला सोडून द्यावा लागेल. या गुप्त कराराची बातमी बादशहांना व दिल्लीच्या लोकांना लागतांच त्यांचा रागानें भडका उडाला. इंग्रजी कंपनीच्या पंजातून देशाचें स्वातंत्र्य पुन्हां काढून घेण्याच्या तजविजीला ते लागले. त्यानंतर लवकरच १८५७ चें बंड झालें. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत स्वातंत्र्य–युद्धाचा वणवा पेटला.

"अशा रीतीनें कायद्याच्या दृष्टीनें, नैतिक दृष्टीनें आणि वास्तविक रीतीनें १८५७ च्या स्वातंत्र्य–युद्धाच्या काळांत दिल्लीचा बादशहा हा हिंदुस्थानचा स्वतंत्र बादशहा होता. इंग्रजांनीं त्याच्याशीं एकनिष्ठ रहाण्याचा करार केला होता. बादशहाला खर्च आणि नजराणे देण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें. दिल्लीच्या दरबारांत इंग्रजांचा दर्जा हा केवळ मराठे अथवा रजपूत यांच्याप्रमाणेंच एका सामान्य अधिकाऱ्याचा होता. हा अधिकारी कारस्थानी, हुषार आणि शहेनशहा नांवावर कर वसूल करून तो गडप करणारा बेईमान निघाला. हलके हलके तो बंडाच्या मार्गावर गेला. त्यानें आपण बादशहाचे ' फिदवि–ए–खास ' आहों हें लिहिण्याचें बंद केलें. आपल्या शिक्क्यावरून बादशहाचें नांव उडवून दिलें. व बादशहाच्या नांवानें प्रजेला अनेक प्रकारें छळण्यास सुरवात केली. बादशहा कमजोर होता, दिल्ली दरबारचा कारभार ढिला पडला होता, परदेशीय शत्रूपासून आपल्या प्रजेचें रक्षण करण्यासाठीं तो असमर्थ होता हें सर्व खरें असलें तरी त्यामुळें हिंदुस्थानचा बादशहा म्हणून त्याचा जो कायदेशीर अधिकार त्याला कसा बाध येणार ? ज्याला १८५७ चें बंड म्हटलें जातें तें वस्तुतः कायदेशीर दृष्ट्या विचार केला तर तीन प्रांताचे दिवाणी अधिकार असतांना बंडखोर बनलेल्या कंपनीला शिक्षा करून ताळ्यावर आणण्याचा जोरदार प्रयत्न होता. पेशवे, राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महल, राजा सतारा यांनीं सम्राट् बहादूर शहाच्या नांवानें सलामी देणें यांत कायदेशीर दृष्ट्या चूक कांहींच नव्हतें. उलट तीच बरोबर कायदेशीर बाब होती; कारण यावेळपर्यंत कोणत्याही तहानें, अथवा करारनाम्यानें दिल्लीच्या बादशहाचे कायदेशीर सार्वभौमत्व नष्ट झालें नव्हतें. बहादूरशहाला पुन्हां नव्यानें हिंदुस्थानचा शहेनशहा बनविण्याचा प्रश्नच नव्हता, कारण तो शहेनशहा होताच. त्याच्याविरुद्ध इंग्रजांनींच बंड केलें होतें. व म्हणून त्यांना शिक्षा करण्याचे जे जे प्रयत्न झाले ते सर्व न्याय्य आणि कायदेशीरच होते.

" म्हणूनच जेव्हां १८५७ सालीं इंग्रजाविरुद्ध पुन्हा एकदां स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले तेव्हां हिंदुस्थानभर मोगल शहेनशहाचें हिरवें निशाण फडकूं लागलें. जे खजिने कंपनी जबरदस्तीनें हस्तगत करीत होती ते हिंदुस्थानच्या फौजांनीं मिळवून आणून बहादूरशहाच्या पायावर ओतले. मोगल बादशहानें स्वखुषीनें

इंग्रजांना कांहीं प्रांतांचे दिवाणी अधिकार दिले होते पण त्यानें शाही खजिन्याचें संरक्षण करण्याऐवजीं स्वतःच तो लुटायला सुरवात केली. १८५७ मध्यें बहादूरशहानें कंपनीचे दिवाणी अधिकार रद्द केले. तसे करण्याचा त्याला पूर्ण अधिकार होता. बादशहाचा हा कायदेशीर हक्क कोण नाकारूं शकेल? दिल्लीच्या बादशहाचें राज्य हिंदुस्थानच्या लोकांना 'स्व' राज्यच होतें.

"या (५७ च्या) लढ्यांत शीख राजानें बंडखोर इंग्रजांना मदत केली. बहादूरशहानें ताजुद्दीनबरोबर शीख राजांना दिल्ली दरबारशीं एकनिष्ठ रहाण्याचें फर्मान पाठविलें. ताजुद्दीननें त्यांच्याशीं बोलणीं करून दिल्ली सम्राटाला जें उत्तर पाठविलें त्यांत इंग्रजांना बंडखोर म्हटलें होतें व शीख राजांनीं बहादूरशहाला आपला सार्वभौम बादशहा म्हणून मानल्याचाही उल्लेख आहे. या पत्रांत म्हटलें आहे कीं, "पंजाबांतील शीख राजे सुस्त आणि मित्र आहेत. ते इंग्रजांच्या हातांतील खेळणीं बनले आहेत. मी त्यांच्याशीं बोलणीं केलीं. त्यांच्यापुढें मी हृदय ओतलें. आणि त्यांना विचारलें, आपण विश्वासघातकी इंग्रजांना मदत कां करतां? आपण देशाच्या स्वातंत्र्याशीं द्रोह कां करतां? निदान आपल्या फायद्यासाठीं तरी तुम्ही बादशहांनाच मदत केली पाहिजे' यावर त्यांनीं उत्तर दिलें," हे पहा, आम्ही सर्व संधीची वाट पहात आहोंत. आम्हांला आमच्या सम्राटांचा हुकूम मिळाला कीं, या इंग्रजांना आम्ही येथून हाकलून दिलेंच म्हणून समजा!! हे लोक नुसते बोलायला राजे आहेत. मला तर वाटतें कीं, आपण त्यांच्यावर बिलकुल विश्वास ठेवूं नये."

"बहादूरशहानें असेंच एक पत्र जयपूर, जोधपूर, बीकानेर, अलवर, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणच्या राजांना पाठविलें होतें. या पत्रानेंही बहादूरशहाचा हा कायदेशीर अधिकार स्पष्ट होता. मेटकाफनें हें पत्र आपल्या 'नेटिव नॅरेटिवज्' या पुस्तकाच्या २२८ व्या पानावर उद्धृत केलें आहे. शहेनशहा आपल्या या पत्रांत म्हणतात," माझी अशी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे कीं, वाटेल त्या रीतीनें आणि वाटेल ती किंमत देऊन या इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून दिलें पाहिजे. माझी अशी उत्कट इच्छा आहे कीं, तमाम हिंदुस्थान इंग्रजांपासून स्वतंत्र झाला पाहिजे. परंतु हें ध्येय साध्य करण्यासाठीं जें क्रांति–युद्ध सुरू

करण्यांत आलें आहे. त्याची सर्व जबाबदारी जो आपल्या शिरावर घेऊं शकेल, सर्व देशाची शक्ति संपूर्ण संघटित करून या एकाच कार्याला लावूं शकेल व लढाईच्या मैदानांत उतरून सर्व व्यवस्था आपल्या हातांत घेऊं शकेल असा एकच जबरदस्त मनुष्य ज्याला देशाचा प्रतिनिधि मानतां येईल असा पुढें आला पाहिजे. हिन्दुस्थानांतून इंग्रजांना काढून टाकल्यावर मोंगल घराण्याच्या स्वार्थासाठीं हिंदुस्थानावर पुन्हां अधिराज्य गाजविण्याची माझी किंचितही इच्छा नाहीं. शत्रूला घालवून देण्यासाठीं आपण सर्व माझे सरदार तलवार उपसण्यास तयार असलात तर हिंदुस्थानवर राज्य करण्याचे सर्व हक्क व अधिकार आपल्या-पैकीं ज्याला सर्वानुमतें या अधिकारासाठीं निवडण्यांत येईल त्याच्या स्वाधीन करण्याची माझी तयारी आहे. मी वीस वर्षेपर्यंत हिंदुस्थानची बादशाही भोगिली आहे. माझी आतां कोणतीही वैयक्तिक अभिलाषा उरलेली नाहीं. "

या पत्रावरूनही १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाचेवेळीं बहादूरशहा हिंदुस्थानचा कायदेशीररीत्या बादशहा होता हें स्पष्ट होतें. इंग्रजांनींही बादशहाच्या या कायदेशीर अधिकाराचा व दर्जाचा इन्कार केला नव्हता. दिल्ली पडल्यानंतर कॅप्टन हडसन यानें बहादुरशहाच्या सर्व मुलांना ठार मारलें, त्यांचीं डोकीं कापून एका तबकांत ठेवलीं व त्यावर वस्त्र घालून वृद्ध बादशहापुढें लाल किल्ल्यांत तें तबक 'नजराणा' म्हणून देण्यांत आलें. त्यावेळींसुद्धां हडसननें असे उद्गार काढले, " जहाँपनाह ! कंपनीनें बरींच वर्षें आपला नजराणा बंद केला होता तो आज आपल्यापुढें सादर करण्यांत येत आहे. "

" त्यानंतर लाल किल्ल्यांत एका लष्करी कोर्टापुढें बादशहावर खटला चालविण्यांत आला. बादशहानें कोर्टाच्या कामकाजांत कोठल्याही प्रकारें भाग घेतला नाहीं. सम्राटाचे खास नोकर खुद्द सम्राटावरच खटला चालवितात—जे या देशांतीलही नव्हते आणि ज्यांनीं आंतरराष्ट्रीय कायद्यांना लाथाडून कारवाई केली—त्यांनाच याबद्दल जास्तीतजास्त कडक शिक्षा मिळणें वाजवी झालें असतें. या देशांतील इंग्रजी राज्य हेंच अत्यंत गैरकायदेशीर आहे. इंग्रजी राज्याला हिंदुस्थानांतील लोकांनीं कधींही मान्यता दिली नाहीं किंवा मोगल बादशहांनींही त्यांना कधीं आपले वारसदार म्हणून मान्य केलें नव्हतें. ज्या इंग्रजांनाच

त्यांच्या एक हजार एक अपराधाबद्दल लष्करी कोर्टापुढें उभे करायला पाहिजे तेच इंग्रज या देशाच्या लोकांवर त्याच लाल किल्ल्यांत राजद्रोहाचा खटला करतात हा मोठा विनोदच आहे ! ”

या काळांत घडलेल्या इतर घटनाही वरील विवेचनाला पोषक अशाच आहेत. फेब्रुआरी १८५७ मध्यें नानासाहेब पेशव्यांच्या योजनेनें एक ‘ पयामे आजादी ’ नांवाचें पत्र नागरी आणि ऊर्दू अशा दोन्ही लिपींत प्रसिद्ध होत असे. हें पत्र केव्हां सकाळीं, केव्हां संध्याकाळीं तर केव्हां कांहीं दिवसांनंतर तर कधीं दररोज प्रकाशित केलें जाई. हें पत्र ५७ च्या स्वातंत्र्य–युद्धाचा संदेश देशभर पोंचविणारें मुखपत्र झालें होतें. या पत्रांत बहादूरशहाचा एक संदेश प्रसिद्ध झाला होता. या सन्देशांत हिन्दु–मुसलमानांना उद्देशून शहेनशहा म्हणतात, “ तुम्ही स्वस्थ रहावें अशी आतां खुद्द परमेश्वराचीच इच्छा नाहीं कारण त्यानेंच दोघांच्याही ( हिंदु–मुस्लीम ) अंतःकरणांत इंग्रजांना देशांतून काढून टाकण्याची इच्छा निर्माण केली आहे. आमच्या या देशांत त्यांची कांहीं खाणा-खूणही बाकी रहातां कामा नये. ” दिल्ली इंग्रजांच्या हातीं आल्यानंतर या पत्राचे संपादक मिरजा बेदार वख्त यांच्या तोंडावर डुकराची चरबी फासण्यांत आली. या पत्राचा अंक ज्यांच्या ज्यांच्या घरीं मिळे त्यांना फांसावर लटकविण्यांत येई. सर हेन्री कॉटन, जी. बी. मॉलिसन यांनीं आपल्या पुस्तकांत या सर्व प्रकारांचें वर्णन केलें आहे.

या सर्व ऐतिहासिक पुराव्यानें एक गोष्ट स्पष्ट होते. ५७ मध्यें जो प्रचंड प्रयत्न झाला तो केवळ बंडाच्या स्वरूपाचा नव्हता. त्याचा उद्देश मोडकळीस आलेल्या मोंगल पादशाहीला पुन्हां जीवदान देणें किंवा हिंदुस्थानभर मराठ्यांची हुकुमत स्थापन करणें हा नव्हता. या प्रयत्नाच्या मागें एकच इच्छा होती, एकच प्रेरणा होती—

**इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून देऊन**
**देश संपूर्ण स्वतंत्र करावा.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १८३८०

जयहिंद

# मशालें जल उठीं

ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीं मावळत नसे तो १५ फेब्रुवारी १९४२ ला मावळला. मलायाच्या राजधानीवर जपानी साम्राज्याचा सूर्य–चिन्हांकित ध्वज एकाएकीं फडकूं लागला. सिंगापूर पडलें आणि 'शोनान' झालें. सिंगापूरचा पाडाव हा अपरिहार्य ऐतिहासिक घटनांच्या साखळींतील एक महत्वाचा दुवा होता. ७ डिसेंबर १९४१ ला जपान्यांनीं पर्ल बंदरावर हल्ला चढविला. ८ डिसेंबरला इंग्लंडनें आपल्या वसाहती व इतर स्वाधीन देशांच्या वतीनें, अमेरिका व चीननें जपानविरुद्ध युद्ध पुकारलें. सिंगापूरच्या तळांत असलेलीं 'प्रिन्स ऑफ वेल्स' आणि 'रिपल्स' हीं दोन नामांकित प्रचंड लढाऊ जहाजें २० डिसेंबरच्या पहिल्याच जपानी हवाई हल्ल्यांत समुद्रतळाशीं गेलीं. १३ डिसेंबरला ग्वाम, २० ला पेनांग, २२ ला बेक, २५ ला हांगकाँग, २६ ला ईपोह आणि २ जानेवारीला मॅनिला अशा क्रमानें 'साम्राज्याचा डोलारा धुळीला मिळाला. पूर्व आशियांतून केवळ ब्रिटिश साम्राज्यच नव्हे तर एकंदर पाश्चिमात्त्य राष्ट्रें नामशेष होणार यांत कांहीं संशय उरला नाहीं. चारी दिशेनें डरकाळ्या फोडणारा वाघ मांजरीसारखा घाबरून एका कोपऱ्यांत लपून बसला होता. जपानी सैन्यानें थायलंड आणि मलायामधून एकदम एकाच वेळीं ब्रह्मदेशावर चढाई सुरू केली. तेरगुई तिगण्य व मोलमीन हस्तगत करून जपानी फौजा सारख्या आगेकूच करीत होत्या. त्यांना रोखणारा त्यावेळीं कोण होता? टोळधाडीप्रमाणें जपानी फौजा सर्वत्र पसरल्या. सिंगापूरसारखे अभेद्य, अजिंक्य व शत्रू ज्यांच्या जवळसुद्धां जाऊं शकणार नाहीं असें लष्करी महत्वाचें ठाणें ५० कोटी रुपये खर्च करून त्याला पूर्वेचा अजिंक्य किल्ला बनविण्यांत आला होता. ज्याप्रमाणें मॅगिनो लाईनच्या

मागें फ्रान्स आपल्याला सुरक्षित समजत होता त्याप्रमाणें सिंगापूर, मॅगिनो लाईन-पेक्षां अधिक अजिंक्य म्हणून सांगितलें जात असे. पण जर्मनीनें ज्याप्रमाणें मॅगिनो लाईनला स्पर्शही न करतां फ्रान्समध्यें प्रवेश केला, त्याप्रमाणें जपानही बाटू, पहात, क्लुआंग व मरसिंगच्या बाजूनें पुढें घुसून सिंगापूरमध्यें जाऊन पोचला. हा अभेद्य किल्ला जपानी फौजेपुढें मातीच्या किल्ल्याइतकाही टिकाव धरूं शकला नाहीं. एकाद्या खेळण्यासारखा जपानी फौजांनीं तो सहज हस्तगत केला. प्रशांत महासागरांतून ब्रिटिश आरमाराची कधींच नाकेबंदी झाली होती. ऑस्ट्रेलियावर प्राणसंकट येऊं पहात होतें. ऑस्ट्रेलियन सेनापती जनरल बेनेट याच्या नेतृत्वाखालीं जोहोरमध्यें केलेला पहिलाच प्रतिकार निष्फळ ठरला. सिंगापूरला पाण्याचा पुरवठा तेथून होत होता. तो बंद झाल्यानंतर सिंगापूरला गुडघे टेंकण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. थाईलंडच्या दिशेनें सिंगापूरवर हल्ला होईल अशी कोणी कल्पनासुद्धां केली नव्हती. पण याच बाजूनें जपानी फौजेनें प्रवेश केला. जपानपासून आपल्याला कांहीं भय वा संकट येईल असें वाटण्याला इंग्लंडला कांहीं कारण नव्हतें. चीन-जपानी युद्धांत जपानला पूर्ण मदत करण्यांत आली होती. जपानला खूष करण्यासाठीं बर्मा रोडसुद्धां बंद करण्यांत आला होता. परंतु हें सर्व मृगजळ ठरलें. सिंगापूरमध्यें सैन्याची मोठी जमवाजमव होऊन सुद्धां मलाया व हाँगकाँगमध्यें युद्धाची कांहीं तयारी झाली नव्हती. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. जगांतील एक अत्यंत संपन्न प्रदेश जपान्यांच्या कबजांत गेला. मलायांत जगांतील एकंदर टीनच्या ३८ टक्के, रबर ४३ टक्के पैदा होते. कांहींही हानी न होतां हा सोन्याचा तुकडा जपान्यांच्या हातीं गेला. पन्नास हजार लोकसंख्येच्या या प्रदेशांत १५ हजार इंग्रज, १३ हजार ऑस्ट्रेलियन आणि ३२ हजार हिंदी शिपाई जपान्यांचे युद्ध-कैदी झाले. नागरिक पळून जाऊं शकले नाहींत. ते जपान्यांच्या दयेवर हवाला देऊन राहिले. पूर्व–आशियांतील हा सर्व प्रदेश आणि खुद्द जपानसुद्धां बृहत्तर भारताचाच प्रदेश-विस्तार आहे. राजकीय दृष्ट्या हिंदुस्थानपासून अलग असून सुद्धां येथें हिंदुस्थानी प्रजा मोठ्या संख्येनें आहे. एकट्या मलायांतच त्यावेळीं हिंदी लोकांची संख्या सात लाख होती. ७ मार्चला रंगून, ९ मार्चला पेगू, २३ मार्चला अंदमान, २९ एप्रिलला लाशिओ आणि बर्मा रोड आणि १ मेला

मंडाले जपान्यांच्या हातीं गेल्यावर मलायांतील हिंदी लोकांपुढें जो प्रश्न उपस्थित झाला होता तोच ब्रम्हदेशांतील हिंदी लोकांपुढें उभा राहिला.

मलायांतील हिंदी लोकांनीं या भागांत रहाणाऱ्या सर्व हिंदी लोकांचें अतिशय बहादुरीनें नेतृत्व केलें. निराशेंतून आशेकडे व अंधकारांतून प्रकाशाकडे पाऊल टाकण्याचा संदेश देऊन त्यांनीं हिंदी लोकांना मरणांतून जीवनाकडे, गुलामींतून स्वातंत्र्याकडे जाण्याचा मार्ग दाखविला. त्यांना त्या परिस्थितींतून जपान्यांच्या ताब्यांत सोडून देऊन जे पळून आले तेच आज हिंदी लोकांनीं त्या परिस्थितींतून सुटण्यासाठीं जे प्रयत्न केले त्याला ' बंड ' म्हणतात व त्यांच्यावर लष्करी कोर्टापुढें खटले भरतात. यापेक्षां मानवतेचें अधिक काय विडंबन असूं शकेल ? ज्यांच्या नसानसांत अपमान, तिरस्कार, उपेक्षा, घृणा आणि वर्णद्वेष ओतप्रोत भरला आहे असे साम्राज्यवादीच हें नाटक करूं शकतील. त्या प्रदेशांत रहाणारे हिंदी गोऱ्या लोकांचा हा पक्षपात आणि वर्णद्वेष कधींपासून सहन करीत होते कोण जाणे ! पावला–पावलाला त्यांना अपमान सहन करावा लागे, उन्मत्त टाचेच्या ठोकरा त्यांना खाव्या लागत. या प्रकारचे अन्याय सहन करून त्यांचीं हृदयें विदीर्ण झालीं होतीं. व अन्यायाची प्रतिक्रिया होऊन स्वाभिमानाची प्रेरणाही आविर्भूत होऊं लागली होती. त्यांना आतां मान उंच करून आकाशांत सरळ वाढणाऱ्या वृक्षाप्रमाणें खुल्या वातावरणांत वाढण्याची संधि मिळाली.

पूर्व–आशिया आणि दक्षिण आफ्रिकेंतील घनदाट पहाडी जंगलांतून समृद्ध देश घडविण्याचें श्रेय वास्तविक हिंदी लोकांनाच आहे. आजही बर्मी सरकारनें हिंदुस्थानच्या सरकारकडे साफ–सफाई व शेतीसाठीं दोन हजार भंगी आणि पंचवीस हजार मजूरांची मागणी केली आहे. इंग्रज जमीनदार आणि राज्यकर्ते यांनीं हिंदी लोकांना नेहमींच भंग्यासारखें आणि मजूरासारखें वागविलें आहे. महायुद्धांत हिंदी लोकांनीं अधिक रक्त सांडून सुद्धां त्यांना वागविण्याच्या इंग्रजांच्या वर्णद्वेषाच्या धोरणांत कांहीं फरक पडला नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा हिंदी नागरिकसुद्धां गोऱ्या लोकांच्या वस्तींत घर खरेदी करून राहूं शकत नाहीं, आणि मलायांत हिंदी मजूरांना महागाईभत्ता मागण्याचाही

अधिकार नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत त्यांच्यावर खटले चालविले जातात तर मलायांत त्यांच्यावर गोळ्या चालविल्या जातात. ब्रिटिश वृत्तपत्रांना वाटेल तें लिहिण्याचें स्वातंत्र्य मिळतें तर युद्धाच्या नांवानें हिंदी पत्रांचा गळा दाबला जातो. अत्यंत मोठ्या दर्जाच्या हिंदी अधिकाऱ्याला सुद्धां सिंगापूरच्या स्नान-गृहांत जाण्याची मनाई होती ! आणि मोठी चळवळ केल्यानंतर आंत जाण्याला परवानगी मिळाली तरी पाण्यांत पाऊल टाकण्याला बंदी कायमच ! हिंदी मनुष्य हा गोऱ्या लोकांच्या दृष्टीनें अस्पृश्य आहे. गोऱ्या लोकांच्यासाठीं खास राखलेल्या पाण्यावर त्याची काळी सावली सुद्धां पडतां कामा नये. इंग्रजांच्या साम्राज्याबरोबर हे अपमानही नाहींसे झाले, परंतु हृदयावर झालेल्या जखमांचे व्रण ताजेच राहिले. हा अपमान भरून काढण्याची संधि आतां हिंदी लोकांना मिळाली होती. युद्ध-कैदी बनलेल्या हिंदी शिपायांच्या मनांतही इंग्रजांच्या पक्षपाती वर्णद्वेषी धोरणानें असंतोष निर्माण केला होता. रणक्षेत्रावर हिंदी शिपायांनीं कितीही प्राण पणाला लावून, लढाई करूनसुद्धां त्यांचा पगार, भत्ता, खाणें-पिणें, कपडा-लत्ता यांत कांहीं सुधारणा झाली नाहीं. ते सर्व कनिष्ठ दर्जाचेच राहिले. या अन्यायाच्या प्रतिक्रियेनें आतां एक मूर्त स्वरूप धारण केलें.

ह्या दृष्टीनें कांहीं विचार होत असतांनाच मेजर फुजिवारानें ता. १७ फेब्रुवारीला जपानी लष्कराच्या छावणींत कांहीं वजनदार हिंदी लोकांना भेटीस बोलावलें. त्यांनीं दयाबुद्धीचा मोठा आव आणून आणि गोड गोड थापा मारून हिंदी लोकांना आपण जाळयांत ओढण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांची ताकद आतां नष्ट झाली आहे, ह्याच वेळेला तुम्ही आपला देश स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही असा प्रयत्न केला तर तुम्हांला सर्व प्रकारची मदत करण्यास जपान तयार आहे. हिंदुस्थान स्वखुषीनें इंग्रजांचा गुलाम झाला नसल्यामुळें इंग्रजांच्या अंमलाखालीं असूनही हिंदुस्थानला जपान आपला दुष्मन मानीत नाहीं. जपानी फौजा हिंदी लोकांना शत्रूप्रमाणें वागवणार नाहींत. उलट आपल्या मित्राप्रमाणें त्यांना वागविलें जाईल. ही सुवर्णसंधि आहे, ह्यावेळींच आझाद हिंदसंघाची स्थापना करून देशाच्या स्वातंत्र्याचे प्रयत्न तुम्ही ताबडतोब सुरू केले पाहिजेत—हा फुजिवारांच्या बोलण्याचा आशय होता.

जपान्यांच्या ह्या सद्भावनांवर सहज विश्वास ठेवणें शक्य नव्हतें. जसा साप तसाच नाग हें ओळखून सावधानतेनें पाऊल टाकण्यांतच कल्याण होतें. म्हणून फुजिवारांना भेटायला गेलेल्या हिंदी लोकांनीं त्यांच्या म्हणण्याचा पूर्ण विचार करण्यासाठीं अधिक मुदत मागून घेतली. २१ फेब्रुवारीला त्यांनीं जपान्यांना असें कळवलें कीं, प्रथम मलायांतील हिंदी लोकांच्या सर्व प्रतिनिधींना एकत्र मिळण्याची संधि मिळाली पाहिजे. मलायाच्या सेंट्रल इंडियन असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एन्. राघवन् ह्यांना बँकॉकहून शोनानमध्यें आणण्यांत यावें अशी मागणी करण्यांत आली. ९–१० मार्चला शोनानमध्यें हिंदी लोकांची एक मोठी परिषद झाली. ह्या परिषदेला सर्व मलायांतून प्रतिनिधि आले होते. थायलंडमधील हिंदी लोकांचे कांहीं प्रतिनिधीही उपस्थित होते. हें सर्व चाललें असतांना हिंदुस्थानचे जुने क्रांतिकारक राशबिहारी बोस हे कसे स्वस्थ राहूं शकतील ? १९१८ च्या महायुद्धाच्या काळांत त्यांनीं क्रांतीचा जो अयशस्वी प्रयत्न केला, त्या अपयशाचा भार सहन करून भविष्यकाळाकडे आशाळभूत नजर लावून ते इतके दिवस अशा सुवर्णसंधीची मार्गप्रतीक्षा करीत होते. त्यांच्या श्रांत नेत्रांना पूर्वेकडे पहाट झालेली पहायला मिळाली. तो मंगल प्रकाश पहातांच त्यांचे डोळे ओलावले. कंठ सद्गदित झाला. आपल्या क्रांतिकारक जीवनांत ज्या दिव्य स्वप्नाची बोसबाबूंनीं चिरसाधना केली, त्या स्वप्नाला तसेंच दिव्य साकार सजीव स्वरूप देण्याची महान् संधि त्यांना मिळाली. १९१५ च्या फेब्रुवारी महिन्यांत जें होऊं शकलें नाहीं, त्यासाठीं १९४२ च्या फेब्रुवारी महिन्यांत अनुकूल परिस्थिति निर्माण झालेली त्यांना दिसली. मृगजळामागें निरंतर धावणाऱ्या तृषाकुल हरणाला पाण्याचें दर्शन झालें. राशबिहारीजींनीं ताबडतोब टोकिओमध्यें एक परिषद बोलावली. ह्या परिषदेला मलाया आणि थायलंडमधून प्रतिनिधि बोलविले होते. जपानमधील हिंदी लोकांची स्थिति मलाया, थायलंडमधील लोकांपेक्षां वेगळी होती. ते दुधानें तोंड पोळल्यामुळें ताकही फुंकून घ्यावें अशा वृत्तीचे होते. जपान्यांच्या हेतूंची कसोटी लावण्यासाठीं त्यांनीं पहिली मागणी अशी केली कीं, सर्व हिंदी लोकांना प्रथम बंधमुक्त केलें जावें. आपण जपान्यांच्या हातचें खेळणें बनायचें नाहीं हा त्यांचा निश्चय होता. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ते वाटेल तें करण्यास तयार

होते. पण त्यांच्या मनांत जपान्यांविषयीं संशय होता. तरीही ते टोकिओला गेले. चीन, थायलंड, जपान, मलाया वगैरे देशांतील हिंदी लोकांचें हें संमेलन श्री. रासबिहारी बोस यांच्या अध्यक्षतेखालीं ता. २९ ते ३० पर्यंत झालें. थायलंडमधील हिंदी लोकांचे प्रसिद्ध पुढारी स्वामी सत्यानंद विमानानें संमेलनाला येत असतां विमानाला अपघात होऊन त्यांत ठार झाले. या संमेलनांत ' आझाद हिंदुस्थान संघ '—इंडिपेंडन्स ऑफ इंडिया लीग–स्थापन करण्याचें निश्चित झालें. हिंदुस्थानचें संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करणें हा संघाचा उद्देश ठरविण्यांत आला. संघावर परकीयांचा कोणत्याही प्रकारें अधिकार, प्रभाव अथवा नियंत्रण राहणार नाहीं असें जाहीर करण्यांत आलें. याशिवाय आणखी असेंही ठरविण्यांत आलें कीं, आझाद हिंद फौजेची संघटना करण्यांत यावी व जूनमध्यें बँकॉकला आणखी एक परिषद बोलवावी.

मलायांतील हिंदी लोकांच्या प्रतिनिधींची परिषद ता. २२, २३ आणि २४ एप्रिलला झाली. या परिषदेंत हिंदी लोकांमध्यें आरोग्य, रक्षण, सामाजिक कार्य, वैद्यकीय मदत व राजकीय संघटना इत्यादि कामें करण्यासाठीं वेगवेगळ्या कमिट्या नेमण्यांत आल्या. आझाद हिंद संघाच्या उद्देशाचा प्रसार व प्रचार करून हिंदुस्थानी लोकांत नवजीवन निर्माण करणें हा या कमिट्यांचा मुख्य उद्देश होता.

पूर्वेकडे या घडामोडी होत असतां, तिकडे पश्चिमेंत बर्लिन रेडिओवरून श्री. सुभाषचंद्र बोस सिंह–वाणीनें भारतीयांना स्वातंत्र्य–लढ्यासाठीं आवाहन करीत होते. सुभाषबाबू हिंदी लोकांना सांगत होते, " पूर्वेकडे ब्रिटिश साम्राज्य-सूर्य मावळला आहे व भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्णिमेचा पूर्ण चंद्र उगवत आहे. १८५७ मध्यें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें पहिलें युद्ध झालें; आतां १९४२ मध्यें अखेरचें युद्ध झालें पाहिजे. कंबर बांधा, तयार व्हा. भारताच्या राष्ट्रीय मुक्ततेची संधि तुमच्यासमोर आहे. सुभाषबाबूंच्या या भाषणांनीं पूर्व–आशियांतील हिंदी लोकांना मंत्र–मुग्ध केल्यासारखें भारून टाकलें. त्यांना या भाषणांपासून एक विशेष प्रेरणा मिळाली, स्फूर्ति मिळाली आणि शक्तीही मिळाली. आझाद हिंदसंघ आणि आझाद–हिंदसैन्याच्या संघटनेचें कार्य प्रचंड उत्साहानें सुरू झालें.

संघाच्या सभासदांची संख्या ६५००० वर गेली. पेनांग, पेरक, केडाड, टोलांगोर, देगरी, सम्बीलान, मलक्का आणि जोहोर वगैरे राज्यांत संघाच्या शाखा व एकंदर बावीस उपशाखा स्थापन झाल्या.

बँकॉकमध्यें १५ ते २३ जूनपर्यंत पूर्व आशियांतील हिंदी लोकांची एक महत्वाची परिषद भरली होती. जावा, सुमात्रा, थायलंड, फिलिपाईन्स, बोर्निओ, कँटन, इंडोचायना, मांचुकुओ, शांघाय, हाँगकाँग, ब्रम्हदेश, मलाया, सिंगापूर आणि जपान इत्यादि सर्व देशांतून जवळजवळ शंभर प्रतिनिधि आले होते. युद्ध-कैदी झालेल्या शिपायांच्या प्रतिनिधींनींही या परिषदेंत भाग घेतला. आझाद हिंद संघाच्या संघटनेला अधिक व्यापक स्वरूप देण्यांत येऊन संघाची घटना व नियमही तयार करण्यांत आले. या परिषदेंत एकंदर साठ–सत्तर ठराव पास झाले. पहिला ठराव एकंदर सर्वसामान्य जनतेसंबंधीं होता. या ठरावांत जनतेला संघटित होण्याचा, शांतता व सुव्यवस्था राखून आपलें जीवित व संपत्ति यांचें संरक्षण करण्यास समर्थ बनण्याचा व एकंदर लोक-हिताच्या कार्यांत सहभागी होण्याचा आदेश देण्यांत आला होता. आझाद हिंद संघाला मजबूत बनवून प्रत्येक ठिकाणीं संघाच्या शाखा स्थापन करावयाच्या असेंही ठरविण्यांत आलें. एक ठराव मलाया आणि ब्रह्मदेशांतील ज्या हिंदी लोकांना जीवनरक्षणासाठीं आपली मालमत्ता, संपत्ति सोडून इकडे- तिकडे पळावें लागलें त्यांच्या मालमत्तेसंबंधीं होता. अशा लोकांसाठीं एक वेगळी संस्था काढण्यांत आली. तिचें नांव होतें 'गैरहजर हिंदी लोकांच्या मालमत्तेची व्यवस्था पहाणारी संस्था' ( ॲब्सेंटी इंडियन प्रॉपर्टीज असोसिएशन). 'एकता, विश्वास व बलिदान' हीं तीन मुख्य तत्त्वें संघाचे सिद्धान्त म्हणून स्वीकारण्यांत आलीं. सर्व हिंदुस्थानीयांची एकच संस्था व एकच संघटन असावें, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयीं सर्व हिंदी लोकांच्या मनांत दृढ भावना निर्माण व्हावी व स्वातंत्र्यासाठीं सर्वस्व समर्पण करण्यास त्यांनीं सिद्ध व्हावें हा या प्रयत्नांचा प्राणभूत उद्देश होता. हिंदुस्थान एक आणि अखंड आहे अशीही घोषणा करण्यांत आली. धार्मिक अथवा जातीय भूमिकेवर कोणत्याही प्रकारचें काम न करण्याचा निश्चय करण्यांत येऊन राष्ट्रीयत्वच सर्व प्रवृत्तींचा आधार आहे असें ठरविण्यांत आलें. हिंदी राष्ट्रीय सभेचा आदर्श पुढें ठेवूनच कार्यक्रमाची रूपरेषा

आखण्यांत आली. हिंदुस्थानची भावी राज्यघटना ठरविण्याचा अधिकार हिंदुस्थानच्या लोकनियुक्त प्रतिनिधींनाच आहे हेंही जाहीर केलें. संघाच्या खास युद्ध-समितीवर 'आझाद हिंद फौज' संघटित करण्याचें काम सोपविण्यांत आलें. ही फौज जपानी फौजांप्रमाणें स्वतंत्र हिंदुस्थानची राष्ट्रीय फौज असावी असा संघाचा दृढ निश्चय होता. या फौजेचा उपयोग फक्त हिंदुस्थानचें स्वातंत्र्य संपादन करण्यासाठींच केला जाईल, दुसऱ्या कोणत्याही कामासाठीं ही फौज वापरली जाऊं नये असें संघाचें सढळ धोरण होतें. संघाच्या युद्धसमितींत फक्त पांचच सभासद होते. एक अध्यक्ष श्री. रासबिहारी बोस, आझाद हिंद फौजेचे दोन प्रतिनिधि–कप्तान मोहन सिंह आणि कर्नल गिल, आणि हिंदी नागरिकांचे दोन प्रतिनिधि श्री. एन्. राघवन व श्री. के. पी. मेनन् अशी या समितीची रचना होती. ज्यावेळीं हिंदुस्थानांत क्रांति होईल अथवा ब्रिटिश हिंदी फौजेंत बंड होईल त्याचवेळीं फौजेच्या हालचाली सुरू करावयाच्या असें या युद्धसमितीनें ठरविलें होतें. एकाच वेळीं दोन्ही बाजूंनीं हिंदुस्थानांत व हिंदुस्थानच्या बाहेर क्रांति होणें आवश्यक आहे असें त्यांना वाटत होतें. कॉंग्रेसचें तिरंगी निशाण हेंच संघानें आपलें राष्ट्रीय निशाण म्हणून स्वीकृत केलें. जपाननें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधींचें आपलें धोरण जाहीर केलें पाहिजे अशी मागणी करण्यांत आली. हिंदुस्थानावर कोणत्याही परदेशी सत्तेचें लष्करी, आर्थिक किंवा राजकीय प्रभुत्व रहाणार नाहीं, हिंदुस्थानवर कोणत्याही प्रकारें नियंत्रण घालण्याचा किंवा अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप होणार नाहीं असें जाहीर आश्वासन जपान-कडून मागण्यांत आलें. कोणाही हिंदी माणसाला शत्रु समजलें जाऊं नये व त्याची मालमत्ता जप्त केली जाऊं नये, सुभाषबाबूंना पूर्व आशियांत येऊन चळवळीचें नेतृत्व स्वीकारतां यावें यासाठीं त्यांना सर्व प्रकारच्या सवलती देण्याची मागणी करण्यांत आली.

या परिषदेनें सर्वत्र नवा उत्साह निर्माण झाला. नव्या स्फूर्तींच्या, नव्या चैत-न्याच्या लहरी उसळल्या. पण कांहीं हिंदी सैनिकांच्या मनांत अद्यापही एक संदेह होता. आपण राजभक्तांची शपथ घेतली असतांना ती मोडून आझाद फौजेंत कसें सामील व्हावें हा प्रश्न त्यांच्या इमानी मनाला संत्रस्त करीत होता. एक-निष्ठेची शपथ ही केवळ राजनिष्ठेची शपथ नसून देशाशींही एकनिष्ठ रहाण्याची

शपथ आहे. भारतमातेला स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नानें या शपथेशीं विद्रोह होऊं शकत नाहीं. त्यांचें या खुलाशानें समाधान झालें. त्यांच्या मनांतील संशय दूर झाला. स्वातंत्र्याच्या एकाच प्रभावी भावनेनें हिंदुस्थानी इतर सर्व गोष्टी विसरून गेले. दीडशें वर्षांच्या गुलामीनें झालेला सर्व परिणाम धुवून निघाला. सर्वांच्या हृदयांत एकच भावना उरली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची. एकाच विचारानें सर्व हिंदी लोकांचीं मनें भारलीं गेलीं–स्वातंत्र्यसंपादन. साप जुनी कात टाकतो त्याप्रमाणें भीति आणि भ्याडपणा, हृदयाचा आणि शरीराचा दुबळेपणा हिंदी लोकांनीं दूर दूर झुगारून दिला. हृदयांत प्रकट झालेल्या स्वातंत्र्याच्या ज्योतीनें त्यांचे चेहरेही उजळले. तन–मन–धन सर्वस्वाचा त्याग करून हिंदुस्थानी लोक पेटल्या मशालीप्रमाणें मान उन्नत करून उभे राहिले. चारी दिशांना नवी जागृति आली, नव्या चैतन्याच्या मशाली सर्वत्र पेटल्या.

याच सुमारास ता. ८ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबईला अखिलभारतीय कॉंग्रेस कमिटीचें ऐतिहासिक अधिवेशन भरलें होतें. " ब्रिटिशांनों, हिंदुस्तानांतून चालते व्हा " अशी जी घनगंभीर युद्ध–घोषणा गांधीजींनीं केली, त्यामुळें हिंदुस्थानांतील वातावरणही पेटलें होतें. गांधीजींच्या घोषणेवर कॉंग्रेसचें अधिकृत शिक्का–मोर्तब ८ ऑगस्टला होतांच सरकारनें भीषण दडपशाहीला सुरवात केली. " करेंगे या मरेंगे " हा एकच मंत्र गांधीजींनीं अखेरचा संदेश म्हणून दिला होता. या मंत्रालाच हृदयांत कोरून सारें राष्ट्र बंड करून उठलें. हिंदुस्थानांत अभूतपूर्व क्रांतियुद्ध सुरू झाल्याची बातमी विद्युत्वेगानें सर्वत्र पसरली. ही बातमी ऐकतांच मलायांतील हिंदी लोकांच्या नसानसांतून अधिकच वेगानें रक्त सळसळूं लागलें. वास्तविक हिंदुस्थानांतील क्रांति आणि हिंदुस्तानबाहेरील हिंदी लोकांनीं केलेलें युद्ध यांत बाह्यतः आणि अंतर्गत संघटनेच्या दृष्टीनेंही कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. परंतु दोनही बंडांची प्रेरक भावना एकच होती. इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून देणें आणि कोणत्याही परकीय सत्तेचा प्रभाव नियंत्रण आणि हस्तक्षेप यांनीं न डागळतां अविकृत असें संपूर्ण स्वातंत्र्य संपादन करणें हाच दोन्ही बंडांचा मूलभूत अंतिम उद्देश होता. बँकॉक येथील परिषदेनें आझाद हिंद फौज लढाईंत आणण्यापूर्वी जी अट घातली होती ती आतां पूर्ण झाली. हिंदुस्थानांत क्रांति सुरू होईल तेव्हांच त्या क्रांतीला मदत

करण्यासाठीं आझाद हिंद फौज वाहेरून चढाई सुरू करील असें बँकॉक परिषदेनें ठरविलें होतें. ही आवश्यक अनुकूलता निर्माण होतांच मलायांतील कार्य दुप्पट वेगानें सुरूं झालें. आझाद हिंद संघाच्या सभासदांची संख्या सव्वा लाख झाली. शाखांची संख्या ४० पर्यंत वाढली. ५६ हजार युद्धकैद्यांपैकीं ५० हजार आझाद–हिंद फौजेंत सामील झाले. दररोज ही शक्ति वाढत गेली. संघटनेची ताकदही वाढूं लागली.

हिंदी स्वातंत्र्य सैनिकांचें हें विराट स्वरूप पहातांच जपानी मुत्सद्यांची तारांबळ उडाली. आपण हा एक भस्मासूर तर निर्माण करीत नाहीं ना ? अशी भीति त्यांना वाटूं लागली. हिंदी लोकांच्या हालचालीकडे ते संशयानें पाहूं लागले. इतकेंच नव्हे तर त्यांच्या मार्गांत अडचणी निर्माण करूं लागले. जपानी सरकारचा डाव होता कीं, या हिंदी लोकांना बनवून आपला स्वार्थ साधायचा. पण आझाद हिंद संघाच्या युद्ध समितीनें जपानी सरकारचे ' जो हुकूम ' होण्यास साफ नाकारलें. ज्या स्वाभिमानानें, स्वदेशप्रेमाच्या भावनेनें प्रेरित होऊन हिंदी लोकांनीं हें महान् कार्य सुरू केलें होतें त्या भावनेला कोणत्याही प्रकारें अशुद्धता येईल असें कृत्य करण्यास ते तयार नव्हते. जपान्यांनींही आपला निश्चय एकदम सोडला नाहीं. पेनांगच्या ' स्वराज्य आश्रमांत ' ठिकठिकाणचे हिंदी तरुण विविध राष्ट्रीय कार्याचें शिक्षण घेण्यासाठीं आलेले होते. इवाकिको कुकांग या जपानी अधिकाऱ्यानें एक दिवस कांहीं सैनिक बरोबर घेऊन आश्रमावर अचानक झडप घातली व कांहीं हुषार विद्यार्थ्यांना जबरदस्तीनें फौजेच्या कामासाठीं नेलें. रासबिहारी बोस आणि युद्ध समितीचे सभासद यांना हा प्रकार सहन झाला नाहीं. रासबिहारी बोस यांनीं तावडतोब आश्रमच बंद करण्याचें ठरविलें. आपण जपान्यांना दुखवितां कामा नये असें रासबिहारीनां सुचविण्यांत आलें तेव्हां त्यांनीं साफ उत्तर दिलें, " जपानी जास्तीत जास्त काय करणार ? आमचे प्राणच घेणार ना ? हरकत नाहीं. जपान्यांना गुप्त हेर पुरविणें हें कांहीं आमचें काम नव्हे. कोणाही हिंदी माणसाला त्याच्या इच्छेविरुद्ध कोणत्याही कामासाठीं नेण्याचा जपानी फौजेला अधिकार नाहीं. "

बँकॉक परिषदेच्या निर्णयाला जपानी सरकारकडून ताबडतोब स्पष्ट संमति मागण्यांत आली. ही संमति मिळाली नाहीं तेव्हां पेनांगचा ' स्वराज्याश्रम ' बंद करण्यांत आला. जपानी सरकारनें रासबिहारींना त्यांच्या रहात्या घरांतच नजर कैदेंत ठेवलें. कोणालाही त्यांची भेट घेतां येत नसे. रासबिहारींना ठार मारण्याचीही धमकी देण्यांत आली. त्याचबरोबर आझाद फौजेला बर्मा आघाडीवर घेऊन जाण्याचा निश्चयही जपानी सरकारनें जाहीर केला. आझाद फौजेला बर्मा आघाडीवर नेण्यासाठीं जहाजही येऊन पोहोंचलें, परंतु युद्ध कमिटीनें आझाद फौजेला जपान्यांच्या बरोबर पाठविण्याला विरोध केला आणि जहाज रिकामेंच परत गेलें. जपान्यानीं आझाद फौजेचे कर्नल गिल यांना ब्रिटिश हेर असल्याच्या संशयावरून ६ डिसेंबरला अटक केली. या अटकेमुळें प्रकरण अधिकच चिडीस गेलें. अटकेचा निषेध म्हणून युद्ध--समितीच्या सर्व सभासदांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला. श्री. रासबिहारी बोस यांनीं आझाद हिंद संघाच्या शाखांना आपलें कार्य चालू ठेवण्याचा सल्ला दिला व जपानी मुख्य प्रधान टोजो यांच्याशीं या बाबतींत बोलणें करण्यासाठीं ते स्वतः टोकिओला गेले. परंतु तरीही जपानी अधिकाऱ्यांच्या कारवाया बंद पडल्या नाहींत. त्यांनीं एक युवक चळवळ सुरू करण्याचा आव आणून कांहीं हिंदी तरुणांना फसवून आपल्या जाळ्यांत ओढलें. या जपानी हस्तकांनीं युद्ध समितीविरुद्ध प्रचार करण्याचाही यत्न केला पण त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. अशा रीतीनें हिंदुस्थानी लोकांच्या संघटनेला खिशांत घालण्याचे वा बाजूला सारण्याचे सर्व प्रयत्न फसल्यानंतर मग जपानी मुत्सद्यांच्या डोक्यांत प्रकाश पडला. त्यांनीं सुभाषबाबूंना मलायांत आणण्याचें आश्वासन दिलें व ते येथें येऊन पोंचेपर्यंत काम कोणत्याही प्रकारें अडथळा न आणतां करूं देण्याचेंही त्यांनीं कबूल केलें. लाल किल्ल्यांतील लष्करी कोर्टापुढें दिलेल्या साक्षींत आझाद हिंद सरकारचे अंदमान-निकोबारमधील हाय कमिशनर कर्नल लोकनाथन यांनीं आपल्या साक्षींत या सर्व घटनांचें तपशीलवार वर्णन केलें होतें. त्यांनीं कोर्टापुढें असें सांगितले कीं, डिसेंबर १९४२ मध्यें जी परिस्थिति निर्माण झाली त्याचें कारण रासबिहारी बोस आणि कॅप्टन मोहनसिंग यांच्यांतील मतभेद हें होय. रासबिहारी बोस जपानमध्यें कित्येक वर्षें राहिले होते त्यामुळें त्यांचा कल थोडा जपानकडे होता. आझाद

फौजेच्या नियंत्रणांत जपान्यांना भाग देण्यास ते नाखूष नव्हते पण कॅप्टन मोहनसिंग जपान्यांच्याबद्दल कठोर धोरण स्वीकारावें अशा मताचे होते. आझाद हिंद फौज ही वस्तुतः आझाद हिंद संघाच्या नियंत्रणाखालीं होती पण मोहनसिंगानें जपानी लोकांच्या विरुद्ध काम करण्याला सुरवात केली.त्यांनीं पुष्कळशी जबाबदारी आपल्याकडे घेतली व आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्यासाठीं घरीं बोलावण्यास सुरवात केली. जपान्यांनीं बँकॉक परिषदेच्या मागण्या अद्याप पूर्ण केल्या नाहींत हीही मोहनसिंगाची तक्रार होती. आझाद हिंद फौजेला मित्र राष्ट्राच्या फौजे-सारखे बरोबरीच्या नात्यानें वागविलें पाहिजे व जपान्यांच्या नियंत्रणाखालीं जी कांहीं हिंदी फौज असेल ती सर्व आझाद हिंद फौजेच्या स्वाधीन केली पाहिजे. नेताजी आल्यानंतर या मागणीप्रमाणें सर्व हिंदी फौज त्यांच्या स्वाधीन करण्यांत आली पण त्यावेळीं या प्रकारच्या विचाराबद्दल मोहनसिंगाला अटक करण्यांत आली. मोहनसिंगनें अटक होण्याचे प्रसंगीं आझाद हिंद फौजच बरखास्त केली. या फौजेंतील सैनिकांना पुन्हां युद्धकैदी बनवावें असें जपान्यांना सांगण्यांत आलें होतें पण त्यांनीं तसें केलें नाहीं. आम्ही त्यांना स्वतंत्र केलें आहे. पुन्हा कांहीं कारण नसतांना त्यांना अटक करतां येत नाहीं असें सांगण्यांत आलें. आपसांतील हे सर्व गैरसमज दूर करण्यासाठीं मार्च १९४३ मध्यें एक शिष्टमंडळ जपानला पाठविण्यांत आलें. कॅप्टन मोहनसिंग आणि कर्नल गिल हेही या शिष्टमंडळाचे सभासद होते. शिष्टमंडळ परत आल्यावर बिदादरीमध्यें पुन्हा एक परिषद झाली.

१८ एप्रिलला पूर्व–आशियांतील हिंदी लोकांची परिषद होऊन सुभाषबाबू तेथें येऊन पोंचल्याचें जाहीर करण्यांत आलें. सर्व संघटनेला लष्करी रूप देण्यांत आलें. पैसा व माणसें गोळा करण्यास जोरानें सुरवात झाली. व्यवस्थित अंदाज-पत्रक वगैरे बनविण्याला सुरवात झाली. मध्यवर्ती संघटनेच्या द्वारें सर्व कार्य होऊं लागलें. सर्व शाखा व उपशाखांची पुनर्घटना करण्यांत आली. सुभाषबाबू मलायांत आले ही बातमी पसरतांच या संघटनेंत नवजीवन निर्माण झालें व लोकांचा उत्साह शतपटीनें वाढला. नव्या उत्साहानें लोक कामाला लागले.

# स्वतंत्र हिंदुस्थानचा विजय असो!

ता. २० जून १९४३ ला जनाब हसन नांवाच्या एका मुसलमान युवकासह सुभाषबाबू एका पाणबुडींतून टोकिओला येऊन पोचले. तेथें त्यांचें भव्य बादशाही स्वागत करण्यांत आलें. जनरल टोयो स्वतः सुभाषबाबूंच्या स्वागताला जातीनें हजर होते. पूर्व आशियांतील अनेक ठिकाणचे लोक सुभाषबाबूंचें स्वागत करण्यासाठीं व त्यांना सर्व परिस्थितीची माहिती देण्यासाठीं आले होते. आल्या-बरोबर सुभाषबाबू कामाला लागले. हिंदी लोकांना उद्देशून एक पत्रक त्यांनीं ताबडतोब काढलें. या पत्रकांत सुभाषबाबूंनीं सांगितलें, " गेल्या युद्धांत इंग्रज मुत्सद्यांनीं आम्हांला आणि आमच्या पुढाऱ्यांना फसविलें. म्हणून १९२० सालींच आम्ही असा दृढ निश्चय केला होता कीं, पुन्हां पुढें कधींही त्यांच्यावर विश्वास ठेवायचा नाहीं. वर्षान् वर्ष लढा–अखंड–लढा केला, वाट पाहिली तेव्हां कुठं आतां स्वातंत्र्याची प्रभात उगवते आहे! अशी संधि पुन्हां शंभर वर्षांत मिळणार नाहीं. आपल्या बलिदानानें प्राप्त केलेल्या स्वातंत्र्याचेंच आम्ही रक्षण करूं शकतो. तलवारीला तलवारीनेंच जबाब दिला पहिजे. कठोर अग्निदिव्यांतून गेल्यावरच आम्हांला स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार प्राप्त होईल!'

दुसऱ्या दिवशीं, ता २१ जूनला त्यांनीं टोकिओ रेडिओवरून भाषण केलें. या भाषणांत सुभाषबाबूंनीं हिंदी लोकांनीं स्वातंत्र्याच्या वेदीवर प्राणाचें सर्वस्वाचें बलिदान करण्यास आवाहन केलें. सुभाषबाबूंच्या पत्रकाचा आणि या भाषणाचा जादूसारखा परिणाम झाला. एक विद्युल्लहरच जणूं प्रगटून दिशा उजळून गेली.

२ जुलै १९४३ ला सुभाषबाबू शोनानला पोचले. त्यांच्या दर्शनाला लोकांची प्रचंड गर्दी झाली होती. जन-सागरच उफाळला होता. आकाशांतील देवतांनींही हेवा करावा असें सुभाषबाबूंचें प्रेमपूर्ण श्रद्धामय स्वागत जनतेनें केलें. बादशहाला किंवा सम्राटाला तर असें स्वागत प्रजेकडून कधींच मिळालें नसतें. सुभाषबाबूंच्या स्वागताला केवळ हिंदीच नव्हे तर चिनी, जपानी व मलायावासी लोकही जमले. सुभाषबाबू आपल्यांत येऊन पोचल्याचा हिंदी लोकांना तर इतका बेहोष हर्ष झाला कीं, अभिमानानें छाती

फुटूं लागेल. त्यांच्या गर्वोन्मत्त माना अधिकच उंच झाल्या, त्यांच्या स्वाभिमानाला मर्यादा उरली नाहीं. इंग्रज सरकारच्या डोळ्यांत धूळ फेकून त्यांच्या गुप्त पोलिसांच्या हातावर तुरी देऊन हिंदुस्थानांतून बाहेर पडलेला बहाद्दर पुढारी आज त्यांच्यामध्यें आला होता.....सुभाषबाबूंचे पहिले २ दिवस भेटीगाठींत व विचारविनिमय करण्यांत गेले. हाँगकाँग, थायलँड, ब्रम्हदेश, बोर्निओ इत्यादि ठिकाणांहून आलेल्या आझाद हिंद संघाच्या कार्यकर्त्यांशीं व आ. हिं. फौजेच्या पुढाऱ्याशींही त्यांनीं चर्चा केली.

४ जुलैला पूर्व अशियांतील सर्व देशांतल्या हिंदी लोकांच्या प्रतिनिधींची जाहीर परिषद सुरू झाली. परिषदेच्या व्यासपीठावर महात्मा गांधींचें सुंदर अन् विशाल चित्र उभारण्यांत आलें होतें. तर व्यासपीठावर नेताजींची भव्य, जिवंत अन् जागृत मूर्ति गांधीजींच्या प्रतिमे इतकीच स्फूर्तिशाली अन् आकर्षक वाटत होती. सुभाषबाबूंच्या वाणींत कांहीं गूढ जादू होती. त्यांच्या भाषणांत कृत्रिम वक्तृत्वाच्या कोणत्याही कला नव्हत्या. ते हातवारे करीत नसत पण त्यांच्या शब्दांत जी भाव-गंभीरता होती त्याचा परिणाम श्रोत्यांच्या हृदयावर होत असे. त्याग, तपस्या, अन् बलिदान हेंच ज्यांच्या जीवनाचें विशेष होते त्यांच्या शब्दांत ही याच तत्वाची प्रेरणा असायची. म्हणूनच त्यांच्या भाषेंत स्वाभाविक तेज, अन् आवेश भरलेला होता. त्यांच्या भाषाशैलींत कोणत्याही प्रकारची कृत्रिमता नव्हती. गंगेच्या साध्या, सरळ, अन् स्वच्छ प्रवाहाप्रमाणें त्यांच्या वक्तृत्वाचा ओघ असे. त्या वक्तृत्वांत भावनांचा अन् विचारांचाही इतका सुंदर मिलाप झालेला असे कीं, विरोधी मताच्या माणसाच्या मनावरही त्याचा परिणाम होईल. प्रत्येक श्रोत्याला असें वाटावयाचें कीं, सुभाषबाबू जणूं फक्त आपल्याशींच बोलत आहेत. असा पुढारी मिळाल्यानें पूर्व आशियांतील हिंदी लोकांना इतका संतोष वाटला कीं, जणुं त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण झालेच होते. त्यांच्या कार्यक्रमांत एक नवीन जिवंतपणा निर्माण झाला. या परिषदेंत रासबिहारी बोस यांनीं छोटेसें प्रास्ताविक भाषण करून नेताजी-सुभाषचंद्र बोस यांच्याकडे आ. हिं. संघाचें अध्यक्षपद देण्यांत आल्याचें जाहीर केलें. या घोषणेचें प्रचंड जयघोषानें स्वागत करण्यांत आलें.

सुभाषबाबूंनीं आपल्या भाषणांत आ. हिं. सरकारची स्थापना करण्याचा उद्देश जाहीर केला. सर्व हिंदी लोकांचें कार्य, शक्ति व साधनें यांचें केंद्रीकरण करून त्यांचा संघटित उपयोग केला जाईल, व अशा प्रकारें स्वातंत्र्य संपादन करून आम्हीं त्याचें संरक्षण करूं शकूं असें नेताजींनीं सांगितलें. "आम्हांला ज्या शत्रूंशी सामना करावयाचा आहे तो जितका शक्तिसंपन्न आहे तितकाच धूर्त अन् निष्ठुरही आहे. स्वातंत्र्याच्या या अखेरच्या लढाईंत आम्हांला भूक, तहान व सर्व प्रकारचे कष्ट आणि अखेर मृत्यूशींही सामना करावा लागेल. त्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाहीं."

तारीख ५ जुलैला टाऊनहॉल समोर आझाद हिंद फौजेची भव्य परेड झाली. सर्व सैनिकांनीं नेताजींना सलामी दिली. सुभाषबाबू या सैनिकांची सलामी घेत असतांना असा भास झाला कीं, एक नवें जगच निर्माण झालें. सलामी घेतल्यानंतर सैनिकांना उद्देशून भाषण करतांना सुभाषबाबू म्हणाले, "आजचा दिवस माझ्या आयुष्यांत अभिमानाचा दिवस आहे. हिंदुस्थानला स्वतंत्र करूं शकेल अशी फौज आम्ही उभी केली आहे हें आज साऱ्या जगाला दाखविण्याचें अलौकिक भाग्य माझ्या वाट्याला आलें आहे. या फौजेचें संघटन संपूर्ण हिंदुस्थानी लोकांकडूनच झालें असून हिंदी नेत्यांच्या नेतृत्वाखालीं तें हिंदुस्थानवर कुच करील. या फौजेचा सर्व हिंदी लोकांना अभिमान वाटला पाहिजे. माझ्या वीर सैनिकहो! तुमची घोषणा 'चलो दिल्ली, चलो दिल्ली' आहे. दिल्लीच्या लाल किल्यांत ब्रिटिश साम्राज्याचें कबरस्तान करून त्यावर विजयाची कवायत करणें हें आपलें अंतिम लक्ष्य आहे. अमेरिकेंत जॉर्ज वॉशिंग्टनला आणि इटलींत गॅरीबॉल्डीला यश मिळालें याचें कारण त्यांच्याजवळ त्यांच्या स्वतःच्या फौजा होत्या. आज हिंदुस्थानची स्वतंत्र फौज खडी झाली आहे. मी संकटांत, अंधारांत अन् प्रकाशांत दुःखाच्या वेळीं अन् सुखाच्या वेळीं, पराजयांत अन् विजयांत सदोदित तुमच्या बरोबर राहीन. ईश्वरी कृपेनें आमच्या स्वातंत्र्य-युद्धांत आम्हांला विजय प्राप्त होवो."

ता. ६ जुलैला जपानचे मुख्य प्रधान जनरल टोयो शोनानला आले. त्यांनीं सुभाषबाबूंची भेट व आझाद हिंद फौजेची सलामी घेतली. दीड तासपर्यंत

राष्ट्रीय ध्यजाच्याखालीं उभे राहून टोयो सुभाषबाबूसह आझाद फौजेची कवाईत पहात होते. त्याच दिवशीं पहांग येथें म्युनिसिपल ऑफिसच्या समोर आणखी एक निदर्शन झालें. या निदर्शनाला एक लाखापेक्षां अधिक लोक जमले होते. इतका अपूर्व उत्साह लोकांमध्यें यापूर्वी कधींच आढळून आला नव्हता. एका आठवड्यांत सुभाषबाबूंनीं सर्व हिंदी लोकांचीं मनें जिंकलीं. लहान–मोठे, स्त्री–पुरुष, मुलें सर्वांना नेताजी हे आपलेच आहेत असें वाटे. कितीही गर्दी झाली, दर्शनासाठीं पायाला स्पर्श करण्यास लोकांनीं धक्काबुक्की केली आणि खुद्द त्यांनाही धक्के खावे लागले तरी सुभाषबाबू चिडत नसत, रागावत नसत. त्यांच्या चेहेऱ्यावर सदैव हास्य खेळत असे. सुभाषबाबूंनीं ता.६जुलैच्या भाषणांत पूर्व आशियांतील तीस लक्ष हिंदी लोकांमधून तीन लक्षांची फौज व एक कोटी डॉलरचा निधी उभारण्याची घोषणा केली. ५७ च्या युद्धांतील झांशीच्या राणीच्या तेजस्वी पराक्रमाची आठवण करून स्त्रियांच्याही फलटणी उभ्या झाल्या पाहिजेत असें त्यांनीं आवाहन केलें.

आझाद हिंद फौजेच्या महिला विभागाचें नांव झांशीच्या शूर राणीच्या स्मरणार्थ “ राणी झांशी फलटण ” ठेवण्यांत आलें होतें. २१ जुलैला महिला-विभागातर्फे स्त्रियांची प्रचंड जाहीर सभा होऊन सुभाषबाबूंचें भाषण झालें. नेताजींनीं सर्व महिलांना झांशी रेजीमेंट आणि शुश्रूषा-पथकांत सामील होण्याचा उपदेश केला. हिंदी स्वातंत्र्य-लढ्यांत महिलांनीं केलेल्या कार्याचा स्फूर्तिदायक इतिहास त्यांनीं निवेदन केला. स्त्रिया शस्त्र चालवूं शकत नाहींत असें म्हणणाऱ्यांना झांशीच्या राणीचा दाखला त्यांनीं दिला. सुभाषबाबूंच्या ओजस्वी वाणीचा प्रभाव इतका होता कीं, सभेंतच अनेक स्त्रियांनीं आझाद सरकारसाठीं आपल्या हातांतल्या बांगड्या, अंगठ्या व नेकलेस वगैरे अलंकार काढून दिले. प्रचंड उत्साहानें संघटनेचें काम सुरू झालें. शोनान आणि पेनांग येथें ‘ शिक्षण-शिबिरें ’ उघडण्यांत आलीं. आझाद संघाच्या सभासदांची संख्याही झपाट्यानें वाढूं लागली. आतां संघाचे सभासद एकंदर १७०००० झाले होते.

मलायांतील दहा संस्थानांत संघाच्या शाखा आणि ५० जागीं उपशाखा स्थापन झाल्या. फौजेंत भरती होण्यासाठीं तर लोकांमध्यें चढाओढ सुरू झाली,

अर्जांचा चहूंकडून वर्षाव होऊं लागला. ९ ऑगस्टला हिंदी क्रांतीचा वर्षदिन सर्वत्र समारंभानें पाळण्यांत आला. पूर्व आशिया आणि मलायाच्या कानाकोपऱ्यांत अनेक सभा झाल्या. शोनानच्या विराट सभेंत महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांचीं भव्य चित्रें लावण्यांत आलीं. सुभाषबाबूंचें भाषण अत्यंत ओजस्वी झालें. या भाषणांत सुभाषबाबूंनीं दोन महिन्यांत आझाद फौज ब्रम्हदेशांत कूच करून हिंदुस्थानवर चढाई सुरू करील अशी घोषणा केली. आझाद हिंदसरकारचें मुख्य ठाणेंही रंगूनला हलविण्यांत येणार असल्याचें जाहीर केलें.

ता. २५ ऑगस्टला सुभाषबाबूंनीं आझाद हिंद फौजेचें नेतृत्व आपल्या हातीं घेतलें. या दिवशीं काढलेल्या पत्रकांत सुभाषबाबू म्हणतात, " हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा लढा व आझाद–हिंद–फौजेचें कार्य पुढें चालविण्यासाठीं मी आज फौजेचें नेतृत्व स्वीकारीत आहे. मला हा प्रसंग अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं उभारण्यांत आलेल्या फौजेचें नेतृत्व मिळणं यापेक्षां अधिक सन्मानाची गोष्ट कोणती असूं शकेल? मी तर चाळीस कोटी हिंदी लोकांचा एक सेवक आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत आझाद हिंद फौज आपलें काम चोख बजावील. या फौजेपुढें एकच ध्येय आहे–हिंदुस्थानचें स्वातंत्र्य. या फौजेची एकच उत्कट इच्छा आहे या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्व देणें, प्राणाचेंही बलिदान करणें. आझाद हिंद फौज खडी झाली कीं, ती संगमरवरी शिलेच्या अभंग कोटासारखी अभेद्य राहील आणि ती कूच करील तेव्हां स्टीमरोलरप्रमाणें अमोघ गतीनें मार्गांत येणारे सर्व अडथळे नष्ट करून पुढें जाईल. आम्हांला आज आमच्या स्वातंत्र्याच्या हक्कापासून वंचित करूं शकेल अशी एकही शक्ति या जगांत नाहीं. 'चलो दिल्ली' ची घोषणा करून जी लढाई आम्ही सुरूं केली आहे ती व्हाइसरीगल लॉजवर तिरंगी झेंडा रोवून आणि दिल्लीच्या लाल किल्ल्यांत विजयाची परेड केल्यावरच थांबेल. "

शोनान, कवाला–लंपूर, सलेम्बान, इपोद इत्यादि सर्व जागीं शिक्षण शिबिरें उघडण्यांत आलीं व प्रत्येक शिबिरांत शेकडों हिंदी सैनिकांना विविध प्रकारचें

लष्करी शिक्षण देण्यांत येऊं लागलें. नेताजी या शिबिरांना भेट देऊन तेथील कामाची पहाणी करीत. ता. २६ सप्टेंबरला हिंदुस्थानचे अखेरचे बादशहा शहेनशहा बहादूरशहाचा स्मृतिदिन अत्यंत सन्मानपूर्वक व समारंभानें पाळण्यांत आला. बहादूरशहाच्या पवित्र स्मृतीला श्रद्धांजली अर्पण करतांना नेताजींनीं आपल्या तेजस्वी भाषणांत बहादूरशहाच्याच शब्दांत जाहीर केलें कीं,—

गाजियों में बू रहेगी जब तलक ईमान की ।
तब तो लन्दन तक चलेगी तेग हिंदुस्थान की ॥

२ आक्टोबरला महात्मा गांधींचा जन्मदिवसही पाळण्यांत आला. त्या दिवशीं घरोघर राष्ट्रीय झेंडे उभारण्यांत आले. प्रभातफेऱ्या आणि मिरवणुका निघाल्या. गांधीजींना आदरपूर्वक अभिवादन करतांना नेताजींनीं अत्यंत मार्मिक भाषण करून गांधीजींच्या विविध कार्यांचें विवेचन केलें. गांधीजींचें नांव देशाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिलें जाईल असे नेताजींनीं उद्गार काढले. नेताजी म्हणाले, 'महात्मा गांधींनीं सत्याग्रहाचें तंत्र स्वीकारलें, कारण त्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग देशापुढें नव्हता. पण १९२० सालीं गांधीजींनींही जाहीर केलें होतें कीं, हिंदुस्थानजवळ तलवार असती तर तलवारीनेंही स्वातंत्र्य मिळविलें असतें. आज आम्हांला आनंद आणि अभिमान वाटतो. हिंदुस्थानची स्वतंत्र फौज अस्तित्वांत आली आहे आणि तिची संख्या दररोज वाढत आहे.

मलायांतील लोकांचाही हिंदी लोकांना संपूर्ण पाठिंबा होता. कारण ब्रिटिशांनीं त्यांच्या देशावर केलेल्या अत्याचारांनीं त्यांचीहीं अंतःकरणें आंतल्याआंत जळत होतीं. मलाया ब्रिटिशांनीं तलवारीच्या जोरावर नव्हे तर कपटानें–विश्वासघातानें जिंकला होता. मलाया ताब्यांत आणण्यासाठीं शंभर इंग्रजांचे प्राण कांहीं बळी पडले नव्हते. जोहोरच्या सुलतानाकडून १८२६ मध्यें सिंगापूर खरेदी करण्यांत आलें होतें. पेनांग १७८३ मध्यें केडाहच्या सुलतानापासून विकत घेण्यांत आलें. मलाक्का डचापासून खरीदण्यांत आलें. पेराकचा इतिहास तर अतिशय आश्चर्यकारक आहे. १८७४ पर्यंत तेथें सुलतानाचें राज्य अबाधित चाललें होतें. नंतर तेथें कांहीं अंतर्गत झगडे झाले आणि त्यांत इंग्रजांची मदत मागण्याचा मूर्खपणा सुलतानानें केला. एक इंग्रज तेथें गेला. त्याचा ब्रिटिशांनींच

आपल्या हस्तकाकडून खून करविला. या खुनाचा सूड म्हणून पेराकमध्यें ब्रिटिश घुसले. त्यांनीं अनेकांना खुनाच्या संशयावरून फांसावर चढविलें. व पेराकमध्यें इंग्रजांचा अंमल स्थापन केला. १८२४ मध्यें पेराकला स्वतंत्र करण्याचें वचन इंग्रजांनीं दिलें होतें पण तें आजपर्यंत पूर्ण झालेलें नाहीं. सेलांगोर, नेगरी, सेमबिलान आणि पहांग येथेंही अशाच प्रकारें आपसांत झगडे निर्माण करून इंग्रजांनीं आपला शिरकाव करून घेतला. इंग्रजांचे आपल्या हस्तकांकडूनच खून करून त्याचा उपयोग मलायांत इंग्रजांचें आधिपत्य स्थापन करण्यासाठीं केला गेला. आजही इंडोनेशिया आणि सयाममध्यें अशाच कारस्थानी धोरणाचा अवलंब केला जात आहे. इंग्रजांच्या या कपटाला, बेइमानीला, विश्वासघाताला कंटाळलेले बर्मी आणि मलायन लोक हिंदी लोकांच्या बाजूला जावे हें स्वाभाविकच होतें.

आझाद हिंद सरकारनें एक वर्षांत आश्चर्यकारक प्रगति केली. या वर्षांत हिंदी लोकांनीं—

( १ ) नेताजींच्या आदेशानुसार द्रव्य, माणसें व साधनसामुग्री अपेक्षेइतकी जमा केली.

( २ ) हिंदी फौजेला आधुनिक लष्करी शिक्षण देऊन लढाईसाठीं तयार केली.

( ३ ) झांशीच्या राणीच्या नांवानें महिला--फलटण उभी केली.

( ४ ) आझाद सरकारची स्थापना होऊन नऊ परकीय सरकारांकडून मान्यता मिळाली.

( ५ ) अन्दमान आणि निकोबारच्या स्वतंत्र प्रदेशांत आझाद हिंद सरकारची सत्ता स्थापन झाली व त्यांचीं नांवें बदलून अनुक्रमें ‘ शहीद द्वीप ’ व ‘स्वराज्य द्वीप ’ अशीं ठेवण्यांत आलीं.

( ६ ) आझाद हिंद सरकारची राजधानी ब्रह्मदेशांत हलविण्यांत येऊन ४ फेब्रुआरी १९४४ ला युद्धाची घोषणा करण्यांत आली. २१ मार्चला आझाद हिंद फौजेनें हिंदुस्थानच्या भूमीवर पाऊल ठेवलें.

( ७ ) आझाद हिंद सरकारच्या वतीनें एकंदर एकोणीस निरनिराळी खातीं उघडण्यांत आलीं. शिक्षणाची व्यवस्था पद्धतशीर करण्यांत आली. हिंदुस्थानीचा घरोघर प्रसार झाला.

( ८ ) वृत्तपत्रें, प्रकाशन व प्रचार यांचेंही काम व्यवस्थित सुरू झालें. ' आझाद हिंद ' नांवाचें दैनिक व ' जय हिंद ' नांवाचें साप्ताहिक सुरू करण्यांत आलें. ही पत्रें इंग्रजी व हिंदी दोन्ही भाषांत प्रसिद्ध होत.

( ९ ) सरकारचा कारभार चालविण्यासाठीं व युद्धानंतर स्वतंत्र हिंदुस्थानाची पुनर्घटना करण्यासाठीं ' आझाद हिंद ' दलाची स्थापना करण्यांत आली.

( १० ) आझाद हिंद सरकारची आझाद हिंद नॅशनल बँकही उघडण्यांत आली. स्वतंत्र भारताचे स्टँप्सही काढण्यांत आले.

नेताजींवर जनतेची अमर्याद श्रद्धा होती, विश्वास होता, प्रेम होतें. आपल्या कार्यानें, सेवावृत्तीनें व अभ्यासानें त्यांनीं सर्वांच्या मनावर मोहिनी घातली. त्यांचा शब्द हिंदी लोक, ईश्वरीसंकेताप्रमाणें मानून त्यांची इच्छा तावडतोब पूर्ण करीत. नेताजी रात्रंदिवस एकाद्या यंत्रासारखें अखंड काम करीत. ते फारतर दोन अडीच तास झोंप घेत. सर्वांच्या बरोबरच इतरांना मिळे तेंच अन्न खायचें असा त्यांचा नियम होता. आपल्या आचार, विचार आणि व्यवहारांतील या समानतेनें त्यांनीं सर्वांच्या अंतःकरणांत स्थान मिळविलें. त्यांच्या एका शब्दासाठीं पाण्याप्रमाणें पैशाचा पाऊस पडे. लोहचुम्बकाप्रमाणें त्यांच्याकडे लोक आकर्षिले जात. २६ आक्टोबर १९४३ ला जालान अँड केसर स्टेडिअममध्यें श्रीमंत लोकांपुढें बोलतांना त्यांनीं सांगितलें कीं, जेथें इतर लोक आपल्या जीविताचें व सर्वस्वाचें बलिदान करीत आहेत तेथें तुम्ही तुमच्या संपत्तीचा पांच वा सहा टक्के भाग देशासाठीं दिला तर कांहीं विशेष नाहीं. प्रत्येक सैनिकानें जर म्हटलें कीं, मी फक्त पांच किंवा सहा टक्के रक्त देईन तर लढाई चालेल काय ? गरीब लोक सर्व समर्पण करीत आहेत आणि तुम्ही मात्र किती टक्के द्यायचें याचा फक्त हिशेब करीत बसला आहांत ! चाळीस कोटी लोकांचें स्वातंत्र्य जिंकणें यापेक्षां अधिक श्रेष्ठ, उदात्त व पवित्र ध्येय दुसरें कोणतें असूं शकेल ? मी तुमच्याकडे फक्त दहा कोटी डॉलरची मागणी करीत आहे दहा

कोटी डॉलर म्हणजे मलायांतील हिंदी लोकांच्या एकंदर संपत्तीपैकीं दहा टक्के-सुद्धां होत नाहींत. नेताजींच्या भाषणाचा परिणाम होऊन जागच्या जागींच ७० लाख डॉलरचे आंकडे पडले व चोवीस तासाच्या आंत एक कोटी ३० लाख जमाही झाले.

पेनांगच्या जाहीर सभेंतही नेताजींनीं निधीसाठीं पैसे देण्याची विनंति केली. या सभेंत घरकाम करणाऱ्या एका गरीब नोकरानें नेताजींना एक फुलदाणी देऊन सांगितलें कीं, आईची आठवण म्हणून ही फुलदाणी मी इतके दिवस जपून ठेवली होती ती आज नेताजींच्या चरणांवर ठेवीत आहे. या फुलदाणीचा नेताजींनीं लिलाव केला तेव्हां पहिली बोली पंचवीस हजार डॉलरची झाली व अखेर एक लाखाला ती विकली गेली.

२६ जानेवारीच्या स्वातंत्र्यदिनाच्या अभूतपूर्व सभेंतही नेताजींनीं असाच आपल्याला मिळालेल्या हाराचाच लिलाव केला. एक लाखा पासून मागणी सुरू झाली व ती दीड, तीन, चार, सव्वाचार, पांच, सहा अशी वाढत वाढत सात लाखांवर जाऊन जाऊन पोंचली. एक लाखाची पहिली बोली एका पंजाबी तरुणानें केली होती. सात लाखाला नेताजींचा हार दुसऱ्याच्या हातीं जात आहे हें त्याला सहन झालें नाहीं. त्यानें व्यासपीठावर उडी मारली आणि या हारासाठीं आपली सर्व संपत्ति पणाला लावली. आपली सर्व संपत्ती त्यानें आझाद हिंद फौजेला देऊन टाकली. नेताजींनीं त्याला दृढालिंगन दिलें व त्याच्या गळ्यांत हार घातला. तरुणानें हार आपल्या माथ्याला व डोक्याला लावला. आज आपण कृतार्थ झालों असें त्याला वाटलें. हाराचीं फुलें एकामागून एक कोमेजून गेलीं पण त्या तरुणाच्या त्यागाची, तपस्येची व बलिदानाचीं फुलें सदैव टवटवीतच राहिलीं व त्याचा सुगंधही सर्वत्र सतत दरवळत होता.

मे महिन्यांत कांहीं अत्यंत महत्वाच्या कामासाठीं रंगूनहून नेताजी शोनानला जाण्यासाठीं निघाले होते. विमानतळावर ते येऊन पोचले तेव्हां त्यांना निरोप देण्यासाठीं आलेल्या लोकांना त्यांचा चेहरा चिंतायुक्त भासला. एकानें पुढें होऊन नेताजींना चिन्तेचें कारण विचारलें. नेताजींनीं सांगितलें कीं, अत्यंत बिकट प्रश्न निर्माण झाला आहे, तो रंगूनला सोडवितां येणार नाहीं. फौजे-

साठीं ताबडतोब वीस लाख रुपयांची जरूरी आहे. फौजेची परिस्थिति अत्यंत चिन्ताजनक झाली आहे. विमान सुटण्याची वेळ झाली होती. नेताजी आपल्या जागेवर जाऊन बसले होते. पण कांहीं कारणानें विमानाला दहा मिनिटें उशीर लागला त्या दहा मिनिटांत जमलेल्या लोकांनीं वीस लाखाचा निधी देऊं इच्छिणाऱ्यांची यादी नेताजींच्या हातांत ठेवली.

४ जुलै १९४४ ला नेताजी आझाद हिंद सरकारचे राष्ट्रपती व फौजेचे सरसेनापती होण्याला एक वर्ष झालें. या दिवशीं नेताजींची सोनें व जवाहिरांनीं तुळा करावयाची असा लोकांनीं निश्चय केला. स्त्रियांनीं या उत्सवाचा पुढाकार घेतला. बांगड्या, नेकलेस, अंगठ्या यांचा वर्षाव होऊं लागला. प्रत्येकानें आपल्याजिवळचा अत्यंत प्रिय अलंकार सर्वप्रिय नेताजींना अर्पण करण्यासाठीं दिला. एका मद्रासी स्त्रीनें तर आपली सर्व संपत्ती देऊन टाकली. ज्युबिलि हॉलमध्यें हा समारंभ झाला. कोठेंही एका तिळाएवढीसुद्धां जागा रिकामी राहिली नव्हती. या प्रसंगीं सार्वजनिक भाषण केल्यानंतर नेताजींनीं गांधीजींना उद्देशूनही एक भाषण केलें. गांधीजींचा आशिर्वाद मागतांना नेताजी म्हणाले, "हे राष्ट्रपिता, भारतमातेच्या स्वातंत्र्याच्या या पवित्र संग्रामांत आम्ही आपल्या आशिर्वादाची आणि शुभेच्छेची याचना करतों."

नेताजींच्या सन्मानार्थ पाळल्या गेलेल्या सप्ताहांत एका मुस्लीम कोट्याधिशानेंही आपलें घरदार, स्थावर–जंगम इस्टेट, अलंकार भूषणें सर्व नेताजींना अर्पण केलें. त्यांना नेताजींनीं ९ जुलैला लक्षावधी लोकांच्या विराट् सभेंत 'सेवक-ए-हिंद' हा बहुमानाचा किताब दिला. नेताजींना आपली सर्व संपत्ती देणाऱ्या मद्रासी महिलेचा ता. २१ ऑगस्ट १९४४ ला सन्मान करून तिलाही ही पदवी देण्यांत आली.

'आझाद हिंद–राष्ट्रीय–बँके'ची स्थापना देखील जनतेच्या सुभाषबाबूवरील अपरंपार विश्वासाची निदर्शक आहे. रंगून येथील एका कोट्याधीशाबरोबर नेताजी आझाद हिंद सरकारच्या आर्थिक स्थितीची चर्चा करीत होते. नेताजींनीं बँक स्थापन करण्याचा विचार प्रगट केला. बँकेशिवाय सरकार कसें चालणार ? इम्फाल हस्तगत केल्यावर आम्हांला आमचा शिक्कामोर्तब सुरू करावयाचा

आहे. नेताजींचें बोलणें ऐकून त्या कोट्याधीशानें विचारलें, 'बँकेसाठीं किती निधि लागेल ?' नेताजींनीं सांगितलें, कमींत कमी ५० लाख तरी पाहिजेत. त्यानें ताबडतोब ३० लाख नेताजींच्या हातांत ठेवले व उरलेले २० लाख एक आठवड्यांत जमविण्याचें आश्वासन दिलें. या ५० लाखाच्या निधीवर एप्रिल १९४४ पासून आझाद बँकेनें आपला कारभार सुरू केला. बँक कायदेशीर रजिस्टर करण्यांत आली. ताबडतोब बँकेच्या तीन शाखा निघाल्या. श्री. एस. ए. अय्यर, श्री. दीनानाथ, श्री. एस. एम्. रशीद, एच. आर. बेताई, एच. ई. मेहता आणि कर्नल अलगप्पन हे या बँकेचे डायरेक्टर होते.

आझाद हिंद सरकारच्या राज्यव्यवस्थेचा एक महत्वाचा विशेष हा होता कीं, आपल्या उत्पन्नासाठीं या सरकारनें लोकांवर कोणताही कर बसविला नाहीं. लोक स्वखुषीनें सरकारला निधी देत असत. आझाद हिंद–सरकारचें वार्षिक अंदाजपत्रक पंधरा कोटींचें होतें. एवढी प्रचंड रक्कम केवळ निधीरूपानें जमणें अशक्य होतें. म्हणून ही रक्कम उभी करण्यासाठीं एका अभिनव मार्गाचा अवलंब करण्यांत आला. प्रथम व्यापाऱ्यांची एक कमिटी स्थापन करण्यांत आली. या कमिटीचें काम असें होतें कीं, तिनें वारंवार हिंदुस्थानी लोकांच्या एकंदर संपत्तीचा अंदाज घ्यायचा व त्यापैकीं दहा टक्के भाग आझाद हिंद सरकारनें मागून घ्यायचा. निरनिराळ्या ठिकाणासाठीं उत्पन्नाच्या आकड्याप्रमाणें शेंकडेवारीचें प्रमाण बदलतें ठेवलें होतें. ही रक्कम बँकमध्यें भरतां येत असे. फक्त हिंदी लोकांनाच हा भाग द्यावा लागे. कांहीं हिंदी लोक ही जबाबदारी टाळण्यासाठीं आपण ब्रह्मी आहोंत असें दाखविण्याचा प्रयत्न करीत. त्यांना असें बजावण्यांत आलें कीं, त्यांनीं ब्रह्मी नागरिकत्व दाखविलें तर त्यांच्या जीवित मालमत्तेच्या रक्षणाची जबाबदारी आझाद हिंद सरकार घेणार नाहीं. हा इषारा मिळतांच ते लोक ताबडतोब ताळ्यावर आले.

ब्रम्हदेशाकडे ८ कोटी रुपयांची मागणी करण्यांत आली होती. १ जुलै १९४४ पर्यंत ब्रम्हदेशांतील हिंदी लोकांकडून ३॥ कोटी रुपये रोख व ४० लाखाचा माल मिळाला होता. २० जूनपर्यंत मलायानें १३७५०००० रुपये दिले. त्यांपैकीं मे महिन्यांतच फक्त १४ लाख जमा झाले होते. ब्रम्हदेशांतील

हिंदी लोकांनीं आपला आठ कोटीचा वाटा २६ जानेवारी १९४५ पर्यंत पूर्ण केला. मलायांत स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानें चाळीस लाख जमा झाले. बँकेचे डायरेक्टर कर्नल दिनानाथ यांनीं लाल किल्ल्यांतील लष्करी कोर्टापुढें साक्ष देतांना ब्रम्हदेशांतून १५ कोटी व मलायांतून ५ कोटी रक्कम जमा झाली असें सांगितलें होतें. ब्रम्हदेशांत एक ' नेताजी निधी कमिटी ' स्थापन करून फंड जमविण्यांत आला होता. मलायांतही फंड गोळा करण्यासाठीं वेगळी कमिटी बनविण्यांत आली होती. निधीला पैशाप्रमाणें धान्यरूपानेंही देणग्या मिळत. गहू, आटा, तांदूळ पुष्कळ प्रमाणांत दिला जाई. एकदां प्रत्येकानें एक गज कपडा द्यावा अशी मागणी करण्यांत आली होती. ज्यांना कपडा देतां आला नाहीं त्यांनीं स्वखुषीनें ५०–५० रु. भरले.

अशा प्रकारें आर्थिक व्यवस्था जितकी चांगली झाली होती तितक्या प्रमाणांत संघटनाही कार्यक्षम बनली होती. मलायांत संघाच्या एकंदर सत्तर शाखा व उपशाखा काम करूं लागल्या होत्या. ब्रह्मदेशांतील शाखांची संख्या शंभरावर गेली होती. थायलंडमध्यें सुद्धां चोवीस शाखा काम करूं लागल्या होत्या. सुमात्रा, जावा, आणि बोर्निओमध्येंही अनेक शाखा अस्तित्वांत आल्या होत्या. ता. २१ आक्टोबर १९४३ रोजीं आझाद हिंद संघाचें आझाद हिंद सरकारांत रूपांतर झालेलें जाहीर करून आझाद हिंद सरकारशीं एकनिष्ठेची शपथ घेतांना सुभाषबाबू म्हणाले, " आमच्या संघाचें महत्व केवळ आंदोलन करणारी संस्था एवढेंच आहे. देशाच्या स्वातंत्र्याचें युद्ध पुकारण्यासाठीं सरकारची स्थापना अवश्य आहे. आझाद हिंद. सरकारची स्थापना केल्यानें एक महत्वाची आवश्यकता तर पूर्ण होईलच पण इतिहासांतील एक धडा आपण अनुसरला असें होईल. १९१६ मध्यें आयर्लंडनेंही असेंच अस्थायी स्वतंत्र सरकार स्थापन केलें होतें. गेल्या महायुद्धांत तुर्कांनीं केमाल पाशाच्या नेतृत्वाखालीं असें सरकार निर्माण केलें होतें.'

नेताजींनीं आपल्या नव्या सरकारची प्रतिष्ठा कधींही किंचितही कमी होऊं दिली नाहीं. जपान्यांना तर त्यांनीं आपल्या सरकारकडे डोळा वाकडा करण्याची संधी कधीं दिली नाहीं. त्यांनीं कधींही पैसे व अन्नसामुग्रीसाठीं हात पसरला

नाहीं. स्वतंत्र सरकारच्या नेतृत्वाखालीं व अधिकारानें सर्व गोष्टी केल्या. युद्ध-सामुग्रीसुद्धां त्यांनीं जपान्यांकडून नेहमीं रोख मोबदला देऊनच घेतली. आझाद हिंद फौजेला शिक्षण देण्यासाठीं एकाही जपानी अधिकाऱ्याला नेमलें नव्हतें. आझाद हिंद सरकारला जपाननें २३ आक्टोबर १९४३ रोजीं, जर्मनीनें, स्वतंत्र बर्मा आणि स्वतंत्र फिलिपाईन सरकारांनीं २९ आक्टोबरला, आयर, क्रोआशिया, मँचुरिया, नानकिंग, सियाम यांनीं नोव्हेंबरला मान्यता दिली, २५ आक्टोबरला स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरकारनें ब्रिटन व अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारलें. व ४ फेब्रुआरी १९४३ ला स्वतंत्र रीतीनेंच हिंदुस्थानवर चढाई केली. जपानचे हस्तक म्हणून हिंदुस्थानशीं हल्ला करण्याची कल्पनासुद्धां त्यांना कधीं शिवली नाहीं. इंग्लंड व अमेरिकेविरुद्ध युद्ध–घोषणा करतांना लक्षावधी लोकांच्या जमावापुढें नेताजींनीं जाहीर केलें " आपल्या सरकारच्या नियंत्रणाखालींच आमची फौज हिंदुस्थानच्या पुण्यभूमीवर स्वातंत्र्ययुद्धासाठीं पाऊल टाकील. आझाद फौज इंग्रजांच्या हातून हिंदुस्थानचा प्रदेश जसजसा काबीज करीत जाईल तसा तेथें आझाद सरकारचाच अंमल स्थापन करण्यांत येईल. आम्ही आमच्या फौजेच्या सहाय्यानें, आमच्या परिश्रमानें आणि आमच्या बलिदानानेंच हिंदुस्थानला स्वतंत्र करूं. "

६ नोव्हेंबरला टोकिओ येथें पूर्व आशियांतील राष्ट्रांची एक परिषद भरविण्यांत आली. नेताजी आपल्या कांहीं सहकाऱ्यांसह या परिषदेला हजर राहिले होते. परंतु त्यांनीं परिषदेंत प्रतिनिधीच्या नात्यानें भाग घेतला नाहीं. नेताजींचें म्हणणें होतें कीं, आझाद हिंद सरकार हें अस्थायी सरकार आहे. तें जोंपर्यंत स्थायी झालेलें नाहीं तोंपर्यंत त्याचे प्रतिनिधी म्हणून जाण्याचा त्यांना अधिकार नाहीं. या परिषदेंत हिंदुस्थानसंबंधीं चर्चा झाली. सुभाषबाबूप्रमाणेंच इंग्रजांच्या कैदेंतून मंडाले तुरुंगांतून निसटलेले ब्रह्मदेशचे माजी मंत्री डॉ. बा. मा यांनीं व इतर प्रतिनिधींनींही पूर्व आशियांतील शांतता व स्वातंत्र्य रक्षण करण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान स्वतंत्र होणें आवश्यक आहे असें प्रतिपादन केलें.जपान सरकारतर्फे जनरल टोयो यांनीं अंदमान व निकोबार बेटें आझाद हिंद सरकारच्या ताब्यांत देण्यांत आलीं असल्याचें जाहीर केलें. ही घोषणा करतांना जनरल

टोयो म्हणाले, " आझाद हिंद सरकारचें अधिष्ठान आतां अधिक मजबूत होईल. अंदमान व निकोबार आझाद हिंद सरकारच्या स्वाधीन करून हिंदी स्वातंत्र्याविषयींची आमची सहानुभूति आम्ही प्रत्यक्ष रीतीनें व्यक्त करीत आहोंत. "

जपानच्या परराष्ट्रखात्याचे उपमंत्री मात्सुओ मोतो यांनीं लष्करी कोर्टापुढें दिलेल्या साक्षींतही आझाद हिंद सरकारला अनेक राष्ट्रांच्या सरकारांनीं मान्यता दिली होती असें निवेदन केलें. जर्मन सरकारला सुभाषबाबूंनीं मलायांत पाठविण्याची विनंति जपाननें केली होती कारण हिंदुस्थान स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नांत त्यांना मदत करण्याची जपानची इच्छा होती असेंही त्यांनीं सांगितलें. सुभाषबाबूच आझाद हिंद सरकारचे मुख्य प्रधान व आझाद फौजेचे सेनापती बनूं शकतील असा त्यांना विश्वास वाटत होता.

नेताजींनीं अंदमानचें नांव शहीदबेट आणि निकोबारचे नांव ' स्वराज्य द्वीप ' असें ठेवलें. कर्नल लोकनाथन् यांची तेथें चीफ कमिशनर म्हणून योजना केली. कर्नल लोकनाथन् तेथें पोचल्यावर दोन तीन आठवड्यांनीं तेथील आझाद हिंद संघाच्या कार्यालयांत एक समारंभ घडवून आणला व त्या समारंभांत सर्व कारभार त्यांच्या स्वाधीन करण्यांत आला. या समारंभाला तेथील जपानी अधिकारी, आरमारी दलाचे प्रमुख व सेनापतीही हजर होते. कारभार व्यवस्थित रीतीनें चालविण्यासाठीं कर्नल लोकनाथन् यांच्याबरोबर मेजर आलवी, ले. सुभानसिंग, लेफ्टनंट महमद इकबाल आणि स्टेनोटाईपिस्ट श्रीनिवासन् यांना बरोबर घेऊन गेले होते. मेजर आलवी यांच्याकडे शिक्षण, सुभानसिंग यांच्याकडे अर्थ व कर वसूली, ले. महमद इकबाल यांच्याकडे पोलिस आणि न्याय अशी खात्यांची वाटणी करण्यांत आली. दर महिन्याला नेताजींकडे नियमित अहवाल पाठविण्यांत येत असे. पोलिसखात्यांत जपानी अधिकारी अखेरपर्यंत हस्तक्षेप करीत राहिले व त्याबद्दल कर्नल लोकनाथन् यांचें त्यांच्याशीं अनेक वेळां झगडेही झाले. जपानी अधिकारी केवळ संशयावरून लोकांना पकडून त्यांचा छळ करीत असत. लोकनाथन् यांनीं या प्रकाराला तीव्र विरोध केला.

झियावाडी येथील ५० चौरस मैल क्षेत्रफळ असलेली इष्टेटही आझाद हिन्द सरकारच्या अंमलाखालीं होती. या छोट्याशा संस्थानांत १५ हजारांची हिन्दी

वस्ती होती. तेथें कारभार चालविण्यासाठीं अर्थ–खातें, भरती, ट्रेनिंग, प्रचार–प्रकाशन, आरोग्य वगैरे प्रत्येक विभागासाठीं एक एक अधिकारी नेमण्यांत आला. जे हिंदी लोक युद्ध सुरू झाल्यानंतर मालमत्ता सोडून हिंदुस्थानांत निघून गेले होते त्यांच्या मालमत्तेची व इष्टेटीची काळजी घेण्यांत येत होती. सुताच्या कांबळी, जूटची पोती करण्याचे कारखाने उघडण्यांत आले होते. एक मोठे मध्यवर्ती हॉस्पिटलही काढण्यांत आलें. चिनी कामाचेही कारखाने काढले. अशारीतीनें हस्तगत केलेल्या प्रदेशाची उत्कृष्ट व्यवस्था ठेवण्याचा प्रयत्न आझाद हिंद सरकार करीत होतें. त्यासाठीं एक खास 'आझाद हिंद दल' स्थापन करण्यांत आलें. या दलाचे प्रमुख लेफ्टनंट विठ्ठलराव हे होते. जनरल चटर्जी यांना झियावाडीचे गव्हर्नर म्हणून नेमण्यांत आलें. श्री. बी. घोष यांच्याकडे पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट, शेती आणि सॅनिटेशन हीं खातीं देण्यांत आलीं. छोटे छोटे खटले चालविण्यासाठीं तहशीलदार नेमण्यांत आले होते. त्यावर सर्व अधिकार आझाद हिंद सरकारचा असे. बर्मी अथवा जपानी सरकारला त्यांत ढवळाढवळ करतां येत नसे.

आपलें सरकार व आपलें स्थान यांचा दर्जा संभाळण्यासाठीं नेताजी नेहमीं जागृत असत. ता. २ जून १९४४ ला जपानी वकील रंगूनला राष्ट्रपतींना भेटण्याला आला. त्यानें भेटीची विनंति केली तेव्हां प्रथम आपलीं कागदपत्रें परराष्ट्र खात्याच्या वकिलाकडे द्या असें उत्तर सुभाषबाबूंनीं पाठविलें. कागदपत्रें टोकिओला राहिलीं आहेत असा उलट जबाब वकिलाकडून आला तेव्हां कागदपत्र दाखल करीपर्यंत मुलाखत मिळणार नाहीं असें त्याला कळविण्यांत आलें. ही हकीगत संपूर्ण खरी असल्याचें लालकिल्ल्यांतील खटल्यांत साक्ष देतांना जपानकडून आझाद हिंद सरकारकडे आलेले वकील तसेरो हाचिया यांनीं कबूल केलें. सुभाषबाबूंनीं कागदपत्राशिवाय मुलाखत देण्याचें नाकारलें तेव्हां त्यांनीं टोकिओला कागदपत्र पाठविण्याबद्दल तारेनें कळविलें. आझाद हिंद सरकार रंगूनहून बँकाकला हलविण्यांत आल्यानंतर हाचियाही बरोबर गेला होता व शेवटपर्यंत त्यानें आझाद हिंद सरकारकडे जपानी वकील म्हणून काम केलें. केवळ प्रत्यक्ष नेताजींनाच नव्हे तर नेताजींच्या फोटोलाही जपानी अधिकारी सलाम करीत असत.

एका डॉक्टरच्या इंग्रज पत्नीला जपान्यांनीं संशयावरून तुरुंगांत टाकलें. तिला सोडविण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. शेवटीं प्रकरण नेताजीकडे आलें. त्यांनीं जपानी अधिकाऱ्यांना लिहिलें, "ती दोषी असेल तर तिला गोळी घालून ठार मारतां येईल. पण अपराध शाबित करतां येत नसेल तर हिंदी नागरिक म्हणून तिची ताबडतोब सुटका झाली पाहिजे." नेताजींचा खलिता जातांच तिची ताबडतोब सुटका झाली. अशाच प्रकारें दुसऱ्या एका हिंदी डॉक्टरला सोडण्याचा हुकूम नेताजींनीं दिला. तो हुकुम पाहून जपानी पोलिस अधिकाऱ्यानें उद्गार काढले, "सम्राट् बोस यांना आमच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं !" प्रकरण वरच्या अधिकाऱ्याकडे गेलें तेव्हां त्यानें नेताजींची माफी मागितली व त्यांच्या हुकमाप्रमाणें डॉक्टरची सुटका केली. नेताजी शोनानला पोचले त्यावेळीं जपानी अधिकाऱ्यांनीं इतर सर्वांना सोडून फक्त ४०० हिंदी लोकांना कैदेंत ठेवलें होतें. त्यांच्यावर इंग्रजांचे हेर असल्याचा संशय होता. नेताजींनीं त्यांचा प्रश्न हातांत घेऊन सर्वांची सुटका करविली.

लेफ्टनंट कर्नल लोकनाथन् यांनीं आपल्या साक्षींत अंदमान व निकोबार बेटांत ते कमिशनर म्हणून काम करीत असतांना जपान्यांचा हस्तक्षेप थांबविण्याचे कसकसे प्रयत्न केले याची माहिती सांगितली आहे. आझाद हिंद सरकारचे प्रकाशन-मंत्री श्री. एस्. ए. अय्यर यांनींही आपलें सरकार हें जपानचें मित्र-सरकार होतें. स्वतंत्र व बरोबरीचें सरकार होतें हें सिद्ध करणाऱ्या अनेक घटनांचें वर्णन आपल्या साक्षींत केलें. हिंदुस्थानवर आक्रमण करण्याचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हां हिंदुस्थानवर चढाई करणाऱ्या फौजांचें नेतृत्व जपानी अधिकाऱ्यांकडे रहावें अशी जपान्यांची इच्छा होती. यासंबंधीं कडाक्याचे वाद झाले. नेताजींनीं स्पष्ट सांगितलें कीं, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य, सार्वभौमसत्ता व प्रतिष्ठा यांना ज्यामुळें बाध येईल अशा कोणत्याही गोष्टीला आपण संमति देणार नाहीं. हिंदुस्थानांत जाणाऱ्या फौजेचें सेनापतित्व कोणाही जपानी अधिकाऱ्याकडे देण्याला त्यांनीं स्पष्ट नकार दिला. तसेंच जपानी व हिंदुस्थानी सैनिकांना समान दर्जानें वागविण्यांत यावें असें मान्य करून घेतलें. आझाद सरकारच्या युद्ध सामुग्री, अन्नपुरवठा व सेनाविभागाच्या नेमणुका होण्यापूर्वी आपल्याला अगोदर सूचना देण्यांत आली पाहिजे असा

जपान्यांनीं आग्रह धरला पण सुभाषबाबूंनीं त्याला मान्यता दिली नाहीं. सुभाषबाबूंनीं आणखी जपान्यांना अशी ताकीद दिली कीं, हिंदुस्थानचा जो प्रदेश मुक्त केला जाईल त्या प्रदेशांत जपानी फर्म अथवा बँक काढण्याला परवानगी मिळणार नाहीं. अशा रीतीनें कोणत्याही बाबतींत जपान्यांना त्यांनीं वरचढ होऊं दिलें नाहीं.

जपानी परराष्ट्र विभागाचे उपमंत्री श्री. सबूरो ओहता यांनीं लाल किल्ल्यांतील खटल्यांत साक्ष देतांना जपाननें २१ आक्टोबर १९४३ ला आझाद हिंद सरकारला मान्यता दिली होती व जपानकडून आझाद हिंद सरकारला मित्रत्वाच्या व बरोबरीच्या नात्यानें वागविलें जात होतें असा निर्वाळा दिला. या अर्थाचें एक जाहीर निवेदनही जपानी सरकारनें २३ आक्टोबरला प्रसिद्ध केलें होतें. ब्रह्मदेशांतील जपानी फौजेचे सेनापती मेजर जनरल काटाकूरा यांनींही कोर्टापुढें असें सांगितलें कीं, हिंदुस्थानवर आक्रमण करण्याची सर्व तयारी झाली होती. हिंदुस्थानचा जो प्रदेश मुक्त केला जाईल तो आझाद हिंद सरकारच्याच स्वाधीन केला जाईल, त्यावर आझाद हिंद सरकारचाच अंमल राहील व लढाईंत जी युद्ध-सामुग्री हातीं लागेल तीही आझाद सरकारला देण्यांत येईल असें कबूल करण्यांत आलें होतें.

आझाद हिंद संघाच्या सभासदांची संख्या यावेळीं परमोच्च बिंदूला पोचली होती. शोनानमध्यें ५४ टक्के, जाहोरमध्यें ६६ आणि मलाक्कांत ६० टक्के हिंदुस्थानी त्याचे सभासद झाले होते. मलायांतील सभासदांची संख्या दोन लाखांवर गेली होती. पंधरा हजार स्वयंसेवक दिवस रात्र काम करीत. सीलोनमध्येंही संघाची शाखा ता. २ दिसेंबर १९४३ ला स्थापन झाली. लोकांमध्यें स्वतंत्र राष्ट्राच्या स्वतंत्र नागरिकांनीं अनुरूप अशी स्वाभिमानी प्रवृत्ति निर्माण करण्यासाठीं एक नवा कार्यक्रम आखण्यांत आला. सर्व शाखांना सूचना देण्यांत आली कीं, त्यांनीं हिंदुस्थानी लोकांना आपण स्वतंत्र राष्ट्राचे नागरिक आहोंत असें शिक्षण द्यावें. संघाच्या सर्व सभासदांना आझाद हिंद सरकारशीं एकनिष्ठ रहाण्याच्या प्रतिज्ञापत्रकावर सही करावी लागे. त्यासाठीं संघाचे सभासदत्वाचे जुने फॉर्म नष्ट करून ही प्रतिज्ञाच छापून काढण्यांत आली. २५ आक्टोबर १९४३ ला भाषण करतांना नेताजींनीं सांगितलें

"जो संघाचा सभासद नाहीं त्याला आम्ही आमचा सहकारी अथवा हिंदुस्थानी-सुद्धां मानीत नाहीं. अशा लोकांना हिंदुस्थानमध्यें बिलकुल स्थान नाहीं."

पुष्कळ प्रयत्न करूनसुद्धां फौजेची एकंदर भरती चाळीस हजारापेक्षां अधिक होऊं शकली नाहीं. भरतीसाठीं कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करण्यांत येत नसे. लोक स्वेच्छेनें आझाद फौजेंत दाखल होत. अनेकांना जागा मिळत नसे व त्यांचे अर्ज परत करावे लागत. युद्ध–सामुग्रीचा अभाव ही सर्वांत मोठी अडचण होती. दूर दूर वरून येणाऱ्या लोकांनाही फौजेंत भरती करून घेतां येत नसे. ब्रम्हदेशापेक्षां मलायांत अधिक जोरानें भरती होत होती. पुरेशी युद्ध-सामुग्री नव्हती तरीही सर्व नागरिकांना लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. मलाया, ब्रम्हदेश, थायलंड वगैरे अनेक देशांतून स्त्री–पुरुष हें शिक्षण घेण्यासाठीं उत्साहानें येत. सर्वांना शस्त्रास्त्रें वापरण्याचें ज्ञान मिळालें पाहिजे हा हेतू होता. त्यासाठीं मलायांत चार, ब्रम्हदेशांत चार आणि थायलंडमध्यें एक असे ट्रेनिंग कँप उघडण्यांत आले. रंगून आणि शोनान येथें अधिकाऱ्यांना शिक्षण देण्याचे वेगळे खास कँप होते. सर्व अधिकारी त्यागवृत्तीनें काम करीत. कर्नलचा पगार फक्त २५० रु. होता आणि मेजरचा १८५ रु. होता. अशा रीतीनें जेवढा पैसा राखला जाई तो सर्व आझाद हिंद संघाला देण्यांत येत असे. फौजेच्या करमणुकीसाठीं 'चलो दिल्ली' 'भारत पुत्र' आणि 'जालियनवाला बाग' या नांवाचीं नाटकें बसविण्यांत आलीं होतीं. कांहीं फिल्मसुद्धां काढण्यांत आल्या होत्या.

टोकियो येथून ता. २३ आक्टोबर १९४३ ला काढलेल्या एका पत्रकांत नेताजी म्हणतात, "–क्रांतिकारी सैन्य व क्रांतिकारक आझाद हिंद सरकार यांच्या स्थापनेनें माझ्या जीविताचीं दोन महान् स्वप्नें पूर्ण झालीं आहेत. आतां तिसरें एकच स्वप्न राहिलें आहे. हें स्वप्न आहे देशाच्या स्वातंत्र्याच्या लढाईचें व स्वातंत्र्यप्राप्तीचें. युद्धाच्या भाषेचा उपयोग आम्ही केवळ प्रचारासाठीं करीत नाहीं. आमच्या कार्यानें आम्ही आमचे मनोरथ पूर्ण करून दाखवूं!"

नेताजींच्या जीवनांतील या तिसऱ्या महान् स्वप्नाच्या पूर्ततेसाठीं जें प्रदान झालें त्याची कहाणी पुढें दिली आहे.

७

# चलो दिल्ली

" हिंदुस्थान आणि हिंदुस्थानच्या चाळीस कोटी जनतेला स्वतंत्र करण्यासाठीं, मी सुभाषचंद्र बोस, अखेरचा श्वास असेपर्यंत हें पवित्र स्वातंत्र्य-युद्ध लढविण्याची प्रतिज्ञा परमेश्वराला स्मरून करीत आहे. मी अशीही प्रतिज्ञा करतो कीं, मी आपल्याला नेहमींचा हिंदुस्थानचा सेवक मानीन. आपल्या देशांतील चाळीस कोटी बंधुभगिनींचें कल्याण करणें हेंच माझ्या जीवनाचें परम पवित्र कर्तव्य व व्रत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्याचें संरक्षण करण्यासाठीं, सर्वस्वाचा त्याग करण्यासाठीं मी सदैव तत्पर राहीन. स्वतंत्र हिंदुस्थानच्या भावनेला स्वतंत्र हिंदुस्थानी सरकारचें मूर्त रूप देतांना ' चलो दिल्ली ' ची घोषणा ही पवित्र प्रतिज्ञा सुभाषबाबूंनीं घेतली होती. आझाद हिंद संघातर्फे ता. २१ आक्टोबर १९४३ ला १०॥ वा. दाईतोआ गेकीमध्यें एक ऐतिहासिक महत्वाचें संमेलन भरलें होतें. त्या संमेलनाला पूर्व-आशियाच्या कोना-कोपऱ्यांतून प्रतिनिधी आले होते. या संमेलनांत आझाद हिन्द सरकारची घोषणा करण्यांत आली. त्या प्रसंगीं नेताजींनीं ही प्रतिज्ञा घेऊन स्वतंत्र हिन्दुस्थानशीं एकनिष्ठ रहाण्याची घोषणा केली होती. हें दृश्य अतिशय गंभीर व प्रभावी होतें. दीड तासपर्यंत नेताजींचें भाषण लाखो लोक मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. प्रतिज्ञा घेतांना नेताजींचा कंठ सद्गदित झाला होता. क्षणभर असें वाटलें कीं, नेताजींना भावनावेग आवरतां येणार नाहीं. सर्वत्र निःशब्द शांतता पसरली. पण नेताजींनीं गंभीर निश्चयी वाणीनें उर्वरित प्रतिज्ञा वाचली. सर्वत्र शांतता पसरलेली असतांही असा भास होत होता कीं, जणूं जमलेले सर्व लक्षावधी लोक नेताजींबरोबर या प्रतिज्ञेचा उच्चार करीत होते. आझाद हिंद सरकारच्या इतर मंत्र्यांनींही नेताजींप्रमाणें एकामागून एक प्रतिज्ञा घेतली.

नेताजींचें तेजस्वी भाषण, 'जय हिंद' राष्ट्रीय गीत होऊन हा भव्य, ऐतिहासिक समारंभ समाप्त झाला. मधूनमधून 'सुभाषबाबू की जय' 'आझाद सरकार की जय' 'आझाद हिंद की जय' 'इन्किलाब झिन्दाबाद'च्या गर्जनांनीं आकाश दुमदुमत होतें.

प्रतिज्ञा घेतल्यानंतर आझाद हिंद सरकारतर्फे पुढील जाहीरनामा वाचण्यांत आला—

"१७५७ मध्यें हिंदी जनतेचा बंगालमध्यें इंग्रजांकडून पहिला पराभव झाल्यापासून सतत शंभर वर्षें स्वातंत्र्यासाठीं ती उग्र लढा देत राहिली. त्या दिवसांचा इतिहास भारतीयांच्या अपूर्व वीरतेचा व स्वार्थत्यागाचा इतिहास आहे. हीं इतिहासाचीं पानें बंगालचे सिराजउद्दौला आणि मोहनराज, दक्षिण भारतचे हैदरअली, टिपु सुलतान आणि वेलू थेम्पी, महाराष्ट्रांत अप्पासाहेब भोसले आणि पेशवे बाजीराव, अवधच्या बेगमा, व पंजाबचे सरदार शामसिंह अटारीवाले आणि त्यांच्याबरोबर झांशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, डुमरावचे महाराजा कुंवरसिंह आणि नानासाहेब इत्यादि योध्यानीं आपल्या अमर कृतींच्या स्वर्णाक्षरांनीं लिहिलीं आहेत. इंग्रजांपासून सर्व हिंदुस्थानला संकट आहे हें ओळखून त्यांच्याशीं संघटित सामना देण्याचा प्रयत्न आमच्या पूर्वजांना यापूर्वींच करतां आला नाहीं ही आमच्या दुर्दैवाची गोष्ट आहे. पण अखेर जेव्हां हिंदी जनतेला वस्तुस्थितीचें ज्ञान झालें तेव्हां एकजुटीनें पुढें होऊन १८५७ सालीं बहादुरशहाच्या नेतृत्वाखालीं स्वातंत्र्याची अंतिम लढाई हिंदी जनतेनें दिली. या युद्धांत प्रारंभीं अनेक जागीं हिंदी जनतेला यश आलें. दुर्भाग्य आणि सदोष नेतृत्व यामुळें अखेर जनतेचा पूर्ण पराजय झाला व संपूर्ण गुलामी देशावर लादली गेली. तरीहि झांशीची राणी, तात्या टोपे, कुंवरसिंह आणि नानासाहेब यांच्या पराक्रमाची कीर्ति भारतीय इतिहासांत अमर आहे. त्यांची स्मृति आमच्या हृदयांत त्याग आणि वीरतेची भावना निर्माण करीत आहे.

"१८५७ नंतर इंग्रजांनीं लोकांना जबरदस्तीनें निःशस्त्र करून असे घोर पाशवी अत्याचार केले कीं, त्यामुळें कांहीं काळपर्यंत जनता दडपली गेली. परंतु

१८८५ मध्यें राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म होतांच पुन्हा एक नवी जागृति निर्माण झाली. १८८५ पासून पहिल्या महायुद्धाच्या अखेरपर्यंत हिंदी जनतेनें स्वातंत्र्य –संपादनासाठीं सर्व प्रकारचे प्रयत्न केले प्रचार केला, इंग्रजी मालावर बहिष्कार घातला, दहशतवादाचा अंगिकार करून सशस्त्र क्रांति करण्याचाही यत्न केला. कांहीं काळपर्यंत हे सर्व प्रयत्न निष्फळच राहिले. शेवटीं १९२०मध्यें या वैफल्यानें निराश होऊन नवीन उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत असतांच महात्मा गांधींनीं असहकार आणि सविनय कायदेभंग हीं नवीं शस्त्रें देशाला दिलीं.

" त्यानंतर वीस वर्षेंपर्यंत उत्कट देशभक्तीनें प्रेरित होऊन हिंदी लोक कार्य करीत राहिले. स्वातंत्र्याचा संदेश हिंदुस्थानांत घरोघर जाऊन पोचला. स्वतःच्या अनुभवानें जनता स्वातंत्र्यासाठीं कष्ट करायला, त्याग करायला व प्राणाचेंही बलिदान करण्याला शिकली. मोठमोठ्या शहरापासून दूरदूरच्या खेड्यांपर्यंत सर्व जनता एका राजकीय संघटनेंत गोंवली गेली. अशा प्रकारें हिंदी लोकांनीं केवळ राजकीय चैतन्यच निर्माण केलें असें नव्हे तर आपलें राजकीय जीवनच संघटित केलें. आतां जनता एक आवाजानें बोलूं लागली व आपल्या सर्वसामान्य ध्येयाच्या प्राप्तीसाठीं संघटित प्रयत्न करूं लागली. १९३७ पासून १९३९ पर्यंत आठ प्रांतांत काँग्रेस मंत्रिमंडळें अस्तित्वांत आलीं व त्यांनीं हें दाखवून दिलें कीं, हिंदी लोक आपलें राज्य चालवूं शकतात.

" अशा रीतीनें या युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वींच हिंदुस्थानांत स्वातंत्र्याच्या अंतिम लढाईसाठीं भूमिका तयार होत होती. या युद्धांत जर्मनीनें आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्यानें युरोपांत आपल्या शत्रूवर प्राणघातक हल्ले केले आहेत. इकडे पूर्व आशियांत जपाननें आपल्या मित्र–राष्ट्रांच्या सहाय्यानें आमच्या शत्रूवर भीषण आघात केले आहेत. अशी अनुकूल परिस्थिति निर्माण झाल्यामुळें हिंदी लोकांना आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची अद्भुत संधि लाभली आहे.

" आधुनिक इतिहासांत प्रथमच निर्वासित भारतीय'मध्येंही राजकीय जागृति झाली असून त्यांचीही राजकीय संघटना अस्तित्वांत आली आहे. ते आपल्या हिंदुस्थानांतील बांधवांच्या हृदयांतील भावना आणि विचारांना तर सांथ देतच

आहेत पण त्यांच्या पावलावर पाऊल टाकून स्वातंत्र्य-पथावर प्रत्यक्ष मार्ग-क्रमणही करीत आहेत. विशेषतः पूर्व आशियांतील वीस लक्ष हिंदुस्थानीयांनीं आपली प्रचंड व प्रभावी संघटना बनविली असून त्यांनीं लष्करी जीवनाचा अंगिकार केला आहे, ते सर्व सैनिक बनले आहेत. त्यांच्यासमोर आझाद हिंद फौज खडी आहे आणि या फौजेची गगनभेदी गर्जना सर्वत्र निनादत आहे " आगे बढो—दिल्ली चलो."

" ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं आपल्या धोरणानें हिंदुस्थानीयांना निराश केलें आहे. त्यांनीं हिंदी लोकांची लूट करून त्यांना उपासमारींत ढकलून दिलें आहे. भारतवासीयांचा विश्वास व सद्भावना इंग्रज पूर्णतया गमावून बसले आहेत. इतकेंच नव्हे तर आज त्यांचें साम्राज्यही कोलमडूं लागलें आहे. या साम्राज्याला नष्ट करण्यासाठीं आतां केवळ एक ठिणगी पेटण्याचा अवकाश आहे. या ठिण-गीला पेटविणें हें आझाद हिंद फौजेचें काम आहे. या फौजेला भारतीय नागरिक जनता आणि ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालीं असलेल्या हिंदी फौजेच्या सैनिकां-कडून उत्साहपूर्ण सहकार्याचें आश्वासन मिळालें आहे. त्यांना आपल्या अजिंक्य अशा विदेशीय मित्रांचा पाठिंबा आहे. आणि यापेक्षांही महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा आपल्या स्वतःच्या सामर्थ्यावर पूर्ण विश्वास आहे. म्हणून त्यांना पूर्ण विश्वास वाटतो कीं, आपलें ऐतिहासिक कार्य ते बरोबर पार पाडूं शकतील.

" आतां स्वातंत्र्याचा उषःकाल जवळ आला असल्यामुळें हिन्दुस्थानीयांनीं आपलें स्वतःचें स्वतंत्र अस्थायी सरकार बनवून त्याच्या नेतृत्वाखालींच अखे-रचा स्वातंत्र्य–संग्राम करावा हें उचित होईल. देशांतील सर्व पुढारी तुरुंगांत डांबले गेले आहेत आणि सर्व जनता निःशस्त्र केली गेली आहे म्हणून देशामध्येंच असें सरकार स्थापून तेथून सशस्त्र युद्ध सुरू करणें शक्य नाहीं. म्हणून पूर्व–आशियांतील आझाद हिन्द संघाचें हें कर्तव्य आहे कीं, अस्थायी आझाद हिन्द सरकार निर्माण करण्याचें कार्य त्यानें आपल्या हातीं घ्यावें. व संघानेंच स्थापन केलेल्या आझाद हिन्द फौजेच्या मदतीनें स्वातंत्र्य–संग्रामाचें रणशिंग फुंकावें.

" पूर्व आशियांतील आझाद हिन्द संघातर्फे आझाद हिन्दुस्थानच्या अस्थायी सरकारची स्थापना करून आज आम्ही आमचें एक कर्तव्य पार पाडलें आहे.

आमची जबाबदारी ओळखून आपलें कर्तव्य पार पाडण्यासाठीं आम्ही पुढें पाऊल टाकलें आहे. मातृभूमीच्या या मुक्ति–संग्रामांत प्रवेश करतांना आम्ही परमपिता परमेश्वराचा आशीर्वाद मागतों आहोंत व आमचें आमच्या सहकारी सैनिकांचें जीवन मातृभूमीच्या हितासाठीं व उन्नतीसाठीं बलिवेदीवर अर्पण करीत आहोंत.

" अस्थायी सरकार हिंदुस्थानांतून इंग्रजांना व त्यांच्या मित्रांना हाकलून देण्यासाठीं लढाई करील. त्यानंतर स्वतंत्र हिंदुस्थानांत सर्व जनतेच्या सहाय्यानें राष्ट्रीय सरकारची स्थापना करणें हें त्याचें काम राहील. इंग्रज व त्यांच्या मित्रांना हाकून देऊन स्थायी राष्ट्रीय सरकारची स्थापना होईपर्यंत जनतेच्या हितरक्षणासाठीं हें अस्थायी सरकार राज्यकारभार चालवील.

" सर्व हिंदुस्थानीयांनीं या सरकारशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे असा या सरकारचा दावा आहे. सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य, समान अधिकार आणि समान संधी देण्यांत येईल, असें अस्थायी सरकार जाहीर करतें. त्याचबरोबर अस्थायी सरकार असेंही आश्वासन देतें कीं, हें सरकार सर्व देश व देशाच्या प्रत्येक भागाच्या सुख–समृद्धीसाठीं प्रयत्न करील. देशांतील सर्व लोकांना समान दर्जानें वागविलें जाईल. विदेशी सरकारनें आपल्या डावपेचानें जे कृत्रिम मतभेद निर्माण केले होते ते सर्वथा दूर करण्यांत येतील.

"आज आम्ही परमेश्वराला, व ज्यांनीं आम्हांला एक राष्ट्राचें स्वरूप दिलें त्या पूर्वजांना, तसेंच ज्यांनीं भारतीय शौर्याची व बलिदानाची परंपरा अखंड राखली त्या हुतात्म्यांनाही साक्ष ठेवून आमच्या देशवासीयांना आवाहन करतो कीं, त्यांनीं या निशाणाखालीं एक होऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याला सज्ज व्हावें. ब्रिटिश सरकार व त्यांचे साथीदार यांच्याविरुद्ध अंतिम संग्राम सुरू करण्याला, प्राण पणाला लावून अंतिम विजयावर विश्वास देऊन अखेरपर्यंत लढण्याला हें आव्हान आहे. जोंपर्यंत आम्ही ब्रिटिश सरकारला आमच्या देशाच्या बाहेर हाकलून देऊन देश पुन्हां पूर्ण स्वतंत्र केलेला नाहीं तोपर्यंत ही लढाई आम्ही चालू ठेऊं.

स्वतंत्र हिंदुस्थानच्या अस्थायी सरकारतर्फे या जाहीरनाम्यावर पुढील सह्या करण्यांत आल्या होत्या—

सुभाषचंद्र बोस ( मुख्य प्रधान, युद्ध आणि परराष्ट्रखात्याचे मंत्री ); कॅप्टन कुमारी लक्ष्मी ( महिला संघटन विभाग ); एस्. ए. अय्यर ( प्रकाशन आणि प्रचार खातें ); ले. क. ए. सी. चॅटर्जी ( अर्थ विभाग ); ले. क. अजीज अहमद, ले. क. एल. एस्. भगत, ले. क. जे. जे. भोसले, ले. क. गुलजारसिंह, ले. क. एम्. झेड. कियानी, ले. क. ए. डी. लोकनाथन्, ले. क. एहसान कदीर, ले. क. शाहनवाज, ( सैन्याचे प्रतिनिधी ) ए. एम्. सहाय ( सेक्रेटरी-मंत्री ) राशबिहारी घोष ( प्रमुख सल्लागार ) करीम ज्ञानी, देवनाथ दास, डी. एम्. खान, ए. यल्लाप्पा, जे. थीवी, सरदार ईश्वरसिंह ( सल्लागार ) ए. एन्. सरकार ( कायद्याचे सल्लागार ) या सर्वांनीं वर दिलेली शपथ घेतली होती.

या आझाद हिंद सरकारनें जी आझाद हिंद फौज उभारली तींत केवळ युद्धबंदी सैनिकांनाच नव्हे तर नागरिकांनाही प्रवेश मिळत असे. स्त्रिया व मुलांनाही या फौजेंत भरती होतां येई. फौजेंतील सैनिकांची संख्या लवकरच चाळीस हजारांवर पोंचली. शस्त्रास्त्रांच्या उणीवेमुळें अधिक सैनिक भरती करून घेतां येत नव्हते. एकंदर सैन्यांपैकीं अर्धें युद्धबंदी होतें व अर्धें नागरिकांतून भरती झालेलें होतें. सैन्याच्या संघटनेचे मुख्य विभाग सहा होते—

(१) सदर मुक्काम–मुख्य केंद्र

(२) हिंदुस्थानी फील्ड ग्रुप

(३) ‘ शेर दिल ’ गनीमी सैनिक विभाग

(४) विशेष सैनिक विभाग

(५) गुप्त हेर विभाग

(६) राखीव विभाग

हिंदुस्थानी फील्ड ग्रूपमध्यें पायदळ पलटण नं. १, २ व ३, नं. १ मोठा तोफखाना पलटण, नं. १ इंजिनिअरिंग कंपनी, नं १ सिग्नल कंपनी, नं. १ मेडिकल कंपनी, आणि नं. १ ट्रान्सपोर्ट पलटण यांचा समावेश करण्यांत आला होता. शेरदिल गनिमी विभागांत गांधी गनिमी पलटण, नेहरू गनिमी पलटण, आझाद गनिमी पलटण या पलटणी होत्या. नेताजी ब्रह्मदेशांत आल्यानंतर

दोन तीन महिन्यांच्या अवधींत ' सुभाष गनिमी पलटण ' नांवाची एक नवी पलटण उभारण्यांत आली. महिलांच्या पलटणीचें नांव ' झांशीची राणी पलटण ' असें ठेवण्यांत आलें. या सर्व पलटणीची एक डिव्हिजन बनविण्यांत आली. नंतर अशीच दुसरी व तिसरी डिव्हिजनही बनविण्यांत आली. नं. २ डिव्हिजनमध्यें युद्धबंदी सैनिक व नागरिक दोघांचाही अंतर्भाव करण्यांत आला होता व नं. ३ डिव्हिजनमध्यें सर्व नागरीक होते. या नागरिकांपैकीं बहुतेक मलायांतील आझाद हिन्द संघातर्फे भरती झाले होते. मलायांतून वीस हजारांवर अधिक सैनिक मिळाले होते व एक हजार महिला सैनिक मिळविण्याचा निश्चय मलायावासियांनीं केला होता. शोनान, थायलंड आणि ब्रम्हदेशांत महिला सैनिकांच्या शिक्षणासाठीं तीन शिबिरें उघडण्यांत आलीं होतीं. नेताजींच्या आदेशानुसार ८ पासून १२ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठीं ' बालक सेना'ही संघटित करण्यांत आली. ' बालक सेनेंत एक ' जां-बाज विभाग ' ही होता. त्यांत सर्व ' मृत्यूशीं करार ' करणारीं मुलें होतीं. हीं मुलें पोटाला सुरुंग बांधून शत्रूच्या रस्त्यांत आडवे पडत व शत्रूच्या टँक्सखालीं ते चिरडले गेले कीं, सुरुंगाचा स्फोट होऊन टँक्सचा धुव्वा उडे–आणि त्याबरोबर त्यांचाही. पण अशा रीतीनें टँक्सखालीं स्वतःचे तुकडे तुकडे करून घेण्याला तयार असलेलीं मुलें नेताजींच्या स्फूर्तीनेंच पुढें आलीं. नेताजींनीं त्यांना एक नवें धैर्य व नवें तेज दिलें होतें. या नव्या चैतन्याच्या प्रभावानेंच असें अपूर्व साहस करण्याची त्यांची तयारी झाली. या मुलांच्या आई-वडिलांचेंही केवढें अढळ धैर्य...

आझाद हिन्द फौजेच्या अधिकाऱ्यांनीं ब्रम्ही लोकांनाही लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था केली. जपानी ब्रम्ही लोकांची या बाबतींत उपेक्षाच करीत. आझाद हिन्द फौजेनें त्यांना आपलेसें केलें.

ता. २ डिसेंबर १९४३ ला आझाद हिंद फौजेची पहिली तुकडी सिंगापूरहून रंगूनला येण्यास निघाली. २१ जानेवारीला हिंदुस्थानवर आक्रमण करण्याची सर्व योजना सिद्ध झाली होती व ४ फेब्रुवारी १९४४ हा दिवस आघाडीवर कूच करण्यासाठीं ठरविण्यांत आला. मेमो हास्पिटलमध्यें जखमी सैनिकांच्या उपचाराची व्यवस्था करण्यांत आली. ' झांशीच्या राणी ' पलटणीच्या सैनिकांची या

सुभाषचंद्र बोस ( मुख्य प्रधान, युद्ध आणि परराष्ट्रखात्याचे मंत्री ); कॅप्टन कुमारी लक्ष्मी ( महिला संघटन विभाग ); एस्. ए. अय्यर ( प्रकाशन आणि प्रचार खातें ); ले. क. ए. सी. चॅटर्जी ( अर्थ विभाग ); ले. क. अजीज अहमद, ले. क. एल्. एस्. भगत, ले. क. जे. जे. भोसले, ले. क. गुलजारसिंह, ले. क. एम्. झेड. कियानी, ले. क. ए. डी. लोकनाथन्, ले. क. एहसान कदीर, ले. क. शाहनवाज, ( सैन्याचे प्रतिनिधी ) ए. एम्. सहाय ( सेक्रेटरी-मंत्री ) राशबिहारी घोष ( प्रमुख सल्लागार ) करीम ज्ञानी, देवनाथ दास, डी. एम्. खान, ए. यल्लाप्पा, जे. थीवी, सरदार ईश्वरसिंह ( सल्लागार ) ए. एन्. सरकार ( कायद्याचे सल्लागार ) या सर्वांनीं वर दिलेली शपथ घेतली होती.

या आझाद हिंद सरकारनें जी आझाद हिंद फौज उभारली तींत केवळ युद्धबंदी सैनिकांनाच नव्हे तर नागरिकांनाही प्रवेश मिळत असे. स्त्रिया व मुलांनाही या फौजेंत भरती होतां येई. फौजेंतील सैनिकांची संख्या लवकरच चाळीस हजारांवर पोंचली. शस्त्रास्त्रांच्या उणीवेमुळें अधिक सैनिक भरती करून घेतां येत नव्हते. एकंदर सैन्यांपैकीं अर्धे युद्धबंदी होतें व अर्धे नागरिकांतून भरती झालेलें होतें. सैन्याच्या संघटनेचे मुख्य विभाग सहा होते—

(१) सदर मुक्काम–मुख्य केंद्र

(२) हिंदुस्थानी फील्ड ग्रुप

(३) ' शेर दिल ' गनीमी सैनिक विभाग

(४) विशेष सैनिक विभाग

(५) गुप्त हेर विभाग

(६) राखीव विभाग

हिंदुस्थानी फील्ड ग्रूपमध्यें पायदळ पलटण नं. १, २ व ३, नं. १ मोठा तोफखाना पलटण, नं. १ इंजिनिअरिंग कंपनी, नं १ सिग्नल कंपनी, नं. १ मेडिकल कंपनी, आणि नं. १ ट्रान्सपोर्ट पलटण यांचा समावेश करण्यांत आला होता. शेरदिल गनिमी विभागांत गांधी गनिमी पलटण, नेहरू गनिमी पलटण, आझाद गनिमी पलटण या पलटणी होत्या. नेताजी शोनानला आल्यानंतर

दोन तीन महिन्यांच्या अवधींत ‘ सुभाष गनिमी पलटण ’ नांवाची एक नवी पलटण उभारण्यांत आली. महिलांच्या पलटणीचें नांव ‘ झांशीची राणी पलटण ’ असें ठेवण्यांत आलें. या सर्व पलटणीची एक डिव्हिजन बनविण्यांत आली. नंतर अशीच दुसरी व तिसरी डिव्हिजनही बनविण्यांत आली. नं. २ डिव्हिजनमध्यें युद्धबंदी सैनिक व नागरिक दोघांचाही अंतर्भाव करण्यांत आला होता व नं. ३ डिव्हिजनमध्यें सर्व नागरीक होते. या नागरिकांपैकीं बहुतेक मलायांतील आझाद हिन्द संघातर्फे भरती झाले होते. मलायांतून वीस हजारांवर अधिक सैनिक मिळाले होते व एक हजार महिला सैनिक मिळविण्याचा निश्चय मलायावासियांनीं केला होता. शोनान, थायलंड आणि ब्रम्हदेशांत महिला सैनिकांच्या शिक्षणासाठीं तीन शिबिरें उघडण्यांत आलीं होतीं. नेताजींच्या आदेशानुसार ८ पासून १२ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठीं ‘ बालक सेना’ही संघटित करण्यांत आली. ‘ बालक सेनेंत एक ‘ जां-बाज विभाग ’ ही होता. त्यांत सर्व ‘ मृत्यूशीं करार ’ करणारीं मुलें होतीं. हीं मुलें पोटाला सुरुंग बांधून शत्रूच्या रस्त्यांत आडवे पडत व शत्रूच्या टँक्सखालीं ते चिरडले गेले कीं, सुरुंगाचा स्फोट होऊन टँक्सचा धुव्वा उडे–आणि त्याबरोबर त्यांचाही. पण अशा रीतीनें टँक्सखालीं स्वतःचे तुकडे तुकडे करून घेण्याला तयार असलेलीं मुलें नेताजींच्या स्फूर्तीनेंच पुढें आलीं. नेताजींनीं त्यांना एक नवें धैर्य व नवें तेज दिलें होतें. या नव्या चैतन्याच्या प्रभावानेंच असें अपूर्व साहस करण्याची त्यांची तयारी झाली. या मुलांच्या आई-वडिलांचेंही केवढें अढळ धैर्य...

आझाद हिन्द फौजेच्या अधिकाऱ्यांनीं ब्रम्ही लोकांनाही लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था केली. जपानी ब्रम्ही लोकांची या बाबतींत उपेक्षाच करीत. आझाद हिन्द फौजेनें त्यांना आपलेसें केलें.

ता. २ डिसेंबर १९४३ ला आझाद हिंद फौजेची पहिली तुकडी सिंगापूरहून रंगूनला येण्यास निघाली. २१ जानेवारीला हिंदुस्थानवर आक्रमण करण्याची सर्व योजना सिद्ध झाली होती व ४ फेब्रुवारी १९४४ हा दिवस आघाडीवर कूच करण्यासाठीं ठरविण्यांत आला. मेमो हास्पिटलमध्यें जखमी सैनिकांच्या उपचाराची व्यवस्था करण्यांत आली. ‘ झांशीच्या राणी ’ पलटणीच्या सैनिकांची या

कामावर नेमणूक झाली. जरी या महिला–सैनिकांना हें शुश्रूषेचेंच काम देण्यांत आलें तरी ही पलटण उभारण्याचा उद्देश मात्र तो नव्हता. उलट या महिलां-समोर ५७ च्या बंडांत हातांत तलवार घेऊन अग्निदिव्य करणाऱ्या राणी लक्ष्मी-बाईचा तेजस्वी आदर्श ठेवण्यांत आला होता. शुश्रूषेचें काम व्यवस्थित होऊं लागल्यानंतर १५ मार्च १९४४ ला महिला सैनिकांची एक सभा भरविण्यांत आली. ही सभा भरविण्याचें कारण महिला सैनिकांना केवळ शुश्रूषेचें काम करण्यांत समाधान वाटत नव्हतें व आपल्यालाही आघाडीवर पाठवून प्रत्यक्ष लढाई करण्याची संधि मिळावी अशी त्यांची इच्छा होती. या सभेंत महिलांनीं नेताजींकडे ही मागणी सादर करण्यासाठीं एक विनंति-पत्र तयार केलें. स्वातंत्र्यासाठीं प्राणाचेंही बलिदान करण्याचा आपला कृतनिश्चय आहे याची नेताजींना खात्री पटावी म्हणून या विनंति-पत्रावर त्यांनीं आपल्या रक्तानें सह्या केल्या. या विनंती–पत्रांत त्यांनीं नेताजींना नम्रभावानें पण स्पष्टपणानें कळविलें होतें कीं, एकदां आम्हांला संपूर्ण सैनिक-शिक्षण देण्यांत आल्यानंतर केवळ शुश्रूषापथकाचें काम आमच्यावर सोपविण्यांत यावें हें योग्य नव्हे. शोनानमध्यें २२ आक्टोबर १९४३ ला झाशीच्या राणीचा जन्मदिवस महिला–सैनिकांचें शिक्षण–शिबिर उघडून साजरा करण्यांत आला होता. त्याप्रसंगीं भाषण करतांना नेताजींनीं महिला सैनिकांनाही युद्धाच्या आघाडीवर जाण्याची संधि देण्यांत येईल असें आश्वासन दिलें होतें. या आश्वासनाची नेताजींना त्यांनीं आठवण करून दिली व आपल्याला ताबडतोब आघाडीवर पाठविण्यांत यावें अशी मागणी केली होती. अखेर महिला पलटणीचा विजय झाला. २२ मार्चला या विनंती–पत्राचा स्वीकार करून महिला–पथकाला आघाडीवर जाण्याचा आदेश मिळाला. ‘ चलो दिल्ली’च्या प्रचंड जयघोषांत या शूर पलटणीनें आघाडीकडे कूच करण्यास सुरवात केली.

यावेळीं ब्रम्हदेशांत एकंदर वीस हजार आझाद सैनिक होते. २२ मार्चपर्यंत त्यापैकीं फक्त दहा हजार आघाडीवर पाठविण्यात आले. या दहा हजारांपैकीं पांच-हजार अगदीं प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर पोचले होते व त्यांचीही अनेक तुकड्यांतून विभागणी करण्यांत आली होती. तामू, कोहिमा, पलेल आणि टिंडीम इत्यादि बारा जागांवर मिळून हे पांचहजार वाटले गेले होते. रंगूनहून आघाडीवर

पोचलेले हे दहा किंवा पांचहजार सैनिक सोडून शिवाय सिंगापूर आणि ब्रह्मदेशांतूनही कांहीं तुकड्या सरळ आघाडीवर गेल्या होत्या. हिंदुस्थानांतूनही कांहीं सैनिक येऊन मिळत होते. त्यामुळें आघाडीवर लढणाऱ्या आझाद हिंद सैनिकांची एकंदर संख्या दहापांच हजारापेक्षां पुष्कळच अधिक होती. खरोखर आवश्यकता एकच होती. या सर्व सैनिकांना निरनिराळ्या बारा जागीं न पाठवितां एकच आघाडीवर ठेवायला पाहिजे होतें.

आघाडीवर प्रत्यक्ष लढलेल्या पलटणींची संख्या सहा होती. या सहा पलटणीपैकीं चार पलटणींना हिंदी पुढाऱ्यांचीं नांवें दिलेलीं होतीं. पहिली गांधी–ब्रिगेड. हिचे कमांडर कर्नल इनायत कयानी हे होते. या पलटणींत २८०० सैनिक होते. दुसरी आझाद–ब्रिगेड. हिचे कमांडर कर्नल जलमारासिंग हे होते. याही पलटणींत २८०० सैनिक होते. तिसऱ्या ब्रिगेडचें नांव नेहरू ब्रिगेड असून हिचें नेतृत्व लाल किल्ल्यांतील लष्करी खटल्यानें ख्यातनाम झालेले कर्नल गुरुबक्षसिंग ढिलों यांच्याकडे होतें. नेहरू ब्रिगेडमधील सैनिकांची संख्या तीन हजार होती. लाल किल्ल्यांतील खटल्यांत नांवाजलेले दुसरे सेनानी कर्नल शहानवाज खां यांच्याकडे सुप्रसिद्ध 'सुभाष-ब्रिगेड'चें नेतृत्व होतें. या ब्रिगेडमध्यें दोन हजार सैनिक होते.

या चार ब्रिगेड शिवाय 'राणी झांशी रेजिमेंट' आणि 'जांबाज बाल सेना' या दोन खास पलटणी होत्या. राणी झांशी रेजिमेंटच्या कमांडर डॉ. लक्ष्मी या होत्या व रेजिमेंटमधील महिला सैनिकांची संख्या दोन हजार होती. बालसेनेंत ८ ते १२ वर्षांच्या वयाचीं मुलें होतीं. झांशीच्या राणी रेजिमेंटमधील महिला सैनिक जंगल-पहाडांतून कूच करूं लागत तेव्हां जवळपासच्या खेड्यांतील लोक कुतूहलानें, आदरानें हें अपूर्व दृश्य पहाण्यासाठीं जमा होत. महिलांची फौज हा त्या साध्याभोळ्या लोकांना एक अभूतपूर्व चमत्कारच वाटला. अगदीं भल्या पहांटे ३ वाजतां पूर्व–दारच्या अंधःकारांत महिला–सैनिक कूच करण्यासाठीं बाहेर पडत. झाडींतून, जंगलांतून, काट्याकुट्यांतून या वीरांगना निःशब्द पण निश्चयी पावलें टाकीत कूच करीत. त्यांच्या पावलांची चाहूलसुद्धां लागत नसे. एका डोंगरावर या महिला–पलटणीनें आपला मोर्चा उभारला.

इंग्रज फौज तेथून एक मैलसुद्धां अंतरावर नव्हती. पहाडावर आझाद फौजेच्या राणी झांशी रेजिमेंटचे मोर्चे आहेत याची इंग्रज फौजेला कल्पनाही नव्हती. इंग्रज फौजेनें दरींत प्रवेश करतांच वर पहाडावरून महिला-सैनिकांनीं गोळयांचा प्रचंड भडिमार सुरू केला. दोन वेळां भडिमार केला. ' इन्किलाब झिंदाबाद ' 'जयहिंद ' ' आझाद हिंद झिन्दाबाद ' आणि ' चलो दिल्ली ' च्या घोषणांनीं पहाड दुमदुमलें. पहिल्याच हल्ल्यांत महिलांनीं शत्रूला ताळ्यावर आणलें. सोळा तास-पर्यंत या बहाद्दर महिलांनीं इंग्रज फौजेशीं घनघोर सामना केला. महिलांच्या वीरतेपुढें, साहसापुढें शत्रूला हार खावी लागली. इंग्रज फौजेची अतोनात हानी झाली व त्यांना माघार घ्यावी लागली. स्वतंत्र भारताच्या शूर महिला आणि ब्रिटिश साम्राज्यवादी फौजा यांच्यांतील हा अभूतपूर्व संग्राम ब्रम्हदेश आणि हिन्दुस्थानच्या अगदीं सरहद्दीवरच झाला. इंग्रज फौजेनें माघार घेतांच विजयी महिला-सैनिकांनीं बेहोष आनंदानें त्यांनीं रक्त सांडून शत्रूपासून सोडविलेल्या भारताच्या भूमीवर पाऊल ठेवलें. हिंदुस्थानच्या पवित्र भूमीवर पाऊल टाकतांच आझाद सैनिकांनीं क्षणभर शस्त्रें खालीं टाकून मातृभूमीला साष्टांग प्रणिपात केला. त्या पवित्र भूमीची मृत्तिका आपल्या वीर हातांनीं उचलून माथ्याला लावली. ते पवित्र धूलिकण हातांत ठेवून त्या मातृ-भूमीच्या साक्षीनें त्यांनीं पुन्हा एकदां आपल्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला—

युद्धांत पाठ दाखविणार नाहीं.

भारत स्वतंत्र केल्याशिवाय विश्रांति घेणार नाहीं.

२१ मेला आझाद फौजेनें इम्फालला वेढा घातला. मोराह, कोहिमा वगैरे अनेक गांवें आझाद फौजेनें काबीज केलींच होतीं. आझाद फौजेंत नागरिकांतून जे भरती झाले होते त्यांनींही विशेष शिक्षण व अनुभव नसतांनाही लढाईंत जें धाडस, पराक्रम व सामर्थ्य प्रगट केलें तें अपूर्व होतें. कारकुनांच्या कारखान्यांतून बाहेर पडलेल्या या लोकांनीं आपण केवळ कारकुनी करण्याच्याच लायकीचे नसून सैनिकांच्या बरोबरीनें युद्धांतही शौर्य गाजवूं शकतो हें प्रत्यक्ष दखवून दिलें. समोरासमोर झालेल्या लढाईंत त्यांचा सामना करणें जवळ जवळ अशक्य झालें होतें. इतक्या निकरानें ते लढत.

हिंदुस्थानच्या सरहद्दींत प्रवेश करतांच जपानी सेनापतीनें इंग्रजांच्या हातून सोडविलेल्या प्रदेशावर आझाद सरकारची सत्ता असल्याचें जाहीर केलें व नेताजींनीं तेथें आझाद सरकारचा अंमल स्थापन झाल्याची घोषणा केली. मणीपूर भागांत नं. १ डिविजनचे सेनापती मेजर एम्. ई. कियानी यांच्या आदेशानुसार आझाद हिंद दलानें तेथील सर्व कारभार हातीं घेतला. बिशनपूर भागांत कप्तान एस. ई. मलीक यांच्या देखरेखीखालीं आझाद सरकारचा अंमल सुरू झाला. मोराहपासून पलेलपर्यंत कोहिमामध्यें जवळ जवळ १५०० मैल प्रदेशावर आझाद हिंद सरकारची सत्ता कायम झाली होती. या प्रदेशांत प्रथम पाऊल टाकण्याचा मान कॅप्टन शहानवाज यांच्या सुभाष पलटणीनें मिळविला. या शत्रूपासून जिंकून घेतलेल्या स्वदेशाचा राज्यकारभार चालविण्यासाठींच आझाद हिन्द दलाची स्थापना करण्यांत आली होती. या दलाच्या तुकड्या सैन्याच्या बरोबरच कूच करीत व स्वतंत्र केलेल्या प्रदेशावर आपला अंमल जारी करीत.

आझाद हिन्द फौजेनें केलेल्या अभूतपूर्व स्वातंत्र्य-संग्रामाची कथा पुढें कधीं काळीं कोणीतरी लिहील. या इतिहासाच्या शब्दाशब्दांतून चैतन्यानें स्फूर्तीनें प्रदीप्त झालेला असेल...या तेजस्वी इतिहासांतील फक्त कांहीं अंशभाग आज आपल्यापुढें आहे. रक्तानें लिहिलेल्या या प्रदीर्घ वीर-कथेंतील केवळ कांहीं प्रसंगच आज आपल्याला कळले आहेत···इम्फालच्या आघाडीवर एक अशीच विलक्षण रोमांचकारक घटना घडली. आझाद फौजेच्या विरुद्ध बाजूला इंग्रजांचें हिंदी सैन्य आलें होतें. आझाद सैनिकांनीं झाडांच्या उंच शाखेवर एक फलक लावला व त्यांत हिंदी सैनिकांना आवाहन करून म्हटलें "या, आम्हांला येऊन मिळा आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढा." समोरच्या शिपायांनीं तसाच जबाब दिला "तुम्ही जपान्यांचे गुलाम आहांत, तुमच्याजवळ खायला अन्नसुद्धां नाहीं. तुम्हीच आम्हाला येऊन मिळा. तुम्हांला पोटभर अन्न मिळेल." आझाद सैनिकांनीं आपल्या अलोट अभिमानानें जळजळीत उत्तर दिलें, "आम्ही जपान्यांचें गुलाम नाहीं. आम्ही नेताजी सुभाषबाबूंच्या हुकुमानें लढत आहोंत. अन्नाची आम्हांला काय पर्वा ? गुलामीच्या तूपरोटीपेक्षां आम्हांला स्वातंत्र्याचें गवतसुद्धां अधिक गोड लागतें"–आणि ह्या तेजस्वी जबाब देऊन त्या बहादूर सैनिकांनीं जेव्हां आपल्या वीर वाणीनें

कौमी तिरंगी झेंडे उंचे रहो हमारे" हें झेंडा–गीत गाण्यास सुरुवात केली. तेव्हां पलीकडच्या हिंदी सैनिकांचीं हृदयें उचंबळून आलीं. त्यांनीं हिंदी राष्ट्राच्या या राष्ट्रगीताचें स्वागत केलें. गाण्याच्या सुराबरोबरच विरुद्ध दिशेच्या सैनिकांनीं केलेल्या टाळ्यांच्या कडकडाटाचा ध्वनि हवेंत मिसळला... या हिंदी पलटणीला इंग्रजांनीं :ताबडतोब तेथून हलविलें व आझाद फौजेविरुद्ध इंग्रज फौज आणून उभी केली. हिंदी रक्ताला हिंदी रक्तानें केलेलें आवाहन अमोघ होतें.

पलेलच्या विमानतळाजवळ आझाद फौजेचा तळ पडला होता. मध्यरात्रीं विमानतळावर अचानक हल्ला करून तो काबीज करावयाचा असें ठरलें होतें. आझाद सैनिकांजवळ पुरेसा शिधा नव्हता. जंगलांतील कंदमुळें आणि फळें एकत्र करून व थोडेसें मूठभर तांदूळ घेऊन कसाबसा निर्वाह ते करीत होते. रात्रीं सैनिकांना लढाई करायची. त्यांच्या पोटांत निदान थोडेंतरी अन्न जावें म्हणून आझाद सेनापतीनें जपानी सेनापतीनां एक वेळचें राशन देण्याची विनंती केली. जपानी सेनापतीनें उत्तर दिलें " आमच्याजवळही राशन कमी आहे. पण रात्रीं ज्या जागेवर आपल्याला हल्ला करावयाचा आहे तेथें अन्नाचा खूप साठा आहे." पण त्यावेळेपर्यंत उपाशी पोटी वाट पहाणें कठीण होतें. रात्रींच्या अगोदर जेवणाची व्यवस्था होणें आवश्यक होतें. आझाद सेनापतीनें आपल्या सैनिकांना एकत्र बोलावून सांगितलें, "जादा शिधा मिळत नाहीं. आतां आपल्यापुढें एकच मार्ग आहे. हवाई तळावर हल्ला करून तेथील शिधासामुग्री काबीज करणें. जपान्यांना आपण दाखवून देऊं या कीं, हिंदुस्थानी सैनिक उपाशी पोटानेंसुद्धां शौर्य गाजवूं शकतात. आपण हे हवाई तळ जिंकूंया आणि आपल्याच नाहीं तर या जपान्यांचीही जेवणाची व्यवस्था करूं या. चला, ताबडतोब हल्ला करूं या. तुमची तयारी आहे?" सैनिकांनीं 'जय हिंद'चा घोष करून सेनापतीला साथ दिली. तत्काल हवाईतळावर हल्ला झाला. आझाद सैनिकापुढें हवाईतळावरील फौजेचा टिकाव लागला नाहीं. आझाद सैनिकांनीं विजय मिळविला—आणि आपलें जेवणही... आझाद फौज किती बिकट परिस्थितींत पण किती भीष्मनिश्चयानें आणि अपूर्व शौर्यानें लढत होती याचें हा प्रसंग हें केवळ एक उदाहरण आहे. आझाद फौजेच्या इतिहासांत अशा प्रकारच्या एक नव्हे अनंत घटना आहेत. किंबहुना

सर्व इतिहास हा असाच रक्ताश्रूंनीं भरलेला इतिहास आहे. आझाद फौजेनें या लढाईंत जें अग्निदिव्य केलें त्याची तुलना करायचीच झाली तर फक्त हिंदुस्थानांत हिंदी लोकांनीं ऑगस्टमध्यें केलेल्या आत्म–दानाशींच करतां येईल. जगाच्या इतिहासांत त्याला दुसरी तोड नाहीं.

जसे आझाद सैनिक तसेच त्यांचे सर–सेनापती–शिपाई–सालार, नेताजी सुभाषबाबू होते. नेताजी आरामखुर्चीवरील क्रांतिकारक नव्हते. सैनिकांना पुढें पाठवून लढा लढविणारे पुढारी नव्हते. नेताजी सदैव आपल्या सैनिकांबरोबर असत. त्यांचें संकट तें नेताजींचें संकट, त्यांचें अन्न तें नेताजींचें अन्न. आपल्या व सैनिकांच्या परिस्थितींतही त्यांनीं किंचितही फरक पडूं दिला नाहीं. मे आणि जूनचे दोन महिने त्यांनीं स्वतः आघाडीवर काढले. नेताजी जातीनें जवळ असल्यामुळें सैनिकांचा उत्साह शतपटीनें वृद्धिंगत होई. सर्व धोके आणि हाल अपेष्टा यांना तोंड देऊनही नेताजी अमर राहिले. ते बॉंब वर्षावांतून जसे वांचले तसेच त्यांचे खून करण्याचे शत्रूच्या हेरांनीं अनेक प्रयत्न केले त्यांतूनही वांचले. नेताजींनीं दाखविलेलें धैर्य आणि सहनशक्ति ही आझाद हिंदुस्थानच्या आझाद सैन्याच्या सरसेनापतीला साजेशी होती.

नेताजींच्या या धोरणामुळें व आचरणामुळें सैनिकांत विलक्षण उत्साह, सामर्थ्य व तेज निर्माण झालें होतें. या उसळत्या उत्साहाचें विराट् निदर्शन ता. २२ सप्टेंबर १९४४ ला रंगून येथें हुतात्मा जतींद्रनाथ दास यांच्या स्मृतीनिमित्त जी सभा भरली त्या सभेंत झालें. रंगूनचा ज्युबिली हॉल ठोस भरला होता. श्वासोच्छ्वास करण्यालासुद्धां अवकाश नव्हता. हुतात्म्यांच्या पुण्यस्मृतीवर अनेक भाषणें झालीं. वक्त्यांनीं आपल्या भाषणांत अमर शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु 'इन्किलाब झिंदाबाद'च्या घोषणा करीत फांसावर कसे चढले याचें हृदयविदारक वर्णन केलें. या हुतात्म्याबरोबरच लढतां लढतां गोळी लागून मेलेले चंद्रशेखर आझाद, कोमिल्लाच्या मॅजिस्ट्रेटवर गोळया झाडणाऱ्या वीर-कन्या सुनीति आणि शांता, बंगालच्या गव्हर्नरावर पदवीदान समारंभाचे वेळीं गोळया झाडणारी वीणा दास यांच्याही आठवणी वक्त्यांनीं सांगितल्या. लाहोर तुरुंगांत कण कण झिजून अखेर प्राणत्याग कर-

णाऱ्या जतींद्रनाथांच्या बलिदानाची हृदयस्पर्शी अमर कहाणी ऐकतांना श्रोत्यांचे कंठ दाटून आले व डोळ्यांत अश्रू तरंगले. या दिवशीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले, "भारतमाता स्वतंत्र झाल्याशिवाय आतां रहाणार नाहीं. पण स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं बलिदान केलें पाहिजे. स्वातंत्र्यासाठीं शक्ति, संपत्ति व इतर सर्वस्वाचें समर्पण करावें लागेल. आपलें सुख, आपला आनंद, विलास संपत्ति सर्व कांहीं या क्रांतिकारकाप्रमाणेंच सोडून द्यावें लागेल. आपण आपल्या मुलांना सैन्यांत पाठविलें आहे पण येवढ्यानें स्वातंत्र्य-देवी संतुष्ट होणार नाहीं. शत्रूला स्वतःच्या रक्ताच्या नदींत बुडविणाऱ्या, मृत्यूला हंसत हंसत आलिंगन देणाऱ्या क्रांति-कारक स्त्री-पुरुषांचें बलिदान स्वातंत्र्य-देवतेला प्रिय असतें. स्वातंत्र्य-देवता म्हणते–" तुम्ही मला रक्त द्या—

मी तुम्हांला स्वातंत्र्य देतों."

हेंच स्वातंत्र्याचें आवाहन आहे, स्वातंत्र्य--देवतेची हीच मागणी आहे—

" रक्त द्या–प्राण द्या–"

शतसहस्र कंठांतून एका आवाजांत गर्जना झाली—

" आम्ही तयार आहोंत "

" आमचें रक्त घ्या "

नेताजी गंभीरपणें पुढें म्हणाले, " तुम्ही केवळ भावनेच्या भरांत कांहीं करावें हें मला पसंत नाहीं. ज्यांची प्राण देण्याची तयारी असेल त्यांनीं पुढें येऊन प्रतिज्ञा पत्रकावर सह्या कराव्या. ही प्रतिज्ञा स्वातंत्र्याच्या–वेदीवर मृत्यूला आलिंगन देण्याची आहे. "

सभागृहाच्या काना–कोपऱ्यांतून आवाज उठले, " आम्ही तयार आहोंत. "

नेताजी म्हणाले " पण मृत्यूला कवटाळणाऱ्या या प्रतिज्ञेला साध्या शाईत लिहितां नाहीं येणार. ही प्रतिज्ञा तर तुम्हांला रक्तानें लिहायला पाहिजे–स्वतःच्या रक्तानें. ज्याची हें धाडस करण्याची हिंमत असेल त्यानेंच पुढें यावें. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं या प्रतिज्ञापत्रकावर तुम्ही माझ्यासमोर आपल्या रक्ताची मोहर लावतांना मला पहावयाची आहे. "

सर्व सभागृह उठलें. त्या लोकसमुद्राला एक तुफान भरती आली. जो तो व्यासपीठाकडे घुसूं लागला. पण व्यासपीठाजवळचा भाग स्त्रियांनीं व्यापला होता. त्यांनीं एकदम व्यासपीठावर जाण्याचा रस्ता रोखून धरला. मृत्यूच्या करारनाम्यावर रक्तानें सही करण्याचा पहिला मान स्त्रियांना मिळाला पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. सतरा स्त्रियांनीं प्रथम हा लाल करारनामा लिहिला. नंतर सभागृहांत सर्वत्र सह्या होऊं लागल्या. मृत्यूच्या करारनाम्यावर रक्तानें सही करण्याचा हा समारंभ एक तास चालला होता. हें दृश्य पहाणाराला वाटे, केशरी वस्त्र परिधान करून जौहर करणाऱ्या रजपुतांचा हिंदुस्थान अद्याप जिवंत आहे; ' अल्ला हो अकबर ' आणि ' हर हर महादेव'च्या वीर गर्जना करून शीर तुटेपर्यंत लढणाऱ्या हिंदुस्थानी वीरांची उज्ज्वल परंपरा आजही अखंड आहे. त्याच रजपुतांचे, त्याच मराठ्यांचे, त्याच मुसलमानांचे वारस आज आपल्या पराक्रमी पूर्वजांना अभिमान वाटेल अशी त्यागशील वीरश्री येथें प्रगट करीत आहेत. अशा अमर वीरतेपासून स्वातंत्र्य कसें दूर राहील ?

आझाद सैनिकांच्या भीष्म–संगराचा इतिहास भविष्यकाल अभिमानानें निवेदन करील. स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय रणांगणांतून हटायचें नाहीं. शत्रूला पाठ दाखवायची नाहीं हा त्यांचा कृतनिश्चय किती अढळ होता याची साक्ष एका हृदयस्पर्शी घटनेनें आली. कर्नल गुलमारासिंग यांच्या आझाद पलटणीच्या २८०० सैनिकांची ही कथा आहे. हे सैनिक इतक्या आवेशानें लढले कीं, शत्रूला त्यांच्यापुढें नेहमींच पळ काढावा लागे. या शूर सैनिकांना मागें फिरणें माहीतच नव्हतें. त्यांना जेव्हां परत फिरण्याचा हुकुम मिळाला तेव्हां ते इतके असंतुष्ट झाले कीं, वाटलें हे आतां 'बंड'च करतात ! त्यांनीं मागें फिरण्याचें साफ नाकारलें. ते म्हणाले, " आमच्या ' सिपाह–सालार नेताजींनीं तर आम्हांला दिल्लीला पोंचण्याचा हुकुम दिला आहे. त्यांनीं आम्हांला सांगितलें कीं, काय वाटेल तें झालें तरी पाऊल मागें घ्यायचें नाहीं. दुसऱ्या डिविजनचे मेजर डे, मदन, रियाज आणि सरवर यांना पुढें करून इंग्रज आपल्याला धोका देऊं पहातात. आम्ही मागें फिरणार नाहीं." अधिकाऱ्यांनीं त्यांना समजाऊन सांगितलें, " आमचा दारुगोळा खतम् झाला आहे. आमच्याजवळ एकसुद्धां मोटार किंवा लॉरी राहिलेली नाहीं. शिधा–सामुग्री तर

आपण चिन्दवीनपासून पुढें आलों तेव्हांच संपली होती. तेव्हांपासून आपण गवत, कंदमुळें यावर कसातरी गुजारा करीत आहोंत. आपल्यापैकीं अनेक आजारी पडले आहेत. मलेरियाचा जोर आहे आणि औषधपाणी तर सगळें संपून गेलें आहे. आतां मागें फिरण्याशिवाय आमच्यापुढें दुसरा मार्ग नाहीं."

तरीही सैनिक ऐकण्यास तयार होईनात. त्यांनीं जबाब दिला, "आतांपर्यंत कंदमुळावरच निर्वाह केला, तसाच पुढें करूं. पण आपण पुढें जात राहूं. औषधपाण्याची आम्हांला गरज नाहीं. आमचें काम औषधावांचून भागेल. कांहीं झालें तरी आम्ही शत्रूची पाठ सोडणार नाहीं" नेताजींचा हुकूम आम्ही मोडणार नाहीं. इरावती नदीच्या तीरावर याच बहादूर सैनिकांनीं दोन वेळां इंग्रज फौजेला पिटाळून लावलें होतें. त्यांना प्रबळ आत्मविश्वास होता कीं, आपण शत्रूचा निःपात करूं. त्यांना सांगितलें, जपान्यांनींही माघार घेतली आहे, त्यावर सैनिक म्हणत कीं, हीच आपली संधी आहे. याचवेळीं शत्रूचा पाठलाग करून त्याचा खात्मा करूं या.

शेवटीं सुभाषबाबूंनीं खुद्द स्वतःच्या अक्षरांनीं लिहिलेला हुकुम मागविण्यांत आला. खुद्द नेताजींनीं लिहिलेला तो हुकुम वाचून दाखविण्यांत आला तेव्हां त्यांचा नाइलाज झाला. त्यांच्या डोळयांत वीराश्रू चमकले. कंठ सद्गदित झाले. जड पावलांनीं आणि जड हृदयांनीं ते मागे फिरले. रणांगणावर वाघासारखे लढणारे हे शूर या प्रसंगीं लहान मुलांसारखे ढसाढसा रडले. दुर्दिन होता तो त्यांना. दिवसभर त्यांनीं अन्नपाण्याला स्पर्श केला नाहीं. त्यांचे वीरतेजानें प्रकाशणारे चेहरे आतां विषण्ण वैफल्यानें काळवंडून गेले. जणूं त्यांच्यावर येणाऱ्या भावी अरिष्टाची कृष्ण छायाच त्यांच्यावर पसरली होती. गांधी आणि नेहरू ब्रिगेडलाही मागें हटावें लागलें. त्यांची अतिशय हानी झाली. पण त्यांची जितकी हानी झाली त्याच्या कमीतकमी दुप्पट हानी त्यांच्याकडून इंग्रज फौजेची झाली. इंग्रजांची चौदावी फौज तुफानी प्रवाहाच्या अमोघ गतीनें पुढें कूच करीत होती. सुभाष ब्रिगेडनें तिच्याशीं भयंकर सामना करून तिला रोखून धरलें. सुभाष–ब्रिगेडच्या या बहादुरीची सर्वत्र तारीफ होत होती....

...येथें एका स्वप्नाची समाप्ती झाली. डोळ्यासमोर दिसत असलेला विजय हातांत आला नाहीं. एका प्रचंड प्रयत्नाचा शेवट विफलतेंत झाला. सर्व

उमलत्या आशांचा पराजयानें चुराडा केला. या स्वातंत्र्य-वीरांची श्रद्धा होती कीं उत्साह, साहस, हिंम्मत, धैर्य आणि बलिदान या त्यांच्या शस्त्रांशीं मुकाबला करील असें शस्त्र दुनियेंत नाहीं–या शक्तीसमोर कोणतीही शक्ति टिकाव धरणार नाहीं. त्यांनीं कधीं अन्नाची पर्वा केली नाहीं–ना कपड्याची, ना जोड्याची ना दवापाण्याची. दारूगोळ्याची आणि युद्ध साहित्याची तर गोष्टच नको. उंच उंच बिकट पहाडांचीं शिखरें आणि घनदाट जंगल ते केवळ उघड्या पायांनीं ओलांडीत. शोनानहून इम्फालपर्यंत २७७५ मैल लांब रस्ता काटायचा होता. त्यापैकीं फक्त १७०० मैल मोटार, रेल्वे आणि जहाजांतून ओलांडला पण उरलेली १०७५ मैलाची दीर्घ सफर त्यांनीं पायदळ केली. जपानी फौजा ब्रह्मदेशापर्यंत मोठ्या वेगानें आणि हिंमतीनें आल्या पण पहाडी मुलखांत प्रवेश करतांच त्यांची गती खुंटली आणि हिंमत खचली. त्यांच्या विमानांचे या मुलखांत कांहीं चाललें नाहीं. पण आझाद सैनिकांनीं तळहातावर प्राण घेऊन दऱ्यापर्वत, रान–जंगल ओलांडले ते अर्धपोटी लढले, इंग्रजांच्या हातून त्यांनीं मणीपूर जिंकून घेतलें. इंग्रज फौजेचें नैतिक बल त्यांच्यामुळें खतम् झालें. पण...पण इतकं सर्व करून, मिळवून, लढून, रक्त सांडून, हाल अपेष्टा सहन करून, बलिदान करून अखेर–अखेर त्यांना माघार घ्यावी लागली. हवाई हल्ले, दारू-गोळा, शिधा व वहातुकीची व्यवस्था जपान्यांच्या हातांत होती. ते आझाद सैनिकांना मदत करूं शकले नाहींत. धड कपडे नाहींत, पोटांत अन्न नाहीं, हातांत पुरेशीं शस्त्रेंही नाहींत, विमानांचें संरक्षण नाहीं अशी ही आझाद फौज केवळ कितीही शूर असली, हिंमतवान असली, भीष्मनिश्चयी असली तरी सर्व शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असलेल्या पहिल्या दर्जाच्या फौजेशीं किती काल कसा मुकाबला करणार? सर्वच देशांतल्या क्रांतिकारक फौजांना स्वातंत्र्यासाठीं अशाच विपरीत परिस्थितींत आणि अपुऱ्या शस्त्रसामुग्रीनीशीं लढावें लागतें हें खरें आहे. इटाली, फ्रान्स, आयर्लंड आणि रशियांतील स्वातंत्र्यसैनिकांनीं अशाच परिस्थितींत क्रांति यशस्वी केली. पण आमच्या आझाद हिंद फौजेला देशाच्या बाहेर लढावें लागलें. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत ती उभारली गेली. आणि त्यांतही निसर्ग त्यांच्याविरुद्ध गेला. पावसाळा सुरूं झाल्यानंतर जंगलांत युद्ध चालू ठेवणें अशक्य होतें. त्यांची मौल्यवान् संधी हातची गेली...

१३ ऑगस्ट १९४४ ला नेताजींनीं सर्व कार्यकर्ते व मंत्री यांची बैठक भरविली. एकंदर परिस्थितीचें सिंहावलोकन करून नेताजींनीं त्यांना सांगितलें, " चढाई करण्यांत आम्हांला उशीर झाला. निसर्गानें आम्हाला दगा दिला. आमचा चढाईचा रस्ता चिखलांत आणि पाण्यांत बुडाला आहे. नद्यांना पूर आला आहे. उलट, शत्रूला रस्ता मोकळा आणि साफ मिळाला आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वींच आम्ही इम्फालवर कबजा करायला पाहिजे होता. तरच आम्हाला पुढें कूच करतां आलें असतें. शिवाय; आमच्याजवळ विमान-दल नव्हतें. आम्ही जानेवारींतच चढाई सुरू केली असती तर आम्हाला निश्चित यश मिळालें असतें. पावसाळा सुरू होण्यापूर्वीं आम्ही शत्रूला सर्व आघाडीवर ठोकलें होतें. त्याला रोखून धरले होतें. कलादानमध्यें तर शत्रूची दाणादाण उडवून आम्हीच पुढें घुसलों होतों. कोहिमा आणि पलेल येथेंही शत्रूला माघार घ्यावी लागली होती. हाका येथें आम्ही शत्रूला यशस्वी सामना देऊन अडवून धरले. हे सर्व आम्ही शत्रूजवळ आमच्यापेक्षां संख्याबल, युद्धसामुग्री व शिधा कितीतरी पटीनें अधिक असतांना करूं शकलो. पावसाळा सुरू झाल्यामुळें आम्हाला इम्फालवरील आक्रमण स्थगित करावें लागलें. या संधीचा फायदा घेऊन शत्रूनें जादा शस्त्रास्त्रांची जमवाजमव करून प्रतिहल्ला चढविला व कोहिमा-इम्फाल रस्त्यावर कबजा मिळविला. आतां आमच्यापुढें प्रश्न उपस्थित झाला आहे कीं नवीन आघाडी कोठें ठेवायची. आमच्यापुढें दोन मार्ग आहेत-एक बिशनपूर-पलेल भागांतच निश्चयपूर्वक ठाण मांडून शत्रूला सामना द्यायचा व त्याला मागें हटवायचें किंवा थोडी माघार घेऊन अधिक सुरक्षित जागेवर नवीन आघाडी बांधायची. कांहींही असलें तरी या सर्व परिस्थितींतून एक धडा आम्ही शिकलों आहोंत. आगीशीं कसं खेळायचं तें आतां आम्हाला कळलं आहे. आमच्या नागरिकांच्या फौजेनेंही शत्रूला पाठ दाखविण्याचें नाकारलें. त्यांनीं प्रथम शत्रूला कुचललें, त्याला मागे हटायला लावलें व मगच त्यांनीं माघार घेतली. आम्हा सर्वांनाच एक नवीन अजेय आत्मविश्वास प्राप्त झाला आहे. त्याबरोबर आतां आम्हाला हेंही कळून चुकलें कीं इंग्रजांबरोबर त्यांच्या बाजूनें लढणारे हिंदुस्थानी सैनिक आमच्याबरोबर येण्यास, आम्हाला मदत करण्यास तयार आहेत. आतां फक्त त्यांना आमच्याकडे आणण्याची

योजना आम्हाला केली पाहिजे. शत्रूची कारस्थानेंही आम्हाला कळलीं आहेत. शत्रूच्या योजना आम्हाला माहित झाल्या आहेत. आमच्या सेनापतींना अत्यंत मूल्यवान अनुभव मिळाला आहे. जपान्यांचा प्रथम आमच्या कर्तृत्वावर विश्वास नव्हता. ते आमच्या फौजेची अनेक तुकड्यांत वाटणी करून फक्त मदतीसाठीं म्हणून आमचा उपयोग करूं पहात होते. माझी इच्छा होती कीं एक आघाडी संपूर्ण आमच्या फौजेच्या स्वाधीन करण्यांत यावी...या अनुभवांतून आम्हाला आमचे दोष व उणीवा दिसून आल्या. आमची वहातुकीची, रसद पोचविण्याची व्यवस्था व प्रचाराचे मार्ग अत्यंत दोषपूर्ण होते. वहातुकीचीं साधनें अपुरी असल्यामुळेंही आमचें फार नुकसान झालें. जपान्यांनीं तर आम्हाला लाऊड स्पीकर्ससुद्धा पुरेसे दिले नाहींत पण आतां आमचे स्वतःचे लाऊड स्पीकर्स तयार करीत आहोंत "...या बैठकी-नंतर २१ ऑगस्ट १९४४ ला नेताजींनीं पावसाळा सुरू झाल्यामुळें मोहीम स्थगित करण्याचा व नव्या मोहिमेची तयारी करण्याचा आदेश दिला. मोहिमेच्या तयारीचा भाग म्हणून सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत ब्रह्मदेशांतील हिंदुस्थानी आझाद संघातर्फे एक परिषद भरविण्यांत आली. या परिषदेला ७४ शाखांचे १८० प्रतिनिधी हजर होते...पण इम्फालच्या आघाडीवरून आझाद हिंद फौज व जपानी फौजेला यावेळीं जें मागें फिरावें लागलें तें कायमचेंच. प्रशांत महासागरांत जनरल मॅक-आर्थरच्या फौजांनीं अतिशय वेगानें आक्रमण सुरू केलें. इम्फाल नंतर मिटकिना जपान्याच्या हातून गेलें. २० आक्टोबर १९४४ टिड्डीमवर १४ व्या इंग्रज फौजेनें कबजा केला. २६ जानेवारी १९४५ इंग्रज फौजा अक्याबला पोचल्या. ४ मार्चला टोकिओवर १५ शे अमेरिकन विमानांनीं पहिला भयंकर बॉम्बवर्षाव केला. जपानची परिस्थिति अत्यंत बिकट झाली. ५ मार्चला मिकतीन जपानच्या हातून गेलें आणि रंगूनवर इंग्रज फौजांनीं आक्रमण सुरू केलें. १५ मार्चला मंडाले व मेमयो इंग्रजांनीं घेतलें.

६ एप्रिलला रशियानें जपानशीं झालेला आक्रमण विरोध करार खतम् झाल्याचें जाहीर केलें. या सर्व घटना एकामागून वावटळीसारख्या घेरीत असतांही नेताजींचा आग्रह होता कीं रंगून सोडूं नये. आपल्या फौजेची सर्व

शक्ति रंगूनच्या संरक्षणासाठीं पणाला लावण्याची त्यांची तयारी होती. कारण एकदां ब्रह्मदेश इंग्रजांनीं ताब्यांत घेतला कीं मग दिल्लीपर्यंत पोचणें अशक्य होईल व स्वातंत्र्य हें पुन्हा एक स्वप्न ठरेल हें त्यांना दिसत होतें. पण नेताजींचा सल्ला जपानी सर सेनापती व इतर अधिकाऱ्यांना पटला नाहीं. त्यांनीं रंगून सोडायला सुरवात केली. २३ एप्रिल १९४५ ला जपानी सेनापती बँगकाकला निघून गेले. नाईलाज होऊन नेताजींनाही २४ एप्रिलला बँगकॉकला जाणें भाग पडलें....

नेताजी बँगकॉकला जाण्यासाठीं विमानांत चढले तें दृश्य अत्यंत करुण होतें. त्यांना निरोप देण्यासाठीं जमलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या डोळयांत अश्रू आले होते. नेताजींनीं अखेरचा संदेश देतांना म्हटलें " माझ्या बहादूर मित्रांनो हिंमत सोडूं नका. आपण स्वतंत्र हिंदुस्थानांत पुन्हा लवकरच भेटूं अशी खात्री बाळगा." जातांना त्यांनीं मंत्र्यांना हुकूम दिला कीं सर्व सैनिकांना बोनसशिवाय आणखी सहा महिन्याचा पगार वाटून द्यावा. नेताजींची बँगकौकला जाण्याची मुळींच इच्छा नव्हती. आपण शेवटपर्यंत आपल्या सहकाऱ्यांबरोबर रंगूनलाच रहावें असें त्यांना मनापासून वाटत होतें. पण आझाद हिंद सरकारच्या सर्व मंत्र्यांनीं आणि फौजेच्या सर्व अधिकाऱ्यांनीं या बेताला विरोध केला व नेताजींना बँगकौकला जावें लागलें.

यावेळीं रंगूनला एकंदर सात हजार आझाद सैनिक होते. या फौजेनें कर्नल लोकनाथन् यांच्या हुकुमानुसार जनतेच्या जीविताचे व मालमत्तेचें रक्षण करावें आणि इंग्रज फौज येतांच लढाई बंद करावी असें ठरलें होतें. रंगून सोडून मलायांत जाण्याचा कांहीं उपयोग नव्हता. कारण रंगून हातचे गेल्यानंतर मलायांत पाय रोवणें अशक्यच होतें. म्हणून या फौजेनें रंगूनलाच रहायचें ठरविलें. आझाद हिंद संघातर्फे होणाऱ्या सर्व कारभाराची जबाबदारी श्री. भादुडी यांच्यावर टाकण्यात आली होती.

आझाद हिंद सरकारही बँगकौकला हालविण्यांत आले. जपान सरकारचे सारें देणें चुकतें करण्यांत आलें. आझाद हिंद नॅशनल बँकेनें सर्वांचे हिशेब पूर्ण केले. आझाद हिंद फौजेचे सर्व पगार चुकविण्यासाठीं आझाद हिंद सरकारला बँकेनें

महाराष्ट्र ... ८२८०

पांच लाखाची देणगी दिली. बँकेचें काम चालू ठेवायचें असा निर्णय घेण्यांत आला. २४ एप्रिलला रंगून सोडतांना सिपहसालार या नात्यानें नेताजींनीं संदेश देतांना म्हटलें, " मी अत्यंत जड हृदयानें ब्रह्मदेश सोडीत आहे. इम्फाल आणि ब्रह्मदेशाच्या पहिल्या आघाडीवर आम्ही हरलों. पण ही फक्त पहिली आघाडी होती. अजून अनेक आघाडीवर शत्रूशीं टक्कर द्यायची आहे. मी जन्मतःच आशावादी आहे. कोणत्याही परिस्थितींत मी हार खाणार नाहीं. इम्फालच्या मैदानांत, आराकानच्या जंगलांत आणि पहाडांत आणि ब्रह्मदेशाच्या तेलाच्या खाणींतून व इतर अनेक ठिकाणीं शत्रूशीं लढतांना तुम्ही जी वीरता आणि जें साहस दाखविलेंत त्याची कथा आमच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासांत अमराक्षरांनीं लिहिली जाईल. "

एप्रिलच्या अखेरीस तुंगा, दोन मेला पेगू आणि शेवटी चार मेला रंगून पडलें.

१८ ऑगस्टला नेताजींना बँगकौकहून टोकिओला जाण्यासाठीं निघावें लागले बँगकौकमधील आझाद हिंद फौजेची माहिती आतां उपलब्ध झाली आहे. नोव्हेंबर १९४५ पर्यंत तेथें १९६३ सैनिक आणि अधिकारी नजर-कैदेंत होते. त्यांना कँपमधून खोटी आश्वासने देऊन बाहेर काढण्यांत आले व बंद लाऱ्यांत भरून इकडे तिकडे फिरवत निरनिराळ्या तुरुंगांत नेऊन ठेवण्यांत आले. त्यांना कोठें ठेवण्यांत आले आहे याचा कोणालाही पत्ता लागू देण्यांत आला नव्हता. या परिस्थितींतही या सैनिकांचे धैर्य अटळ राहिले. त्यांनीं तेथेही आपले साहस आणि आत्मविश्वास प्रगट केला. आपले कमांडिंग आफिसर कर्नल गुप्ता यांच्याशिवाय ते कोणाचाही हुकूम मानीत नसत. ९ ऑगस्टला जपानचा पराजय होऊन जपानने शरणागती दिली पण नेताजींच्या शरीररक्षकांनीं साफ सांगितलें कीं जपान शरण गेला असेल आम्ही शरण गेलों नाहीं. आतां काय करायचे, या सैनिकांची समजूत कशी काढायची हा एक बिकट प्रश्न कर्नल भोसले यांच्या पुढें उभा राहिला.

नेताजी १७ ऑगस्टला संध्याकाळीं आझाद फौजेच्या सर्व लोकांना भेटले. पण त्यांची हिंमत व निश्चय पाहून शस्त्र खालीं ठेवण्याचा हुकूम देण्याचें धाडस नेताजींना सुद्धां करवलें नाहीं. १८ ऑगस्टला बँगकौक सोडतांना त्यांनीं कर्नल

भोसलेना शस्त्रबंधी करण्याचा हुकूम दिला. छोलपुरी कँपमध्यें ही बातमी पोंचतांच जाँ-बाज पलटणीच्या सैनिकांनी चिडून जाहीर केलें कीं शरण जाण्याची भाषा जो करील त्याला गोळी घालण्यांत येईल. अत्यंत मुष्कीलीनें त्यांची समजूत करण्यांत आली. त्यांना असें आश्वासन देण्यांत आलें कीं कोणीही इंग्रज अधिकारी तुमच्या छावणींत येणार नाहीं. इंग्रज फौजेचे कर्नल शिवदत्त-सिंह यांनीं तर कर्नल भोसलेना आपल्याकडेच झोपायला ठेऊन घेतलें आणि चार दिवसांनीं त्यांना गिरफदार केलें. कर्नल भोसले यांच्या अटकेनंतर दिलेली सर्व आश्वासनें तोडण्यांत आलीं. धरपकडीचें सत्र सुरूं झालें. आझाद फौजेचा विश्वासघात करण्यांत आला.

# ८

# क्रान्तीचा विजय असो

राम आणि कृष्णानें आपल्या उद्देशासाठीं केलेल्या दुर्धर संकटाची कथा रामायण आणि महाभारत सांगते. पण रामायण आणि महाभारताला हेही नमूद करावें लागतें कीं या युद्धानंतरही दोन्ही अवतारी पुरुषांना आपलें उद्देश सफल झाल्याचे पहायला मिळाले नाहींत. सीता रामचंद्राजवळ राहिली नाहीं. आणि पांडवांना हिंदुस्थानचे सम्राट् बनवून अखंड सार्वभौम चक्रवर्ती साम्राज्य स्थापन करण्यांत कृष्णाला यश आलें नाहीं. राम आणि कृष्णांचे हे अपयश कोणी लक्ष्यांत घेत नाहीं. उलट त्यांचे जीवन अत्यंत सफल व धन्य मानलें जातें. त्यांची गणना अवतारी पुरुषांत होते व मंदीरांतून त्यांच्या मूर्तीची पूजा केली जाते. त्यांच्या जीवितार्चे साफल्य कोणत्याही अंतिम विजयांत नाहीं तर आपल्या महान् उद्देशाच्या प्राप्तीसाठीं त्यांनीं केलेल्या महा-प्रयत्नांत आहे. क्रांतिकारकांच्या बाबतींतही उद्देशाची पूर्ति हा यशाचा मानदंड नाहीं तर उद्देशपूर्तीसाठीं त्यांनीं केलेल्या प्रयत्नांवर त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केलें पाहिजे. केवळ या दृष्टीनें विचार केला तर नेताजी आणि त्यांचे सहकारी यांनीं आपल्या ध्येय साधनेसाठीं सर्वस्व समर्पण केलें होतें. त्यांच्या महान् प्रयत्नानें व त्या प्रयत्नांतून निर्माण झालेल्या इतिहासानें सुभाषबाबूंना व त्यांच्या सहकाऱ्यांना अमरता दिली आहे. आज सुभाषबाबूंचें व त्यांच्या सहकाऱ्यांचें नांव, त्यांच्या पराक्रमाच्या कथा सर्वांच्या तोंडी झाल्या आहेत. आज सर्वत्र लोक त्यांची गाणी गात आहेत. ही लोकमान्यता काय विफलतेचें लक्षण आहे? नेताजी आपल्या कार्यांत अयशस्वी झाले असें म्हणतां येणार नाहीं. १९४२ मध्यें सिंगापूर पडल्यानंतर जो इतिहास निर्माण झाला तो तीन वर्षांत बदलू शकतो तर १९४५ मध्यें लिहिला गेलेला दुसरा इतिहास पुन्हा कशावरून बदलू शकणार नाहीं? गेल्या

पंचवीस वर्षांचा इतिहासच हें सांगतो कीं कोणत्याही घटनेला दगडावरची रेघ समजण्याचें कारण नाहीं. इतिहास झपाट्यानें बदलत आहे.

ज्या क्रांतीच्या प्रचंड लाटेत आज सर्व देश सांपडला त्या क्रांतीचें सामर्थ्य अजिंक्य बनविणें हेंच खरोखर नेताजी व त्यांचे सहकारी यांचें कार्य होतें. महायुद्धानंतर युद्धांच्या प्रतिक्रियेनें देशाला प्रेतकळा आली होती. जर आझाद हिन्द फौजेचा चमत्कार घडून एका नव्या रक्ताचा प्रवेश देशाच्या नसानसांत झाला नसता तर हा मुडदा मुडदाच राहिला असता. ऑगस्ट क्रांतीला चिरडून टाकण्यासाठीं ५७ च्या क्रांतीकाळांत झालेल्या अत्याचारापेक्षांही भीषण अत्याचार करण्यांत आले होते. दडपशाहीचें स्वरूप इतकें उग्र राक्षसी व अमानुष होतें कीं तिच्या घणाघातानें देश लक्ष्मणाप्रमाणें मूर्च्छना येऊन पडल्यासारखा झाला होता. त्याला संजीवनी मिळाली आझाद फौजेच्या शौर्य आणि धैर्याच्या स्फूर्तीशाली कहाणीनें. आझाद फौजेच्या अपूर्व प्रयत्नांचा साक्षात्कार होताच बिजलीचा स्पर्श व्हावा तसें एका नव्या तेजाचा संचार देशांत झाला. आज स्वातंत्र्याची आकांक्षा पूर्वींपेक्षां अनंतपटीनें उत्कट झाली आहे. आज स्वातंत्र्या-साठीं बलिदान करण्याची भावनाही पूर्वीपेक्षां अनंतपटीनें प्रभावी झाली आहे. आज क्रांतिकारक शक्ति नव्या तेजानें, नव्या शक्तिनें अभियुक्त आहेत. आणि खुद्द आझाद हिंद फौजेचें सैनिक इतके प्राणांतिक आघात सोसूनही अजिंक्य राहिले आहेत. त्यांची राष्ट्रीयता, स्वदेशाभिमान आणि आत्मविश्वास पूर्वी-इतक्याच तीव्रतेनें जागृत आहे, सचेतन आहे. पराजित झालेल्या फौजेची निराशा व बेहिंमत त्यांच्यांत दिसून येत नाहीं. ज्या मशाली तेव्हां पेटल्या होत्या त्या आजही तशाच जळत आहेत, त्यांचा प्रकाश चारी दिशेला पसरत आहे.

आझाद हिंद सरकारची स्थापना आणि आझाद हिंद फौजेची संघटना कांहीं लूट-मार करण्यासाठीं झाली नव्हती. केवळ भावनेच्या भरांत कांहीं गप्पा मारण्यासाठीं झाली नव्हती. त्यांच्यापुढें ध्येय होते एका महान्, पददलित, दीडशें वर्षे गुलामीत पडलेल्या राष्ट्राच्या दीडशें वर्षांच्या सुप्त आकांक्षाना मूर्त स्वरूप देणें. त्याच्यामागें शेकडों नव्हे हजारो स्वातंत्र्य वीरांच्या, हुतात्म्यांच्या, देशभक्तांच्या महान् प्रयत्नांचे, दिव्य तपश्चर्येचें बल होते. लक्ष लक्ष देशभक्तांच्या बलिदानावर त्यांचे अधिष्ठान होते. एक नवें स्वतंत्र, तेजस्वी राष्ट्र निर्माण

करण्याच्या निश्चित कल्पनेनें त्यांनीं हा महान् प्रयोग केला होता. लाल किल्ल्यांतील खटल्यांत आझाद हिंद फौजेचा राष्ट्रीय भावनेचा व देशप्रेमाचा निर्वाळा देतांना कॅप्टन सेहगल यांनीं आपल्याला सांगितलें कीं, " हिंदुस्थानवर आक्रमण करण्याचें जपाननें निश्चित केले होतें. लवकरच आपल्या देशावर महान् संकट कोसळणार आहे याची आमच्यापैकीं प्रत्येकाला जाणीव झाली. हिंदुस्थानांत जपानचा सामना होऊं शकणार नाहीं हेही आम्हाला पूर्णपणें माहीत होते सिंगापूरच्या रक्षणासाठीं हिंदुस्थानांतून जी अखेरची फौज आली ती नवीन भरती केलेल्या रंगरुटांची होती. या फौजेवरुन हिंदुस्थानच्या रक्षणासाठीं कशाप्रकारचें सैन्य ठेवले आहे त्याची कल्पना करतां येत होती. त्या दिवसांतून हिंदुस्थानांतून येगारे अधिकारीही असेंच सांगत कीं हिंदुस्थानांत अद्यावत शस्त्रसामुग्री बिलकूल नाहीं. लाकडाच्या बंदुकांनीं त्यांना शिक्षण ध्यावें लागतें. उत्तर–पूर्व दिशेला संरक्षणाची व्यवस्था बिलकूल नाहीं. ऑगस्ट १९४२ नंतर जी भीषण दडपशाही करण्यांत आली तिच्या माहितीनेंही आमच्या मनावर परिणाम झाला. देशाचें संरक्षण करण्यासाठीं पुढाऱ्यांनीं देऊं केलेलें सहकार्य इंग्रजांनीं झिडकारलें होतें. जपानचें आक्रमण इंग्रज रोखूं शकतील असा आम्हाला विलकुल विश्वास वाटत नव्हता. आणि या परिस्थितींतून नागरिकांकडून प्रतिकाराची काय अपेक्षा करणार? या सर्व गोष्टींचा गंभीर विचार केल्यानंतर आपसांत चर्चा करून शेवटी आम्ही या निर्णयाला आलो कीं परदेशी सत्तेपासून देशाला सोडविण्यासाठीं इंग्रजांच्या ऐवजीं आपले आधिपत्य हिंदुस्थानवर स्थापन करण्याचें जपानचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं आणि देशवासियांचे त्यांच्या अत्याचारांपासून संरक्षण करण्यासाठीं एक प्रबल सैन्य संघटित केले पाहिजे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. स्वदेशासाठीं सर्वस्वाचें बलिदान करणारी, प्रबल, सुसंघटित, शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज व सुशिस्त अशा फौजेंत सामील होणें हे मला माझें कर्तव्य वाटले." कॅप्टन शहानवाज यांनींही आपल्या निवेदनांत याच भावना व्यक्त केल्या आहेत.

आझाद हिंद सरकार व त्यांची फौज यांच्यापुढें हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याच्या जबाबदारीशिवाय मलाया, ब्रह्मदेश, सयाम, जावा, सुमात्रा, शांघाय, बोर्निओ, चीन आणि जपान येथें रहाणाऱ्या हिंदी लोकांच्या जीवित

व मालमत्तेचें रक्षण करण्याचीही जबाबदारी होती. हिंदुस्थानांत बर्मा आणि मलायाप्रमाणें इंग्रजी सत्ता संपुष्टांत आली असती तर येथील नागरिकांच्या जीवन-मालमत्तेच्या रक्षणाचाही प्रश्न उपस्थित झाला असता. फेब्रुआरी १९४२ मध्यें सिंगापूर व ब्रह्मदेश पडल्यानंतर जवळ जवळ दहा हजार हिंदी लोकांना प्राणाला आणि वित्ताला मुकावे लागले होते. त्यावेळच्या हिंदी लोकांच्या असहनीय आणि अपमानास्पद परिस्थितीचें वर्णन कॅप्टन शहानवाझ आणि कॅप्टन अरशाद या दोघांनीही आपल्यां कोर्टापुढील जबानींत केले आहे. दोघांनीही सांगितले कीं हिंदी आधिकारी व सैनिकांना ता. १७ फेब्रुवारीला संध्याकाळीं इंग्रजापांसून वेगळे करून फेटार पार्कमध्यें नेण्यांत आले. तेथें इंग्रज अधिकारी कर्नल हंट यांनीं सांगितले, " आपण सर्व आतां जपान्याच्या केंद्रेंत आहोत. मी तुम्हा सर्वांना बादशहांच्या वतीनें जपानी प्रतिनिधी मेजर जनरल फुजीवारा यांच्या स्वाधीन करीत आहे. आतां तुम्ही जपानी फौजेच्या ताब्यांत आहात. तुम्हाला यापुढें त्यांचे हुकूम पाळावे लागतील ! " असें सांगून कर्नल हंट यांनीं मेजर फुजीवारा यांना कांहीं कागदपत्रेही दिली. या प्रसंगाचा उल्लेख करतांना कॅप्टन सेहगल कोर्टापुढें म्हणाले "हिंदुस्थानी अधिकारी व सैनिक यांच्या शेळयामेंढ्याप्रमाणें जपान्यांच्या ताब्यांत देण्यांत आले होते. आम्हाला तो मर्मभेदक अपमान वाटला. या कृत्यानें इंग्रजांनीं स्वतःच्या हातानेंच त्यांचे आमचे जे संबंध होते ते तोडून टाकले होते" या असहाय परिस्थितींत आझाद हिन्द फौजेच्या सैनिकांनीं धैर्य आणि साहस दाखविले. आझाद हिंद सरकारनें त्यांच्यात आणि इतर नागरिकांतही स्वाभिमान व स्वदेशाभिमानाची भावना इतक्या उग्र स्वरूपांत पेटविली कीं जपान्यांना त्यांच्याकडे डोळे वाकडे करून सुद्धां पहाण्याचे धाडस होत नव्हतें. आपला देश जपान्यांच्या हातीं जावा ही कल्पनासुद्धां त्यांना सहन होत नव्हती.

आझाद हिंद सरकारनें केलेले कार्य दोन प्रकारचें होते. एकीकडे या सरकारनें युद्धासाठीं फौज उभारली व त्या फौजेच्या कामासाठीं रसद, शिक्षण, भरती, अर्थ, जमाखर्च वगैरे खातीं उघडून फौजेची सर्व संघटना पद्धतशीर बनविली. त्याचबरोबर आझाद हिंद सरकारनें राष्ट्र-निर्मितीच्या सर्व कार्यांकडे पूर्ण लक्ष्य दिले होते. नागरिकांचें शिक्षण, आरोग्य, संरक्षण, चारित्र्य-संवर्धन, महिला-

जागृती सामाजिक सेवा वगैरे कामें करण्यासाठीं स्वतंत्र खातीं निर्माण करण्यांत आली होती. जे प्रश्न आम्हांला आज हिमालय ओलांडण्याइतके बिकट वाटतात ते त्यांनीं चुटकीसरशी सोडविले. येथें राष्ट्र–भाषेचा प्रश्न हा जातीय प्रश्नाचाच एक भाग बनून बिकट झाला आहे. पण आझाद हिंद सरकारनें " हिंदुस्थानी निर्माण करून तिचा प्रसार इतक्या झपाट्यानें केला कीं तामील, तेलगू आणि कानडी कुटुंबांतूनही हिंदुस्थानी बोलली जाऊं लागली. घोषणा, गीते, सरकारी, परिभाषा यांत सर्व भाषेंतील शब्दांचें मिश्रण झाले होतें. 'तगमये शत्रुनाश' 'सेवक-ए-हिन्द' हें आझाद सरकारचें किताब होते. 'जय हिन्द' या प्रयोगांत व्यक्त झालेली कल्पना किती सुन्दर, सरळ, सत्य, स्वाभाविक आणि अर्थपूर्ण आहे ? जातीयता आणि अस्पृश्यता यांचे आझाद सरकारनें संपूर्ण उच्चाटन केले होते. 'हिंदू-पाणी' 'मुस्लीम-पाणी' 'वैष्णव-रोटी' हे सर्व प्रकार तेथें बंद झाले होते. शाकाहारी व मांसाहारी एकत्र बसून भोजन करीत. आपण हिंदुस्थानी आहोत याशिवाय दुसरी कांहीं भावना त्यांनीं ठेवली नाहीं. चारित्र्याची कल्पना व शिक्षण देऊन एकंदर जनतेची नीतीमत्ता इतकी उच्च दर्जाची बनविण्यांत आली कीं तिला तोड नाहीं. नागरिकांच्या जीवनांत तसें एक प्रकारचें पावित्र्य निर्माण करण्यांत आले त्याचप्रमाणें सैनिकांच्या जीवनाचाही कायाकल्प करण्यांत आला. स्वातंत्र्याची महत्वाकांक्षा ही शंकराच्या तृतीय नेत्रासारखी होती तिच्या स्पर्शानें वैषयिकता भस्म होणारच. ज्यांना कामधंदा नव्हता त्यांना काम देण्यांत आले. मलायांत अशा रीतीनें दोन हजार एकर जमीन शेतीला देण्यांत आली. शेतीचें सामान, घर बांधण्याची सामुग्री व शिवाय कांहीं रोकड रक्कम देण्यांत आली व लोकांना शेतीला लावण्यांत आले. अनेक सहाय्य केंद्र व इस्पितळें उघडण्यांत आली. जंगलांतसुद्धां डॉक्टरांना पाठवून औषधपाण्याची व्यवस्था करण्यांत आली. क्विनाईन वाटण्यांत आले. क्वाला लंपूर, केलेवा, मेमयो, येथील केंद्रांतून हजारो लोकांना दररोज वैद्यकीय मदत मिळे. मलाया, ब्रह्मदेश आणि थायलंडमध्यें तर दवाखान्यांचें जाळेच निर्माण झाले. या कामासाठीं दर महिन्याला ७५ हजार डॉलर खर्च करण्यांत येत. या कार्यामुळें आझाद हिंद सरकारविषयीं हिंदुस्थानी लोकांप्रमाणेंच ब्रह्मदेश व मलायांतील लोकांनाही प्रेम वाटूं लागले होतें.

नेताजींनीं आपल्या हृदयांत स्वातंत्र्यासाठीं जी आग पेटलेली होती ती आपल्या सहकाऱ्यांच्या हृदयांत प्रदीप्त केली. हिंदुस्थानांतील कलकत्ता, जमशेद-पूर, मद्रास वगैरे शहरावर जर्मनीनें लंडनवर, इंग्लंडने बर्लिनवर, अमेरिकेनें टोकिओवर केले तसें भीषण बॉंब हल्ले जपानकडून झाले नाहींत याचे सर्व श्रेय नेताजींना आहे. आझाद हिन्द सरकारनें स्पष्ट जाहीर केले होते कीं हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याचा आपला निश्चय आहे याचा अर्थ हिंदुस्थानचा नाश, विनाश वा सर्वनाश करणें असा नाहीं. किती भीषण मनुष्य संहारांपासून व विनाशा-पासून आझाद हिन्द सरकारनें आम्हाला वाचविले आहे ? बंगालच्या भीषण दुष्काळाच्या बातमीनें नेताजींचे हृदय तडफडले. जुलै–ऑगस्ट १९४३ मध्यें त्यांनीं शोनान रेडिओवरून हिंदुस्थान सरकारलां एक लाख टन तांदूळ देऊं केले. पण हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारला दुष्काळ पीडितांचे प्राण वांचविण्या-पेक्षां आपल्या तथाकथित इभ्रतीचे महत्त्व अधिक वाटले. त्यांनीं या देणगीचा स्वीकार केला नाहीं. आझाद हिंद सरकारचे प्रकाशन मंत्री एस्. ए. अय्यंर यांची लष्करी कोर्टापुढें सरकारी वकिलानें केलेल्या उलट तपासणीतही हे सिद्ध झाले कीं ही देणगी केवळ प्रचाराचा भाग नव्हता. ब्रह्मदेशाच्या कोणत्याही बंदरांतून हे तांदूळ सहज पाठविता आले असते.

ब्रह्मदेश, मलाया व पूर्व आशियांतील इतर देशामधील हिंदी लोकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्याची जी महनीय कामगिरी आझाद हिंद सरकारनें बजाविली त्याबद्दल रंगूनच्या इंडियन ख्रिश्चन असोसिएशननें आणि ब्रह्मदेशच्या इंडियन असोसिएशननें जाहीर रीतीनें आभार मानले आहेत. त्यांच्या आभारदर्शक तारा लाल किल्ल्यांतील कैदेंत असतानाच कॅप्टन सेहगल यांना मिळाल्या. आझाद हिन्द सरकारमुळेंच हिन्दी लोकांवर अत्याचार करण्याचें जपानला धाडस झाले नाहीं. सर्व हीन भावनांचे निर्मूलन करून एक स्वातंत्र्याची उत्कृष्ट भावना दृढमूल करण्यांत आली. त्यामुळें जपानी आधिपत्य नष्ट झाल्यानंतर बर्मा, मलाया अथवा सिंगापूरमध्यें चोरी, लूटमार वगैरे प्रकार घडले नाहीं. रंगूनवर २३ एप्रिलपासून जवळ–जवळ पंधरा दिवसपर्यंत आझाद फौजेचा अंमल होता. त्या दिवसांचे वर्णन कॅप्टन अरशाद यांनीं लष्करी कोर्टापुढें विस्तारानें केले होते. २४ एप्रिलला

रंगून सोडताना नेताजींनीं कर्नल लोकनाथन् यांना बर्मा-विभागाचे सेनापती नेमले व आर. एन्. आरशाद यांना त्यांचें दुय्यम अधिकारी म्हणून ठेऊन असा हुकुम दिला कीं आझाद फौजेनें हिंदी लोकांच्या रक्षणाचे काम करावे व इंग्रज फौज येताच युद्ध बंद करून शरणागती द्यावी. जपानी रंगून सोडून गेले होते. शहराची सर्व व्यवस्था आझाद सैनिकांनीं संभाळली. पेट्रोल, पोलिस पहारे वगैरे सर्व कामे ते करीत जपानी जातांना तांदळाची गुदामे उघडी टाकून गेले होते. गुदामाची लुटालूट आझाद सैनिकांनींच होऊं दिली नाहीं. शहरांत दंगे, लूटमार अथवा इतर कोणताही उपद्रव त्यांनीं लोकांना होऊं दिला नाहीं. २६ एप्रिलला कॅप्टन अरशाद यांनीं इंग्रज विंग–कमांडर एल्. हडसन यांचीही भेट घेतली. आपण स्वतः व सर्व आझाद सैनिक युद्ध–बंदीच्या अटीनुसार त्यांच्या स्वाधीन होण्यास तयार आहोंत असें कळविले. हडसन यांनीं त्यांना आपले काम चालू ठेऊन दररोज सकाळी आपली भेट घ्यावी असें सांगितलें. ते दोस्तांच्या सेना येण्याची वाट पहात होते. ६ जूनला रंगूनवर पहिला बॉंब हल्ला झाला. विंग–कमांडर हडसन यांना हवाई हल्ले बंद करविण्याचे सुचविण्यांत आले. त्यांना त्यासाठीं ट्रान्समिटर देण्यांत आला. पण विंग–कमांडरला त्याचा उपयोग करता आला नाहीं. ३ मे ला मिंगलडौनमध्यें आझाद हिन्द फौजेच्या सैनिकांनींच एका इंग्रज विमानाला खूण करून खाली उतरविले व त्याच्या अधिकाऱ्याला विंग–कमांडरजवळ नेले. त्यावेळीं बातमी कळली कीं जपानी अद्याप रंगूनमध्येंच लपलेले आहेत अशा कल्पनेनें रंगूनवर ४ मे ला भीषण बॉंब हल्ला करण्याची योजना आखली गेली होती. त्या अधिकाऱ्याच्या बरोबर आझाद हिन्द फौजेच्या प्रतिनिधींना पाठवून गोळीबार न करण्याचा संदेश पोंचविण्यांत आला. रंगूनमध्यें एक हजार पॅरॅशूट सैनिक उतरविण्यांत आले. चारी बाजूला पांढरी निशाणें लावून शरणागतीची घोषणा करण्यांत आली तेव्हां रंगूनची राखराख होण्याचा प्रसंग टळला.

४ मेला इंग्रज फौजांनीं रंगूनमध्यें प्रवेश केला. २६ व्या हिंदी पायदळ पलटणीचे कमांडर ब्रिगेडिअर लाउडर येऊन पोचतांच कॅप्टन अरशाद यांनीं त्यांना आपल्या सर्व कामाची माहिती दिली व त्यांच्या समोर शरणागती

देण्याचीही इच्छा दर्शविली. कमांडर लाउडरनें सांगितले कीं आत्मसमर्पण न करतां त्यांनीं आपल्या छावणीतच रहावे मात्र सर्व शस्त्रसामुग्री सुपूर्त करावी. आझाद सैनिकांना युद्ध–बंदी बनविण्याला नकार देण्यांत आला. सर्व सैनिकांना इनसित व सेंट्रल जेलमध्यें रहावे लागेल. पण त्यांनीं आपल्याला तुरुंगांत ठेवले आहे असें समजू नये. दुसरीकडे व्यवस्था नसल्यामुळें त्यांना तेथें पाठविण्यांत येत आहे, कर्नल लोकनाथन हेच त्यांचें कमांडर राहातील व त्यांना आपली स्वतःची व्यवस्था करता येईल अशाप्रकारची आश्वासने देण्यांत आली. आझाद हिंद फौजेची सर्व पद-चिन्हे उतरविण्यांत आली. त्याचे कारण असें सांगण्यात आले कीं दोस्त–फौजांनीं त्यांना मान्यता दिलेली नसल्यामुळें दोस्तांचे सैनिक त्यांचा यथोचित सन्मान करूं शकणार नाहीं तेव्हां ती काढून ठेवलेली बरी. यामुळें अशांतता व गडबड होण्याची भीति नाहीं आझाद हिंद संघाबद्दल श्री. भादुडी यांच्याशीं बोलणी केल्यानंतर ब्रिगेडियर लाउडर यांनीं त्यांना राजकीय बाबतींत बाबतीत ढवळाढवळ न करता सामाजिक सेवा व नागरिक रक्षणाचें काम चालू ठेवण्याला अनुमती दिली. कॉंग्रेसचे उदाहरण देऊन त्यांना सांगण्यांत आले कीं हिंदुस्थानां-तही राजकीय बाबतीत सरकारशीं संघर्ष आला तरी या बाबतींत सरकारशीं सहकार्य करण्यांत येते. या कामासाठीं आर्थिक सहाय्याचेही आश्वासन देण्यांत आले. आझाद हिंद बँकेलाही आपले काम चालू ठेवण्याला सांगण्यांत आले. कर्नल लोकनाथन् यांना असें आश्वासन देण्यांत आले कीं आझाद हिंद फौजेच्या सर्व सैनिकांना हिंदुस्थानांत जाण्याची सवलत मिळेल. त्यांना असेही आश्वासन देण्यांत आले कीं इंग्रजांच्या हिंदी सैन्याकडून जे आवश्यक शारिरीक काम करून घेण्यांत येते त्याशिवाय इतर कांहीं काम त्यांना देण्यांत येणार नाहीं.

अशा रितीनें या पंधरा दिवसांत शहराची सारी व्यवस्था आझाद हिंद फौजेच्या हाती राहिली व त्यांनीं सर्व कारभार अत्यंत पद्धतशीर काम करून व्यवस्थित स्वरूप सर्व कारभार इंग्रजांच्या स्वाधीन केला. इंग्रजांना एक गोळी सोडावी लागली नाहीं कीं एकही सैनिक गमवावा लागला नाहीं.

पण या सर्व कामगिरीचा मोबदला काय मिळाला ?

मोबदला विश्वासघातानें मिळाला. बँगकॉकमध्यें कर्नल भोसलें यांना जसें

फसविण्यांत आले तसेंच रंगूनमध्यें कर्नल लोकनाथन यांना, इंग्रज अधिकाऱ्यांनी फसविले. १९ मेला ब्रिगेडियर लाउडर आंझाद हिंद नॅशनल बँकेत गेले व आझाद हिंद सरकारच्या ३५ लक्षाची रोकड रक्कम व सर्व कागदपत्रे जप्त करून नेले. २८ मेला भादुडी यांना अटक करून रंगून जेलमध्यें पाठविण्यांत आले. सात आठ दिवसांत शेकडो लोकांना पकडून खटला न भरता किंवा कांहींच्यावर तडकाफडकीचे खटले चालवून तुरुंगांत डांबण्यात आले. संशयावरून छळ करण्यास सुरवात झाली. अनेकांना लष्करी चौकीवर बोलावून प्रश्न विचारण्यांत येऊं लागले. लष्करी अंमलच सुरूं झाला. आझाद हिन्द फौजेला छावणीतच नजरबंद करण्यांत आले. युद्ध–क्षेत्रांवर ज्यांना युद्ध–बंदी म्हणून वागविण्याचे लेखी आश्वासन देण्यांत आले होते त्यांना सर्वसाधारण कैदी बनविण्यांत आले. त्यांच्यावर बंड, खून व विश्वासघात करण्याचे आरोप लादण्यांत आले, खटले भरण्यांत आले. अजूनही हे खटले चालू आहेत. भारताच्या अखेरचा बहाशहा बहादूरशहा यांचा जसा विश्वासघात केला गेला त्याच इतिहासाची यावेळीं पुनरावृत्ति दिल्लीच्या लाल किल्ल्यांत झाली.

लाल किल्ल्यांतील ब्रिटिश लष्करी कोर्टाचा निर्णय कांहींही असो पण आराकान, इम्फाल आणि पलेलच्या पर्वतांची उन्नत शिखरे आझाद हिन्द फौजेच्या वीर सैनिकांच्या वीरतेची चिरकाल साक्ष देतील या क्रांतिकारक सैनिकांच्या श्वासानें पवित्र झालेल्या वायुलहरी अनंत कालपर्यंत त्यांच्या पराक्रमाचा संदेश हिंदुस्थानांतील देशबांधवांना ऐकवतील. आझाद सैनिकांच्या घोषणांनीं दुमदुमलेले नीलाकाश त्यांच्या अढळ धैर्याची, अतुल पुरुषार्थाची अमर कहाणी युगानयुगापर्यंत सांगत राहील. त्यांच्या रक्तानें रंगलेल्या तेथल्या जमिनीवर त्यांच्या पदचिन्हांच्या रुपानें त्यांच्या बलिदानाचा इतिहास आलेखिला आहे तो भाविकालाच्या पिढ्यांना त्यांची आठवण देत राहीलच राहील. पण आज ही त्यांचे कोटीकोटी देदबांधव अभिमानांने, प्रेमानें त्यांच्या पुण्य–स्मरणार्थ एक आवाजानें घोषणा करीत आहेत—

**‘ स्वतंत्र हिंदुस्थानचा विजय असो ’**

**‘ हिंदी क्रांतीचा विजय असो ’**

**‘ जय–हिंद–जय हिंद–जय हिंद ’**

# ९

# ‘ जय हिंद ’

( उपसंहार )

लेखकानें लिहिलेला इतिहास येथें संपला. पण इतिहासकाराची लेखणी थांबली, तरी इतिहास थांबत नाहीं. इतिहासाची गति ही काळाची गति असते. ग्रंथ तयार होऊन छापखान्यांतून पुस्तकरुपानें बाहेर पडेपर्यंतच्या काळांतही काळाचे अदृश्य हात नवी प्रकरणें लिहिण्यांत गुंतलेले असतात. विशेषतः अत्यंत गतीमान् अशा क्रांतिकारक कालखंडांत तर एका ओळीची शाई वाळण्यापूर्वींच दुसरी लिहिली जाते, एका घटनेची नोंद होण्यापूर्वींच दुसरी घडते...तसेंच हिंदी क्रांतीचें...रंगूनमध्यें आझाद हिंद फौजेचा विश्वासघात झाल्यानंतर, आझाद हिंद फौजेवरील लाल किल्ल्यांतील खटला सुरूं झाल्यानंतर कितीतरी घटना घडल्या व किती तरी रंग पालटले...लाल किल्ल्यांतील तीन आझाद सेनानीवर बंडाच्या आरोपाखालीं खटले सुरूं होताच जनतेनें त्यांच्या बचावासाठीं उग्र लढा सुरूं केला. प्रथम मदुरेला विद्यार्थ्यांची निदर्शनें झाली. त्यावर गोळीबार झाला. दोन विद्यार्थी बळी पडले—

पुन्हा नव्या बलिदानाला प्रारंभ झाला. पुन्हा रक्ताच्या रेषा उमटूं लागल्या. मदुरेवरून पंजाबमध्यें, पंजाबमधून संयुक्त प्रांतांत, संयुक्त प्रांतांतून बंगालमध्यें आणि बंगालमधून मुंबईला अशा मार्गानें रक्ताची पावले उमटवीत, शहीदांच्या नांवांत नवी नांवें जोडीत, बलिदानाची परंपरा उज्वल करीत इतिहास पुढें पावले टाकूं लागला. अनिरूद्ध गतीनें वादळ गर्जूं लागले, झंझावात सुटला. पुन्हा धरणीकंपाचे धक्के बसले आणि ज्वालामुखीचा स्फोट होऊन सर्वत्र आगीचा वर्षाव होणार असें वाटूं लागले...

ज्वालामुखीचा स्फोट झाला नाहीं. पण वादळाच्या गर्जना हवेंतही विरल्या नाहींत...आझाद सेनानींना कोर्टानें शिक्षा सुनावण्याचा फार्स केला आणि सर-सेनापतींनीं त्यांना बिनशर्त सोडून दिले. मदुरा, लाहोर, अमृतसर, कलकत्ता, लखनौ, अलाहाबाद आणि मुंबई येथें सांडलेल्या रक्ताला, पडलेल्या आहुतींना सार्थकता आली. आझाद सेनानींच्या बचावाचा लढा जनतेनें जिंकला.

दुसरी लढाई प्रतिगामी शक्तिविरुद्ध सुरू झाली. सरकारनें सर्व प्रांतांत मध्यवर्ति आणि प्रांतिक कायदे मंडळांच्या निवडणुका घेतल्या. एका बाजूला राष्ट्रीय क्रांतीच्या शक्ति दुसऱ्या बाजूला प्रांतिक्रांतीच्या फौजा असा सामना झाला. कायदेमंडळाच्या निवडणुकांत निर्णायक निकाल लागला नाहीं. राष्ट्रीय क्रांतीला वाहिलेली कॉंग्रेस आणि प्रतिक्रांति घडवून आणण्याचा भीष्मनिश्चय केलेली सरंजामशाही–गटाची मुस्लीम लीग यांनीं एकमेकांशीं सामना दिलाच नाहीं. कॉंग्रेसनें हिंदुसभा, कम्युनिस्ट, रॉयिस्ट यांना बाजूला काढले. लीगनें मुसलमानांतील अल्पसंख्य पुरोगामी गटाचा निदान निवडणुकींत तरी पराभव केला. आज दिल्लीला ' स्वातंत्र्या ' च्या वाटाघाटी चालल्या आहेत त्यांत कॉंग्रेसच्या बरोबरीनें लीग बसली आहे. स्वतंत्र देशांत प्रतिगामी शोषक वर्गाचें अस्तित्व अशक्य असल्यामुळें आपल्याला वाचविण्यासाठीं कॉंग्रेसच्या माथ्यांवर पिस्तुल रोखून हिंदुस्थानचा तुकडा, सवता सुभा मागितला जात आहे. मंत्रिशिष्टमंडळानें कधींच आशाळभूत न झालेली जनता आतां गोंधळून याचा शेवट कुठें आणि कसा होणार याची चिंता करीत आहे. एकीकडे ब्रिटिश सरकार वाटाघाटीनंतर होऊं शकणारा लढा चिरडून टाकण्याची सिद्धता किरीत आहे, दुसरीकडे लीग अंतर्गत यादवीची, जातीय दंग्याची, जाळपोळीची, लुटालुटींची तयारी करीत आहे. साम्राज्यशाहीचें लष्कर आणि जातीय दंगेखोर यांचा यशस्वी मुकाबला करून स्वतंत्र हिंदुस्थानांत किसान–मजदूर–प्रजा राज्याची स्थापना करण्यांत जनतेला यश येईल कां?

यश कोणाला मिळेल हे भविष्यकालच सांगू शकेल. राजकीय संघर्षांतील यशापयशाचें 'ज्योतिष' सांगण्याचे धाडस करूं नये. पावसाचेसुद्धां भविष्य कधीं बरोबर ठरत नाहीं तर पावसापेक्षां अनिश्चित व सतत बदलणाऱ्या राजकारणाचें

# ९

# ' जय हिंद '

( उपसंहार )

लेखकानें लिहिलेला इतिहास येथें संपला. पण इतिहासकाराची लेखणी थांबली, तरी इतिहास थांबत नाहीं. इतिहासाची गति ही काळाची गति असते. ग्रंथ तयार होऊन छापखान्यांतून पुस्तकरुपानें बाहेर पडेपर्यंतच्या काळांतही काळाचे अदृश्य हात नवी प्रकरणें लिहिण्यांत गुंतलेले असतात. विशेषतः अत्यंत गतीमान् अशा क्रांतिकारक कालखंडांत तर एका ओळीची शाई वाळण्यापूर्वींच दुसरी लिहिली जाते, एका घटनेची नोंद होण्यापूर्वींच दुसरी घडते...तसेंच हिंदी क्रांतीचें...रंगूनमध्यें आझाद हिंद फौजेचा विश्वासघात झाल्यानंतर, आझाद हिंद फौजेवरील लाल किल्ल्यांतील खटला सुरूं झाल्यानंतर कितीतरी घटना घडल्या व किती तरी रंग पालटले...लाल किल्ल्यांतील तीन आझाद सेनानींवर बंडाच्या आरोपाखालीं खटले सुरूं होताच जनतेनें त्यांच्या बचावासाठीं उग्र लढा सुरूं केला. प्रथम मदुरेला विद्यार्थ्यांची निदर्शनें झाली. त्यावर गोळीबार झाला. दोन विद्यार्थी बळी पडले—

पुन्हा नव्या बलिदानाला प्रारंभ झाला. पुन्हा रक्ताच्या रेषा उमटूं लागल्या. मदुरेवरून पंजाबमध्यें, पंजाबमधून संयुक्त प्रांतांत, संयुक्त प्रांतांतून बंगालमध्यें आणि बंगालमधून मुंबईला अशा मार्गानें रक्ताची पावलें उमटवीत, शहीदांच्या नांवांत नवी नांवें जाडीत, बलिदानाची परंपरा उज्वल करीत इतिहास पुढें पावलें टाकूं लागला. अनिरूद्ध गतीनें वादळ गर्जूं लागलें, झंझावात सुटला. पुन्हा धरणीकंपाचे धक्के बसले आणि ज्वालामुखीचा स्फोट होऊन सर्वत्र आगीचा वर्षाव होणार असें वाटूं लागलें...

ज्वालामुखीचा स्फोट झाला नाहीं. पण वादळाच्या गर्जना हवेंतही विरल्या नाहींत...आझाद सेनानींना कोर्टानें शिक्षा सुनावण्याचा फार्स केला आणि सरसेनापतींनीं त्यांना बिनशर्त सोडून दिले. मदुरा, लाहोर, अमृतसर, कलकत्ता, लखनौ, अलाहाबाद आणि मुंबई येथें सांडलेल्या रक्ताला, पडलेल्या आहुतींना सार्थकता आली. आझाद सेनानींच्या बचावाचा लढा जनतेनें जिंकला.

दुसरी लढाई प्रतिगामी शक्तिविरुद्ध सुरूं झाली. सरकारनें सर्व प्रांतांत मध्यवर्ति आणि प्रांतिक कायदे मंडळांच्या निवडणुका घेतल्या. एका बाजूला राष्ट्रीय क्रांतीच्या शक्ति दुसऱ्या बाजूला प्रांतिक्रांतीच्या फौजा असा सामना झाला. कायदेमंडळाच्या निवडणुकांत निर्णायक निकाल लागला नाहीं. राष्ट्रीय क्रांतीला वाहिलेली काँग्रेस आणि प्रतिक्रांति घडवून आणण्याचा भीष्मनिश्चय केलेली सरंजामशाही–गटाची मुस्लीम लीग यांनीं एकमेकांशीं सामना दिलाच नाहीं. काँग्रेसनें हिंदुसभा, कम्युनिस्ट, रॉयिस्ट यांना बाजूला काढले. लीगनें मुसलमानांतील अल्पसंख्य पुरोगामी गटाचा निदान निवडणुकींत तरी पराभव केला. आज दिल्लीला ‘ स्वातंत्र्या ’ च्या वाटाघाटी चालल्या आहेत त्यांत काँग्रेसच्या बरोबरीनें लीग बसली आहे. स्वतंत्र देशांत प्रतिगामी शोषक वर्गाचें अस्तित्व अशक्य असल्यामुळें आपल्याला वाचविण्यासाठीं काँग्रेसच्या माथ्यांवर पिस्तुल रोखून हिंदुस्थानचा तुकडा, सवता सुभा मागितला जात आहे. मंत्रिशिष्टमंडळानें कधींच आशाळभूत न झालेली जनता आतां गोंधळून याचा शेवट कुठें आणि कसा होणार याची चिंता करीत आहे. एकीकडे ब्रिटिश सरकार वाटाघाटीनंतर होऊं शकणारा लढा चिरडून टाकण्याची सिद्धता किरीत आहे, दुसरीकडे लीग अंतर्गत यादवीची, जातीय दंग्याची, जाळपोळीची, लुटालुटींची तयारी करीत आहे. साम्राज्यशाहीचें लष्कर आणि जातीय दंगेखोर यांचा यशस्वी मुकाबला करून स्वतंत्र हिंदुस्थानांत किसान–मजदूर–प्रजा राज्याची स्थापना करण्यांत जनतेला यश येईल कां ?

यश कोणाला मिळेल हे भविष्यकालच सांगू शकेल. राजकीय संघर्षांतील यशापयशाचें ‘ज्योतिष’ सांगण्याचे धाडस करूं नये. पावसाचेसुद्धां भविष्य कधीं बरोबर ठरत नाहीं तर पावसापेक्षां अनिश्चित व सतत बदलणाऱ्या राजकारणाचें

भविष्य सांगण्यांत काय अर्थ? संघर्षाच्या निर्णयाचा अंदाज करीत बसणें धोक्याचे आहे. पण वस्तुनिष्ठ दृष्टीनें विचार करतां एक गोष्ट मात्र निश्चित कीं–या लढ्यांत विजयाच्या विश्वासानें उडी घेण्याइतकी परिस्थिति अनुकूल आहे. जनतेचा आत्मविश्वास वाढविणाऱ्याही कांहीं घटना घडल्या आहेत.

त्यापैकीं एक घटना म्हणजे मुंबईला झालेले आरमारी सैनिकांचे बंड व त्या बंडाला ब्रिटिश हिंदी लष्कराच्या सर्व दलांनीं दिलेला सक्रीय पाठिंबा. या बंडाची तात्कालिक कारणे कांहीं असली तरी त्यानें दोन महत्वपूर्ण कार्ये केली आहेत. एक ब्रिटिश हिंदी लष्करातही स्वातंत्र्यासाठीं लढण्याऱ्या जनतेला जाऊन मिळण्याची इच्छा दृढमूल झाली आणि दुसरे १८५७ च्या बंडानंतर ब्रिटिशांनीं लष्कर व नागरीक यांच्यांत जी फाटाफूट निर्माण केली होती ती नाहींशी झाली. लष्कर व नागरीक यांना दरस्परांपासून दूर ठेवण्यासाठीं नागरिकांच्या राजकारणाचा लष्करावर परिणाम होऊं नये आणि लष्कराच्या शक्तीचा उपयोग नागरिकांना होऊं नये म्हणून ज्या दगडी भिंती उभारण्यांत आल्या होत्या त्या उध्वस्त झाल्या आहेत. मुम्बईला आरमारी सैनिकांनीं ब्रिटिश अधिकाऱ्यांविरुद्ध बंड पुकारतांच कॉंग्रेस आणि लीग यांचा अधिकृत विरोध असताना हिंदु आणि मुसलमान जनतेनें केवळ आपले :हिंदुस्थानीं भाई गोऱ्या सैनिकांशीं लढाई करीत आहेत या स्फूर्तीदायक घटनेनें प्रज्वलित होऊन त्यांच्या मदतीसाठीं एक प्रचंड उठाव केला. कोणत्याही पक्षाचे प्रभावी पुढारीपण या उठावाच्या मागें नव्हते. कोणी न शिकाविता जनतेनें ‘हिंदुस्थानी एक है’ ही घोषणा उच्चारलीं व या एकाच गगनभेदी गर्जनेनें आकाश घुमवीत त्यांनीं रस्त्यावर येऊन सरकारविरुद्ध छोटीशी लढाईच केली. या लढाईंत १८५७ नंतर प्रथम हिंदु-मुसलमानांचे रक्त सांडलें. ब्रिटिशांच्या गोळीबाराला हिंदु–आणि मुसलमानांनीं एकजुटीनें तोंड दिलें. ही रक्ताची एकजूट तीनच दिवस टिकली हे खरें आहे पण ती किती काळ टिकली हे महत्त्वाचे नसून आजच्या परिस्थितींत ती निर्माण होऊं शकली हेंच महत्त्वाचें आहे. एक गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. कीं सैन्यांत निर्माण झालेली क्रांतिकारक भावना, सैन्य–नागरिकाची झालेली अभेद्य एकजूट व गोऱ्याविरुद्ध हिंदु मुसलमानांनीं अल्पकाल का होईना पण केलेला लढा या सर्व घटनांचे श्रेय

नेताजींना व आझाद हिंद फौजेला आहे. सैन्याला स्फूर्ति त्यांनीं दिली. ब्रिटिश विरोधी हिंदु–मुस्लीम लढाऊ एकजुटीचा आदर्श नव्या उज्वल तेजानें त्यांनीं हिन्दुस्थानसमोर ठेवला. ताबडतोब नव्हे तरी कालांतरानें याचा परीणाम राजकारणावर आलेला आढळून येईल. आजच सर्व मुसलमान लीग सोडून कॉंग्रेसला
१ मिळणार नाहींत पण जेव्हां ब्रिटिशांशीं लढा होईल तेव्हां लढयांत कांहीं नवीन शक्ति सहभागी होतील यांत शंका नाहीं.

जनतेची आघाडी मजबूत करणारी दुसरी एक घटना घडली आहे. ऑगस्ट क्रांतीच्या विजयी नेत्याची बिनशर्त सुटका झाली. आणि केवळ नेत्यांचीच नव्हे ऑगस्ट क्रांतीत जे शौर्यानें, पराक्रमानें लढले, ज्यानीं प्राणावर तिलांजली सोडली होती असे सैनिक स्वतंत्र होऊन-जनतेंत आले आहेत. मागच्या वेळीं ऑगस्ट क्रांति सुरू होऊन सहा महिने झाल्यावर जयप्रकाश तुरुंगांतून निसटून प्रतिकारकांना मिळाले. आज जयप्रकाश, अच्युत पटवर्धन, राममनोहर लोहिया, अरुणा असफअली आपल्या सर्व सहकाऱ्यांसह आणि सैनिकांसह नव्या लढयाची तयारी करण्यास स्वतंत्र झाले आहेत. आझाद फौजेचे बंधमुक्त
८ सेनानी आणि सैनिकही आतां आमच्यात आहेत. कॉंग्रेस मंत्रिमंडळें असल्यामुळें कांहीं प्रमाणांत अधिक नागरिक स्वातंत्र्य आहे त्याचा उपयोग लढ्याच्या संघटना मजबूत करण्यासाठीं पूर्णपणें करता येईल.

थोडक्यांत, आजची परिस्थिति ही कांहीं 'सशस्त्र तटस्थतेची' आहे शांतत आहे. वाटाघाटी चालल्या आहेत. सहकार्याचा देखावा दाखविला जात आहे. पण कोणाचा आत्मविश्वास कितीही असला तरी प्रामाणिकपणें प्रत्येकाला मनांतून अस्वस्थता वाटत आहे. पाऊस पडण्यापूर्वी हवा बंद होऊन जसें गुदमरल्यासारखें वाटतें तशी आजची राजकीय परिस्थिति आहे. कोंदट आणि गुदमरलेली आहे. केव्हां तरी शांततेचा भंग भयानक वादळांत होणार ही जाणीव प्रत्येकाला सचिंत करीत आहे. वातावरण सलोख्याचे, शांततेचे, विश्वासाचे किंवा सहकार्याचे नाहीं. उलट द्वेषाचें, संशयाचें, अविश्वासाचें आणि संघर्षमय आहे.

त्यांतच येऊं घातलेल्या दुष्काळाच्या कृष्णछाया दृष्टीसमोर नाचतात.

बंगालमध्यें तीस लाख मेले, हिंदुस्थानात कोटी, दीडकोटी उपासमारीनें मरण्यासाठीं वाट चालत आहेत. कलकत्यांत भूकबळी पडूं लागले असतांही अद्याप हिंदुस्थानला किती अन्नधान्य पाठवावें आणि कसें पाठवावें यांच्या वाटाघाटी चालू आहेत. राजकीय वाटाघाटीवर जसा जनतेचा विश्वास बसत नाहीं, तशी अन्नाच्या वाटाघाटीबद्दलही आस्था वाटत नाहीं.

दहा बारा दिवसांत देश दुष्काळी परिस्थितींत प्रवेश करील. कॉंग्रेसमंत्रिमंडळे आश्वासन देत आहेत व प्रयत्नही करीत आहेत पण केवळ त्यांच्या प्रयत्नांनीं परिस्थिति सुधारण्यासारखी नाहीं, हे प्रत्येकजण जाणतो. खेड्यांत धान्याचे साठे करा सहकारी पद्धतीवर ग्रेन–बँक्स चालवा, धान्य अधिक पिकविण्याची खटपट करा, सर्व खुल्या जागा शेतीच्या कामाला लावा, व्यापारी पिके न करता धान्य-पिके करा अशी अनेक सूचना शेतकऱ्यांना पुढारी करीत आहेत त्यापैकीं किती त्यांच्यापर्यंत पोंचतील, ज्या पोंचतील त्यांतून किती ते अंमलात आणतील व त्यामुळें मृत्यूच्या हातांत सांपडलेल्या दीड कोटींपैकी किती त्याच्या घशांत न जाता जिवानिशी निसटतील हे सांगणे कठिण आहे.... युद्धोत्तर परिस्थितीचें चित्र हिंदुस्थानांत संपूर्ण तयार झाले आहे...युद्धोत्तर बेकारी...दुष्काळ...उपासमार...असंतोष...क्रांति...अंतर्गत यादवी लुटालूट, खून, मारामाऱ्या, रक्तपात, नाश हे जीवन झाले आहे. रक्त आणि अश्रु, अश्रु आणि रक्त हा जीवनाचा मंत्र बनला आहे. जे जीवन स्वतंत्र व्हावें, समानतेवर व सर्वांच्या सुखावर अधिष्ठित असावे म्हणून दीड शतकाचा अखंड, अविरत अविश्रान्त लढा झाला, असंख्य तरुण बळी गेले फांसावर लटकले, आपले जीवन देऊन देशाला नवजीवन देण्यासाठीं लढले ते राष्ट्राचें जीवन आजही मृत्यूच्या पाशांतून सुटले नाहीं. ते राष्ट्रीयत्व जिवंत रहाण्यासाठीं आणखी रक्त पाहिजे आहे, आणखी बलिदान मागत आहे. राष्ट्राची मागणी आहे.

—रक्त द्या

—प्राण द्या

—बलिदान द्या

या आव्हानाचाचा स्वीकार करण्याची नवयुवकांना सतत स्फूर्ति होण्यासाठीं ज्यांनीं बलिदान दिले, जे फांसावर लटकले त्यांची ही तेजस्वी कहाणी रक्ताश्रूंत लेखणी भिजवून लिहिली आहे...

या कहाणीला ' जय हिन्द ' हेंच नांव कां दिलें त्याचा खुलासा मूळ हिन्दी ग्रंथाला जोडलेल्या छोट्याशा प्रस्तावनेंत भगवानदीन यांनीं दिला आहे. तें म्हणतात—

" जय हिंद "
हेंच नांव या पुस्तकाला कां देण्यांत आलें ?

" जय हिंद " एक अभिवादन आहे. आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुष, हिंदु-मुसलमान सर्वांच्या अंतःकरणांनीं निमिषार्धांत ज्याचा स्वीकार केला असें हें राष्ट्रीय अभिवादन आहे. हा एकादा यक्ष-कुमार वा देव-बालक आपले स्वर्गीय पंख पसरून स्वातंत्र्याचे शिंग फुंकीत बलिदानाच्या वेदीवर उभा आहे, सतत होण्याऱ्या बलिदानानें या वेदीची उंची पर्वत-प्राय वाढत आहे आणि आणखी अनेक बलिदान करून या उंचीत सतत भर टाकण्याला सज्ज आहेत. या ग्रंथांत अशा प्राणावर तिलांजली देणाऱ्या व देण्यास सिद्ध असलेल्या तरुणांची कहाणी सांगितली आहे. म्हणून या ग्रंथाला नांव दिलें—" जय हिंद "

"जय हिन्द " मध्यें साडेचार अक्षरे आहेत ! पण राष्ट्रीय मंत्र झाल्यानंतर त्यांना अपार शक्ति आली आहे. कबीर म्हणतो, 'ढाई अखर प्रेम के पढे सो पंडित होय,' आज कबीराचे देशबांधव म्हणत आहेत—

" दास रहे आजाद हो, करै स्वतंत्र विहार !

गुन ले जो ' जय हिन्द ' के,अक्षर साढे चार ॥ "

एक कपड्याचा तुकडा झेंडा झाला म्हणून कांहीं त्याला सामर्थ्य येत नाहीं. त्याला सामर्थ्य देतात नवजवान, जे त्याची 'आन'राखण्यासाठीं व ' शान ' वाढविण्यासाठीं लाखोनीं जान कुर्बान करतात. बलि देण्यानें ' बळ ' मिळते कपड्याच्या तुकड्याला म्हणा वा अक्षरांना म्हणा. बलिदान हिंसेनें होऊं शकते, अहिंसेनेहि होऊं शकते. पण दोन्ही प्रकारच्या बलिदानांत अंतर असते. हिंसा

मनांत बाळगून जे बलिदान केले जाते त्याच्या अगोदर मन क्रोधानें भरते आणि क्रोधानें बलाचा नाश होतो. पूर्ण नाश झाला नाहीं तरी त्याला हीनता निश्चित येते. हिंसात्मक बलिदानानें बळ मिळतें परंतु त्याचा मोठा अंशभाग क्रोधांत व्यर्थ जातो. अहिंसात्मक बलिदानानें क्रोधाचा उद्भव होत नाहीं. उलट मन शांत रहातें आणि त्यामुळें बलवृद्धि होते. अहिंसात्मक बलिदानानें मिळणारे बल कितीतरी पटीनीं अधिक असतें.

केवळ आत्मरक्षणासाठीं केलेला शस्त्राचा उपयोग शुद्ध कायदेशीर दृष्टीनें सुद्धां हिंसा ठरत नाहीं. अहिंसाही त्या हिंसेची प्रशंसा करते आणि धर्म तिला धन्यवाद देतो. जेथें वृत्तींत हिंसा नाहीं तेथें उगीच हिंसा लादण्याचा प्रयत्न कोण करील ? ज्याप्रमाणें आपलें स्वतःचे प्राण वांचविण्याच्या प्रयत्नांत फक्त प्राणरक्षण हाच एक विचार मनांत असतो त्याचप्रमाणें इतरांचे प्राणरक्षण करतानाही प्राणांचे रक्षण करणें हाच विचार प्रामुख्यानें असतो. जे प्राण रक्षणाच्या बाबतींत तेंच स्वातंत्र्य रक्षणाच्या बाबतींत खरें आहे. स्वातंत्र्य रक्षणासाठीं जेव्हां शस्त्र उपसले जाते तेव्हां ते 'प्राणघातक' नसते, 'प्राण–त्याग' करणारे किंवा 'प्राणरक्षण' करणारे असते. तेथें शस्त्र हे हिंसेचे साधन नसून केवळ रक्षणाचे साधन आहे. शिकार करणारा शिकारी हा खरोखर आपल्या लक्ष्याच्या मागे लागतो. तो खरोखर प्राण घेतो. या हिंसेला अहिंसा प्रशस्ती देऊं शकत नाहीं. देईल तर ती अहिंसा अहिंसाच रहाणार नाहीं. घरावर दरोडा घालणाऱ्या दरोडेखोरावर किंवा फाडून खाण्यासाठीं अंगावर धावून आलेल्या सिंहावर जेव्हां शस्त्राचा उपयोग केला जातो व दरोडेखोर किंवा सिंह पळून गेल्यानंतर त्याचा पाठलाग करीत नाहीं, करण्याचा विचारही करीत नाहीं. पण जर ते पळून गेले नाहीं आणि त्यांचा 'प्राण' घ्यावा लागला तरी ते प्राण घेणे होत नाहीं. कारण त्या परिस्थितींत शस्त्राच्या उपयोगानें प्राण किंवा प्राणांचा बचाव होतो. या शस्त्राला जर अहिंसा प्रशस्ती देणार नाहीं तर त्या अहिंसेबद्दलच संशय घ्यावा लागेल. अहिंसेत तर प्रतिकार केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. हा तात्त्विक संघर्ष या ग्रंथांत आढळेल.

हाताचा सच्चा, लंगोटीचा पक्का, नांवाला न हपापलेला, स्वार्थापासून अलिप्त, आपले अथवा इतरांचे प्राण वांचविण्यासाठीं स्वतःला अथवा

इतरांना स्वतंत्र करण्यासाठीं, जाणतेपणी वा अजाणतेपणी जों शस्त्र वापरतो तो अहिंसेला काळीमा फाशींत नाहीं, अधिक उज्वल करतो. म्हणून तर मित्र आणि शत्रू दोघेही त्याचा आदर करतात.

‘ जय हिंद ’ मंत्राचा उच्चार करून बलिवेदीवर जढणाऱ्या प्रत्येकांच्या हृदयांत स्वतंत्र होण्याची व स्वतंत्र करण्याची आकांक्षा होती. कोणाचा नाश करावा अथवा बाजारपेठासाठीं एकादा देश जिंकावा ही त्यांची भावना नव्हती. ‘ बलि ’ची प्रेरक भावना शुद्ध अहिंसात्मक होती. म्हणूनच त्यांनीं उच्चारलेला ‘ जय हिन्द ’ चा नाद आज राष्ट्र—मंत्र झाला आहे.

‘जय हिन्द’नें जाति-भेद मिटविले. धर्मांत एकता आणली. स्त्री-पुरुषांतील विषमता नष्ट केली.

‘ जयहिन्द ’ चा नाद ऐकताच अस्पृश्यता दूर पळाली. उच्च नीच भाव विलय पावला.

‘जय हिन्द’नें राष्ट्रीयता निर्माण केली. ज्या एकराष्ट्रीयत्वासाठीं हिंन्दुस्थान शतकानुशतकें तळमळत आहे ते साध्य केले. सर्वांचे खाणे-पिणें-एक झाले, भाषा एक झाली, भाई-भाईची जूट झाली.

‘ जय—हिन्द ’ पुस्तक वाचीत असतांना एकदाही माझ्या मनानें अशी हाक कधीं मारली नाहीं की “ ऊठ, हातात शस्त्र घे आणि सर्व इंग्रजांची कत्तल कर ” पण पुस्तक वाचतांना केव्हां केव्हां भावनावेग आला कीं मन म्हणायचं “ ऊठ, कांही कर, मर, पण गुलाम राहू नकोस. जगायचं असेल तर स्वतंत्र होऊन जग. ”

हाच या ग्रंथाचा संदेश आहे. जे स्वातंत्र्यासाठीं मेले आणि मरण्यास तयार आहेत त्यांचीच कथा या पुस्तकांत वाचायला मिळेल ”

आणि ज्या ज्या हातीं हें पुस्तक वाचले जाईल, ज्यांच्या हृदयांत या ग्रंथाच्या संदेशाचे प्रतिध्वनी उमटतील त्या हातांनीं त्या हृदयांच्या स्फूर्तीनें नवा इतिहास घडविला जाईल.

(स्थळ प्रत)